# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १४/२०१२** **दिनांक २५.०८.२०१२**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी ०३.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दि.२५.०८.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-२३७७-२०१२, दिनांक २४ ऑगष्ट, २०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दि.२५.०८.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष

०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य

०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १४.०७.२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.६५६** **दिनांक १४.०७.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२** **दिनांक १८.०७.२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.६५७** **दिनांक १८.०७.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०३** **<u>नोंद घेण्याचे विषय.</u>**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता माहे मार्च, एप्रिल, मे,जुन २०१२.**

**(ब) माहे जुलै- २०१२ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(क) माहे मे,जुन,जुलै २०१२, मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(A)** माहे मार्च, एप्रिल, मे, जुन- २०१२ मधील अनुक्रमे जमा रु.४४,०४,६२,२४९/-, रु.३९,५०,४६,३४०/-, रु.३७,२३,२४,४२५/- व रु.३५,५६,१९,०१९/- आणि खर्च रु.२७,६८,८२,७५०/-, रु.८,२०,१७,५५३/-, रु.१०,२४,३८,३४४/- व रु.१२,७८,९३,२०३/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे मार्च, एप्रिल, मे, जुन- २०१२ मधील अनुक्रमे रुपये ३,२२,४०६/-, रु.७,१०१/-, रु.१,३६,४३१/- व रु.१,०१,२८३/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दिनांक ३१.०३.२०१२ अखेर रुपये ६२७,५६,९७,४८८/-, दिनांक ३०.०४.२०१२ अखेर रुपये ६५३,०६,९७,४८८/-, दिनांक ३१.०५.२०१२ अखेर रुपये ६७३,५६,९७,४८८/- व दिनांक ३०.०६.२०१२ अखेर रुपये ६९३,५६,९७,४८८/- चा तक्ता, दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या माहे जुलै- २०१२ मधील रुपये १५,७८,४०,०८४.०० चा तक्ता, श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा माहे मे,जुन,जुलै- २०१२ मधील अनुक्रमे रु.२,२५,०९५/-, रु.२,०६,१५१/-, व रुपये ४,८१,६५२/- च्या अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये जुन- २०१२ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(B)** श्री साईबाबा रुग्णालयात माहे जुन- २०१२ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये ३५,७३,१३९/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईबाबा हॉस्पिटमध्ये अपोलो मेडिकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सच्या व्यवहारात माहे मार्च, एप्रिल- २०१२ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

**(C)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी माहे मार्च, एप्रिल- २०१२ या महिन्यात अनुक्रमे माहे मार्च, २०१२ मध्ये रुपये १०,९७,००५/-, एप्रिल- २०१२ मध्ये रुपये ११,५८,११९/-, मात्र रकमेचे देणगी चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र. ६५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो मेडिकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सच्या व्यवहारात माहे मार्च, एप्रिल- २०१२ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

**(D)** श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी माहे मार्च, एप्रिल- २०१२ या महिन्यात अनुक्रमे माहे मार्च, २०१२ मध्ये रुपये १,२८,५४८/-, एप्रिल- २०१२ मध्ये रुपये १,२३,३४५/-, मात्र रकमेचे देणगी चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र. ६५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुन-जुलै २०१२ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**(E)** श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे जुन- २०१२ मधील रुपये ४८,४०,८२५/- व जुलै- २०१२ मधील रुपये ३७,७५,५००/- मात्र देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०६. श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुन- २०१२ मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(F)** साईनाथ रुग्णालयात जुन- २०१२ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण साठी रुपये ६९,८११/-, थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये ५३,९००/- तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना जुन- २०१२ मध्ये रुपये १,१६,६७०/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०७. माहे जुन- जुलै, २०१२ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**(G)** माहे जुन- जुलै, २०१२ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर अनुक्रमे जुन- २०१२- मध्ये ४६,४०३ व जुलै-२०१२ मध्ये- ४७,९३२ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**०८. पाणी तपासणी अहवाल.**

**(H)** माहे मे, जुन- २०१२ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ६५८ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०४** **पुस्तके/ फोटो पुनर्मुद्रण करणेकामी प्राप्त दरपत्रके उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/ फोटो छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार साठा संपत आलेल्या खालील पुस्तके /फोटो पुनर्मुद्रणासाठी दरपत्रके मागविणेकामी प्रकाशने विभागाचे दि.१९.०६.२०१२ चे प्रस्तावानुसार मंजूरी मिळालेली आहे.

**अ) पुस्तके छपाई कामाचे परिशिष्ट-**

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | भाषा | सध्याची शिल्लक संख्या | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईंचे सत्य चरित्र (निंबाळकर - गद्यात्मक) आवृत्ती क्र.०८ | मराठी | ७४४६ | ८ | १५००० | ७८.०० | ९०.०० | १३५००००.०० |
| ०२ | श्री साई सत्चरित्र आवृत्ती क्र. १३ | गुजराथी | १६९७७ | ७ | ३०००० | ४५.०१ | ६०.०० | १८०००००.०० |
| ०३ | श्री साई सत्चरित्र आवृत्ती क्र.१७ | तामिळ | २०७१४ | ६ | ५०००० | ४६.०० | ६०.०० | ३००००००.०० |
| ०४ | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.१४ | इंग्रजी | १७८९ | ३ | ७००० | ४.९६ | ७.०० | ४९०००.०० |
| ०५ | साई कि ओर मरा पहला कदम आवृत्ती क्र.३ | हिंदी | २५९ | १ | ७००० | ५०.०० | ७०.०० | ४९००००.०० |
| ०६ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र ६ | तामिळ | २०५५ | ४ | ७००० | ९.९० | १५.०० | १०५०००.०० |
| ०७ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र ३ | बंगाली | ८६३ | ४ | ३००० | ६.५७ | १०.०० | ३००००.०० |
| ०८ | श्री साईनाथ स्तवन मंजरी आवृत्ती क्र.३३ | मराठी | ३२७७८ | ४ | १००००० | ०१.८१ | ३.०० | ३०००००.०० |
| ०९ | श्री साईनाथ स्तवन मंजरी आवृत्ती क्र. ८ वी | इंग्रजी | २२६८ | ३ | १०००० | २.७० | ४.०० | ४००००.०० |
| | | | | | | | **एकूण रु.** | **७१,६४,०००.००** |

## ब) फोटो छपाई कामाचे परिशिष्ट

| अ.नं. | फोटोचे नांव | आकार | सध्याची शिल्लक संख्या | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा मुर्तीसह समाधी फोटो (कलर) थ्री.डी. | २.५"X ३.५" | १३२९५ | २ | १००००० | ६.५० | ८.०० | ८०००००.०० |
| ०२ | श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ फायबर फ्रेम थ्रीडी | ५" x ७" | १०१ | ०१ | ५००० | १३०.०० | १५०.०० | ७५००००.०० |
| | | | | | | | **एकूण रु.** | **१५,५०,०००.००** |

उक्त मान्यतेनुसार प्रकाशने विभागाकडील अधिकृत निवडक प्रेसधारकांचे यादीनुसार १६ प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/१६०४/दि.१२.०७.२०१२अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.२५.०७.२०१२ अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. खालील अ.नं. १ ते ८ प्रेसधारकांची दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकांचे नांव | आवक नं./तारीख |
|---|---|---|
| ०१ | मे.सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर | ४५८/२४.०७.२०१२ |
| ०२ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | ६४४२/२१.०७.२०१२ |
| ०३ | मे.लोकमंगल प्रिंट पॅक लि., सोलापूर | ६५८३/२५.०७.२०१२ |
| ०४ | मे.टॅको व्हिजन्स् प्रा.लि., मुंबई | ४६०/२५.०७.२०१२ |
| ०५ | मे.चेरि ऑफसेट प्रिंटींग ॲन्ड पॅकींग इंडस्ट्रीज लि., सोलापूर | ६५८५/२५.०७.२०१२ |
| ०६ | मे.कर्मशियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई | ४५७/२५.०७.२०१२ |
| ०७ | मे.कल्याणी कार्पोरेशन, पुणे | ६५८२/२५.०७.२०१२ |
| ०८ | मे.प्रेमिअर प्रेस, सिकंदराबाद | ६५८४/२५.०७.२०१२ |

सबब वरील ०८ निवडक प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके आजचे सभेत उघडणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले-

**(अ) पुस्तके छपाईकामी आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता-**

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | श्री साईचे सत्य चरित्र मराठी आवृत्ती क्र.०८ | श्री साईसत् चरित्र- गुजराथी आवृत्ती क्र.१३ | श्री साईसत् चरित्र- तामिळ आवृत्ती क्र.१७ | मुलांचे साईबाबा इंग्रजी आवृत्ती क्र.१४ | साई कि ओर मेरा पहला पहला कदम- हिंदी आवृत्ती क्र.३ | श्री साईनाथ सगुणो. तामिळ आवृत्ती क्र.६ | श्री साईनाथ सगुणो. बंगाली आवृत्ती क्र.३ | श्री साईनाथ स्तवन मंजरी - मराठी आवृत्ती क्र.३३ | श्री साईनाथ स्तवन मंजरी - इंग्रजी आवृत्ती क्र.८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागील छपाई दर | ७८.०० | ४५.०१ | ४६.०० | ४.९६ | ५०.० | ९.९० | ६.५७ | १.८१ | २.७० |
| | नविन छपाई संख्या | १५,००० | ३०,००० | ५०००० | ७००० | ७००० | ७००० | ३००० | १००००० | १०००० |
| | | रू. पै. | रू. पै. | रू. पै. | रू. पै. | रू. पै. | रू. पै. | रू. पै. | रू. पै. | रू. पै. |
| १ | मे.सकाळ पेपर्स लि,कोल्हापुर | १२७.८१ | ५५.०८ | ७१.४६ | ११.१६ | ६५.८४ | १६.९७ | १३.३८ | २.८० | ५.७४ |
| २ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर | **८५.५५** | **३५.९०** | **४५.१२** | - | - | - | - | - | - |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | मे.लोकमंगल प्रिंटपॅक लि.,सोलापुर | १०५.५० | ४७.६५ | ६०.७८ | ७.३६ | ६६.२० | १४.७४ | ११.१० | ३.४४ | ३.४४ |
| ४ | मे.टॅको व्हिजन्स् प्रा.लि.,मुंबई | १०५.०० | - | - | - | - | - | - | - | - |
| ५ | मे.चेरि ऑफसेट, सोलापुर | ८५.९७ | ३६.६९ | ४५.५० | - | **(२) ५४.३३** | १३.१७ | - | २.०२ | - |
| ६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ९४.६ | ४२.७० | ५७.५० | **५.४०** | - | **१३.१५** | **१०.८०** | **१.३४** | **३.१७** |
| ७ | मे.कल्याणी कार्पोरेशन, पुणे | १०५.६ | ७३.११ | १११.९० | २०.८२ | - | - | - | ६.६० | १२.९० |
| ८ | मे.प्रेमिअर प्रेस, सिकंदराबाद | ९०.०० | ४२.५० | ४६.५० | २०.०० | **(१) ३०.००** | ३५.०० | ६०.०० | ५.०० | १०.०० |
| | **निम्नतम दराने येणारा खर्च** | १२८३२५०.०० | १०७७०००.०० | २२५६०००.०० | ३७८००.०० | ३८०३९०.०० | १२०५०.०० | ३२४००.०० | १३४०००.०० | ३९७००.०० |

अ.नं. ०१ ते ०७ प्रेसधारकांनी दरपत्रकासोबत कागदाचे नमुने दिलेले आहेत. अ.नं.८ चे प्रेसधारकानी दरपत्रकासोबत कागदाचे नमुने दिलेले नाहीत.

**(ब) फोटो छपाईकामी आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता-**

| अ.नं. | प्रेसधारकांचे नांव | श्री साईबाबा मुर्तीसह समाधी थ्री.डी. फोटो (रंगीत) २.५”X ३.५” | श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ फायबर ५” x ७” थ्रीडी |
|---|---|---|---|
| | | रुपये- पैसे | रुपये- पैसे |
| | मागिल छपाई दर | ०६-५० | १३०-०० |
| | नवीन छपाई संख्या | १००००० | ५००० |
| ०१ | मे.सकाळ पेपर्स लि., कोल्हापूर | --- | --- |
| ०२ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | --- | --- |
| ०३ | मे.लोकमंगल प्रिंट पॅक लि., सोलापूर | --- | --- |
| ०४ | मे.टॅको व्हिजन्स् प्रा.लि., मुंबई | **०४-५०** | **१४०-००** |
| ०५ | मे.चेरि ऑफसेट प्रिटींग ॲन्ड पॅकींग इंडस्ट्रीज लि., सोलापूर | --- | --- |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स,मुंबई | --- | --- |
| ०७ | मे.कल्याणी कार्पोरेशन, पुणे | --- | --- |
| ०८ | मे.प्रेमिअर प्रेस, सिकंदराबाद | --- | --- |
| | निम्नतम दराने येणारा खर्च | ४,५०,०००/- | ७,००,०००/- |

**निर्णय क्र.६५९ यावर सविस्तर चर्चा होऊन,अ.क्र.८ मे. प्रेमिअर प्रेस ,सिकंद्राबाद यांनी दर पत्रकात नमूद केले प्रमाणे कागदाचे नमुने व आवश्यक कागदपत्रे जोडले नसल्याने ते अपात्र असल्याने त्यांचे दरपत्रकाचा विचार करता येणार नाही. 'अ' व 'ब' तक्त्यात अद्योरेखीत केलेल्या निमन्तम दराने पुस्तके व फोटो छपाई कामाचा कार्यादेश देणेत यावा असे ठरले. तसेच छपाईकामी येणाऱ्या रु. ६४,७४,५१०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

---

**विषय नं.०५ गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** माहे सप्टेंबर- २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | ०९/०९/२०१२ | ८,००,००,०००/- |
| ०२ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी | १७/०९/२०१२ | १८,७१,९०,९३१/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | किसान विकास पत्र, श्रीरामपूर | २५/०९/२०१२ | ६,५०,००,०००/- |
| ०४ | कॅनरा बँक, शिर्डी | २६/०९/२०१२ | १२,१२,०६,३३४/- |
| ०५ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे सप्टेंबर- २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | **एकूण रक्कम -** | | **५५,३३,९७,२६५/-** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ५५.३३ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/ सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी, असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल, असे नम्र मत आहे :-

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १२ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.५५.३३ कोटीची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.६६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दैनंदिन व इतर आवश्यक खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम रु.५५.३३ कोटी वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते १२ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०६** **संस्थानच्या नावाने असलेले बचत खाते बंद करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सध्या संस्थानच्या नावांने वेगवेगळया बँकांत मिळून एकूण २२ बचत खाते उघडण्यात आलेले आहेत. पूर्वी शिर्डी येथे काही राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखा नसल्याने कोपरगांव, राहाता, श्रीरामपूर व नाशिक या ठिकाणीही आवश्यकतेनुसार संस्थानच्या नावाने काही बँकांमध्ये बचतखाते उघडण्यात आलेले आहेत. परंतु, आता बहुतांशी राष्ट्रीयकृत बँकाच्या शाखा शिरडी येथे सुरु करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे पूर्वी बाहेरगांवी उघडण्यात आलेल्या बचतखात्यावर खूपच कमी प्रमाणात आर्थिक व्यवहार होत आहेत.

तसेच संस्थानच्या नावांने ब-याच ठिकाणी बचत खाते असल्याने, त्या प्रत्येक खात्यात, संस्थानचा रोजचा व्यवहार मोठा असल्याने शिल्लक असणारी रक्कमही मोठी असते. त्यामुळे एकूण सर्व खात्यांवर मिळून शिल्लक रक्कम मोठया प्रमाणावर राहते व त्या रकमेवर मिळणारे व्याज कमी दराने प्राप्त होते. तसेच महिना अखेरीस बँक रिकन्सीलेशन करणे, वेगवेगळया बँकेचे हिशोब ठेवणे, शिल्लक बँक बॅलन्सेस तपासणे वगैरे कामकाजामध्ये विनाकारण वाढ होत आहे.

त्याअनुषंगाने, काही बँकांमध्ये आर्थिक व्यवहार कमी असल्याने तेथील संस्थानच्या नावे असलेले बचतखाते बंद केल्यास कामामध्ये सुरळीतपणा येईल. बंद करावयाच्या बचत खात्यांबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **बॅंकेचे नांव** | **शाखा** | **बचत खाते क्रमांक** |
|---|---|---|---|
| ०१. | स्टेट बँक ऑफ इंडिया | कोपरगांव | ११३८८८६३४६४ |
| ०२. | बँक ऑफ बडोदा | कोपरगांव | ०४५६०१०००१५१४३ |
| ०३. | बँक ऑफ बडोदा | कोपरगांव | ०४५६०१००००८०४३ |
| ०४. | बँक ऑफ बडोदा (DR/CR Card) | नाशिक | १७६६०१०००९६७६ |
| ०५. | ए.डी.सी.सी.बँक | शिर्डी | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६. | सिंडीकेट बँक | शिर्डी | ५१००२०१००००११ |
| ०७. | युनायटेड बँक | शिर्डी | १५९१०१००००१९ |
| ०८. | आंध्रा बँक एनपीए एटीएम | शिर्डी | १११२१००११०००५८५ |
| ०९. | आंध्रा बँक एटीएम कलेक्शन | शिर्डी | १११२१००११०००५८५ |
| १०. | बँक ऑफ महाराष्ट्र | शिर्डी | ६००५७५७५५४५ |

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या बँकेतील संस्थानच्या नांवे असलेले बचतखाते बंद करण्यास मान्यता मिळणेकामी मा.त्रिसदस्यीय समितीच्या सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६६१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.०७ साईआश्रम भाग १ व २ परिसराचे प्रवेशद्वाराजवळ प्रकल्पाच्या नावाचे फलक लावणेबाबबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७, १०८ व १०९ मध्ये व मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १७२ पैकी मधील जागेत साईभक्तांचे निवासव्यवस्थेकरीता साईआश्रम प्रकल्प उभारणेत आला आहे.

साईआश्रम प्रकल्प भाग १ व २ ची इमारत बांधकाम, परिसर विकास इ. कामे पूर्ण झाली असून सदर प्रकल्पाचा उद्‌घाटन समारंभ मान्यवरांचे हस्ते आयोजीत करण्याचे विचाराधीन आहे. त्याकरीता साईआश्रम भाग १ व २ परिसराचे प्रवेशव्दारांजवळ साईभक्तांचे माहिती व मार्गदर्शनासाठी प्रकल्पाच्या नावाचे बोर्ड लावणे आवश्यक आहे. यासाठी LED बोर्ड तयार करुन साईआश्रम भाग-१ व भाग-२ येथे मराठी व इंग्रजी अक्षरात लावणेसाठी खालील मोजमापाप्रमाणे एकूण ५ बोर्ड तयार करावे लागतील.

| अ.नं. | ठिकाण | बोर्डचा तपशिल | साईज | अंदाजीत खर्च (अक्षरे व ACP बोर्डसह) |
|---|---|---|---|---|
| **अ** | **साई आश्रम भाग-१** | | | |
| १. | नगर-मनमाड रोड मुख्य प्रवेशव्दार | LED बोर्ड | ३' उंच X २३' लांब | ४,००,०००/- |
| २. | दक्षिण बाजू २४ मी. रुंद रस्ता | LED बोर्ड | २'-६"X१५' लांब | ३,५०,०००/- |
| ३. | उत्तर बाजू - ५०० रुम अंतर्गत रस्ता | LED बोर्ड | २'-६"X१५' लांब | ३,५०,०००/- |
| **ब** | **साई आश्रम भाग-२** | | | |
| १. | उत्तर बाजू रस्ता | LED बोर्ड | २'-६"X१५' लांब | ३,५०,०००/- |
| २. | दक्षिण बाजू रस्ता | LED बोर्ड | २'-६"X१५' लांब | ३,५०,०००/- |
| | | | **एकूण रुपये** | **१८,००,०००/-** |

तरी साईआश्रम प्रकल्पाचे प्रवेशव्दारांवर LED बोर्ड तयार करणेसाठी वरीलप्रमाणे येणारे अंदाजे रु.१८,००,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून बोर्ड तयार करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम प्रकल्प भाग १ व २ चे प्रवेशव्दारांवर दिवसा व रात्री स्पष्ट दिसतील असे LED बोर्ड तयार करणेसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१८,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०८ श्री साईंच्या समाधी मंदिरातील दर्शन रांगांचे पुनर्नियोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सध्या श्री साईंच्या समाधी मंदिरात भक्तांना दर्शनासाठी पुर्वेकडून पश्चिमेकडे ०४ दर्शन रांगेतून सोडले जाते. श्रीं च्या समाधीचे दर्शन घेऊन सदरचे भक्त श्रींचे समाधीचे दक्षिण व उत्तर बाजूस असणाऱ्या दरवाजातून बाहेर पडतात. सध्या समाधी मंदिरात, सोबतचे नकाशात दर्शविल्याप्रमाणे श्रीं चे समाधीचे पाठीमागील बाजूस, श्री गुरुस्थान मंदिराचे बाजूस पश्चिमेस न्हाणीघर व मान्यवरांच्या स्वागताच्या खोल्या आहेत. सध्या भक्त समाधी मंदिरातून गुरुस्थान मंदिराचे बाजूस असणाऱ्या मध्यवर्ती दरवाजातून बाहेर पडतात.

उत्तर बाजूकडील भक्त सध्या उत्तर बाजूचे (नारळी गेटमधून) दरवाज्यातून बाहेर पडतात तर दक्षिण बाजूकडील भक्त गुरुस्थान मंदिराचे बाजूकडील पश्चिम बाजूचे मध्यवर्ती दरवाज्यातून बाहेर पडतात.

सदर भक्त बाहेर पडतांना एकमेंकाना छेदून बाहेर पडतात किंवा मागील बाजूस असलेल्या मोकळया जागेत बराच वेळ रेंगाळतात त्यामुळे समाधी मंदिरातून भक्त बाहेर पडण्याची गती अत्यंत मंदावते.

त्यामुळे सदरील दर्शन रांगा ज्या पध्दतीने पुढे सरकतात, त्याच पध्दतीने सरळ गुरुस्थान मंदिराकडील पश्चिम बाजूने बाहेर काढण्याचे प्रस्तावित आहे. थोडक्यात, समाधी मंदिराचे गुरुस्थान बाजूकडील पश्चिम बाजूचा मध्यवर्ती दरवाज्याचे दक्षिण व उत्तर बाजूस नव्याने दोन दरवाजे तयार

करुन समाधी मंदिरातील दर्शन रांगा सरळ बाहेर काढता येतील. त्यासाठी उत्तर बाजूकडील (नारळी गेट) दरवाजाकडे जाणारा रस्ता स्टील ग्रील बसवून तात्पुरता बंद करता येईल.

तसेच मंदिरातील समाधीचे पाठीमागील बाजूस असणाऱ्या मोकळया जागेत स्टील रेलिंगचे भक्तांना एकमेंकास न छेदता सरळ बाहेर पडता येईल तसेच गुरुस्थान बाजूकडील पायऱ्यांचे पुर्नःबांधकाम करुन ही व्यवस्था करता येईल. याकामी अंदाजे रक्कम रुपये ६,९५,०००/-मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावास मा. त्रीसदस्यीय समितीची प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे श्री साईंच्या समाधी मंदिरातील दर्शन रांगांचे पुनर्नियोजन करणेसाठी आवश्यक बांधकाम करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९ श्री साईबाबा रुग्णालय व द्वारावती भक्तनिवासस्थान येथील मेन गेटवर सुरक्षा केबीन व प्रवेशद्वार बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईबाबा रुग्णालय व द्वारावती इमारतीचे मेनगेटवर सुरक्षा रक्षकांना बसण्यासाठी असलेल्या फायबर केबिन उन्हामुळे खराब झालेल्या आहेत तसेच त्या गरम झाल्यामुळे आत बसणे अवघड होत आहे. करिता कायमस्वरूपी बांधकामात सुरक्षा केबिन बनविणेबाबत संरक्षण विभागाने दि. ०९/०३/२०१२ चे पत्रान्वये कळविले आहे.

याकामी साईआश्रम व प्रसादालया करीता तयार करण्यात आलेल्या भव्य प्रवेशव्दाराप्रमाणे द्वारावती इमारतीचे मेनगेटवर ९ मी. रुंदीचे प्रवेशव्दार १०'x१०' आकाराच्या केबीनसह करता येईल तसेच साईबाबा हॉस्पीटल करिता मेनगेटवर ६ मीटर रुंदीचे प्रवेशव्दार ६'x५' आकाराच्या केबीनसह व साईनाथ रुग्णालय गेटजवळ एक १०'x१०' आकाराची सुरक्षा कॅबीन तयार करून घेता येईल. सदर कामासाठी सन २०११-१२ चे जिल्हा दरसूचीनुसार (DSR) इकडील विभागामार्फत तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु. १३,३७,५७४/- खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे प्रवेशव्दार, गेट व सुरक्षा केबिनचे बांधकाम करून कायमस्वरुपी व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.१३,३७,५७४/- खर्चास प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर सदरहू कामी सविस्तर अंदाजपत्रके, आराखडे व आर.सी.सी. डिझाईन तयार करून घेता येईल व तद्नंतर विहित पध्दतीने निविदा मागवून सदरचे काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाण श्री साईबाबा रुग्णालय व द्वारावती भक्तनिवासस्थान येथील मेन गेटवर सुरक्षा केबीन व प्रवेशद्वार बांधकाम करणेसाठी अंदाजपत्रके, आराखडे व आर.सी.सी. डिझाईन तयार करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१३,३७,५७४/- मात्रचे खर्चास व निविदा मागविणेस मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१० माहिती तंत्रज्ञान विभागासाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईटेक प्रकल्पाअंतर्गत श्री साई प्रसादालयाचे उत्तर बाजुकडील पहिल्या माळ्यावरील हॉलमध्ये डाटा सेंअर व माहिती तंत्रज्ञान विभागाचे कार्यालय सुरु करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी माहिती तंत्रज्ञान विभागाचे कायम, कंत्राटी व शिकाऊ कर्मचारी असे एकूण २० कर्मचारी व कॉग्णीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे २५ ते ३० प्रतिनिधी दररोज काम करत असतात. या सर्वासाठी तेथे जवळ स्वच्छतागृहाची सोय नसल्यामुळे या सर्वाना इमारतीचे खाली उतरुन साईभक्तांसाठी बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहामध्ये जावे लागते. सदर ठिकाणी श्री साईभक्तांची सतत जास्त प्रमाणात वर्दळ असते, तसेच बहुधा विश्वस्त, वरिष्ठ अधिकारी व आयटी क्षेत्रातील नामवंत प्रतिनिधी माहती तंत्रनान विभागास भेट देत असतात. परंतू स्वच्छता गृहाची सोय नसल्याने त्यांना तळमजल्यावरील स्वच्छतागृहामध्ये जावे लागते. करीता माहिती तंत्रज्ञान विभागाकरीता पहिले मजल्यावर स्वच्छतागृहाचे बांधकाम करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी सो। यांनी दि.१५/०२/२०१२ रोजी सूचना केलेली असल्याचे दि.०३/०७/२०१२ रोजीचे टिपणी अन्वये माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी कळविले आहे.

श्री साई प्रसादालय येथील डेटा सेंटर हॉल येथे सोबतचे नकाशात दर्शविलेप्रमाणे हॉलचे पॅसेजसमोरील टेरेसवर स्त्रीयांकरीता व पुरषांकरीता प्रत्येकी ०२ मुतारी व एक वॉश बेशीन चा ब्लॉक तयार करता येईल. याकामी आवश्यक मटेरीअल खरेदीकामी खलालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | मटेरीअलचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सिमेंट | २५.०० | गोणी | २८५/- | ७१२५/- |
| ०२ | वाळू | २.०० | ब्रास | २०००/- | ४०००/- |
| ०३ | टाटा ब्ल्युस्कोप शिट | ६.०० | नग | ९००/- | ५४००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | एम एस अँगल | १३० | किलो | ४८/- | ६,२४०/- |
| ०५ | सिमेंट पेन्ट | १० | किलो | ५०/- | ५००/- |
| ०६ | सिरॅमिक टाईल्स १'x१' | ४५/- | बॉक्स | २२५/- | १०१२५/- |
| ०७ | युरीनल भांडे<br>१. जेन्टस<br>२. लेडीज | <br>२<br>२ | <br>नग<br>नग | <br>६००/-<br>८००/- | <br>१२००/-<br>१६००/- |
| ०८ | एस डब्ल्यु आर पाईप २ १/२" | २५ | मी. | ६६/- | १६५०/- |
| ०९ | वॉश बेसीन १८"x१२" | ०२ | नग | १०००/- | २०००/- |
| १० | यु.पी.व्ही.सी. पाईप अर्धा इंची | १० | मी. | २६/- | २६०/- |
| ११ | दरवाज्या फ्रेम (कॉक्रीट ) | ९.८० | मी. | ३६०/- | ३५२८/- |
| १२ | शटर | ०२ | नग | २२५०/- | ४५००/- |
| १३ | सिफोरेक्स ब्लॉक (६००X१५०X२३०) | ३०० | नग | ७०/- | २१००/- |
| | | | | एकूण रुपये- | ५०,२२८/- |

**ब) मजुरी खर्च :-**

| अ. नं. | मटेरीअलचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लॉक बांधकाम | २६.०० | चौ.मी. | ४७/- | १२२२/- |
| ०२ | आतील व बाहेरील प्लास्टर | ५१.०० | चौ.मी. | ७५/- | ३८२५/- |
| ०३ | सिमेंट पेंट मध्ये रंगकाम | २५.०० | चौ.मी. | २२/- | ५५०/- |
| ०४ | सिरॅमिक टाईल्स डडो | ३०.०० | चौ.मी. | ९७/- | २९१०/- |
| ०५ | सिरॅमिक टाईल्स फ्लोरींग | ९.०० | चौ.मी. | ९७/- | ८७३/- |
| ०६ | ब्रीक बॅट वाटरप्रुफींग | १.०० | घन. मी. | ३५०/- | ३५०/- |
| ०७ | प्लबींग वर्क | L.S. | | | १५००/- |
| | | एकूण रुपये | | | ११२३०/- |
| | एकूण खर्च अ + ब | | | | ६१४५८/- |
| | अधिक ५% कन्टेनजन्सीज | | | | ३०७२.९० |
| | एकूण | | | | ६४५३१/- |
| | एकूण पूर्णांकीत रुपये | | | | ६४,६००/- |

श्री साई प्रसादालयाचे भोजन प्रतिक्षालय हॉलचे उत्तर बाजुकडील टेरेसवर संगणक विभागाकरीता स्वच्छतागृह बांधणेकामी उपरोक्तप्रमाणे एकूण अंदाजे रु.६४,६००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरचे काम मजुरी ठेकेदार यांचेकडून करणेस व स्थानिक सप्लायर्स यांचेकडून मटेरीअल खरेदीकरणेकामी कोटेशन मागविण्यास व याकरीता येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागासाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था करणेसाठी श्री साई प्रसादालयाचे भोजन प्रतिक्षालय हॉलचे उत्तर बाजुकडील टेरेसवर स्वच्छतागृह बांधणेचे काम मजुरी ठेकेदार यांचेकडून करुन घेणेस व स्थानिक सप्लायर्स यांचेकडून मटेरीअल खरेदी करणेकामी कोटेशन मागविण्यास तसेच याकरीता येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **संस्थानचे मौजे निमगाव कोऱ्हाळे व कनकुरी येथील क्षेत्रातील विहीरीतील गाळ काढून विहीरीस आर.सी. सी. बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. कार्यकारी अधिकारी सो., उप कार्यकारी अधिकारी यांचे दि.२१/०६/२०१२ रोजीचे कनकुरी साठवण तलावाचे पाहणी दरम्यान कनकुरी साठवण तलावातील पाणी संस्थान वापरासाठी कमी पडत असल्यामुळे संस्थान परिसरातील ठिकठिकाणी असलेल्या विहीरींचे पाणी उपयोगात आणणेबाबत सूचना दिलेल्या असल्याचे तसेच संस्थानने नव्याने खरेदी केलेल्या मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १८२ पैकीचे क्षेत्रातील व कनकुरी येथील गट नं. १२१ पैकीचे क्षेत्रातील विहीरीतील गाळ काढून विहीरीस संरक्षण कठडे बांधणेबाबत व ६'x६' या मापाचे पंपरुम बांधणेबाबत पाणीपुरवठा विभाग प्रमुख्य यांनी दि.०७/०७/२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

वरिलप्रमाणे दोन्ही ठिकाणी विहीरीस ४ ते ५ फुट उंचीचे आर.सी.सी. कठडे बांधल्यास संरक्षणाचे दृष्टीने योग्य राहील व विहीरीतील गाळ काढल्यास ज्यादा प्रमाणात पाणी उपलब्ध होईल.

मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १८२ पैकीचे क्षेत्रातील व कनकुरी येथील गट नं. १२१ पैकीचे क्षेत्रातील विहीरींचा व्यास २१ फुट असा असून विहीरीचे जमिन लेव्हल पर्यंत अनुक्रमे विट बांधकाम व दगड बांधकाम केलेले आहे. तसेच विहीरीमध्ये साधारणत : ५ फुटापर्यंत गाळ साचलेला आहे. सदरचा गाळ क्रेनव्दारे ठेकेदारामार्फत काढता येईल. तसेच विहीरींचे संरक्षण कठडे आर.सी.सी.

पडदी मध्ये करणेकामी अशा प्रकारचे काम करणारे मजूर ठेकेदारामार्फत करुन घेता येईल. तसेच पॅनल बोर्ड करीता पंपरुम ऐवजी आर.सी चे कठडेमध्ये ३'x३' यासाईजमध्ये खोली २ फुट याप्रमाणे बॉक्स तयार करुन त्यास ग्रील गेट तयार करता येईल.

उपरोक्तप्रमाणे कामे करणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअलची आवश्यकता आहे.

**अ. मटेरीअल खर्च :-**

| अ.नं. | मटेरीअलचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सिमेंट | ६६ | गोणी | २८५/- | १८८१०/- |
| ०२ | वाळू | ०२ | ब्रास | २०००/- | ४०००/- |
| ०३ | खडी | ०४ | ब्रास | २०००/- | ८०००/- |
| ०४ | स्टील | २५० | किलो | ४३/- | १०७५०/- |
| | | **एकूण रुपये** | | | **४१,५६०/-** |

**ब) मजूर खर्च :-**

| अ.नं. | मटेरीअलचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | क्रेनव्दारे विहीरीतील गाळ काढणे | ९७.०० | घ.मी. | १५५/- | १५०३५/- |
| ०२ | आर.सी.सी. कडे टाकणेकामी मजुरी दर (उंची दोन फुट प्रती कडे ) | ०६ | कडे | २५००/- | १५०००/- |
| | | **एकूण रुपये** | | | **३००३५/-** |
| | | एकूण खर्च - अ + ब | | | ७१५९५/- |
| | | अधिक ५% कन्टेनजन्सीज | | | ३५८०/- |
| | | **एकूण रुपये** | | | **७५१७५/-** |
| | | **पूर्णांकीत रुपये** | | | **७५,२००/-** |

वरीलप्रमाणे विहीरीचा गाळ काढणे व आर.सी.सी. कडे टाकणेकामी एकूण रु.७५,२००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त काम करणेकामी आवश्यक मटेरीअल खरेदी करणेकामी व काम मजूर ठेकेदारामार्फत करणेकामी येणारे रक्कम रु.७५,२००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव कोऱ्हाळे व कनकुरी येथील क्षेत्रातील विहीरीतील गाळ काढून विहीरीस आर.सी. सी. बांधकाम करणेसाठी आवश्यक मटेरीअल खरेदी करणेकामी व सदरचे काम मजूर ठेकेदारामार्फत करुन घेणेसाठी येणाऱ्या रक्कम रु.७५,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील कार्यालयाचे नुतनीकरण, अंतर्गत सजावटीसाठी फर्निचर तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत भक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी सन १९९४-९५ मध्ये "श्री साईबाबा भक्तनिवासस्थान" ही इमारत उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. सदर इमारतीतील खोल्या पूर्ण क्षमतेने गेल्या १८ वर्षापासून वापरणेत येत आहे. करीता सदरहू इमारतीमधील खोल्यांचे टप्प्याटप्प्याने नुतनीकरण करणेचे काम करणेबाबत ठरले आहे.

**०१.** प्रथम टप्प्यातील १०० खोल्यांचे नुतनीकरणाचे काम ठेकेदार यांचेमार्फत पूर्ण करणेत आले आहे.

**०२.** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.०९.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७५० अन्वये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील १०० खोल्यांचे खात्यामार्फत दुरुस्ती करणेकामी येणारे अंदाजे रुपये १५,१९,०२७/- मात्रचे खर्चास व याकामी आवश्यक असणारे मटेरियल व मजूरी दराची कामे विहित पध्दतीने कोटेशन / दरपत्रके मागवून करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानूसार १०० खोल्यांचे (संडास-बाथरुमचे) फ्रेम व दरवाजे मजूरी बसवून घेणेत आले आहेत. तसेच या १०० खोल्यांपैकी ७५ खोल्यांचे रंगकाम तिन टप्प्यात करुन घेणेत आले असून चौथ्या टप्प्यातील २५ खोल्यांचे रंगकाम हाती घेणेत येत आहे.

**०३.** दुसऱ्या टप्प्यातील २०० खोल्यांचे नुतनिकरणाचे कामासाठीचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

तसेच सदरहू इमारत व परिसराची मा. कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी यांनी पहाणी केली असता, सदरचे इमारतीमधील खोल्या वाटपासाठी असलेले काउंटर व कार्यालयीन बैठक व्यवस्थेसाठी नुतनिकरण व इंटेरियर फर्निचरचे काम करुन घेणेत यावे अशी सूचना केली आहे.

करीता श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये असलेले कार्यालय व रुम वाटप काउंटरचे नुतनिकरण व फर्निचरचे काम करुन घेणेकामी आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेत आले असून, त्यामध्ये खालील कामांचा समावेश करणेत आला आहे.

१. सुधारीत बुकींग काउंटर तयार करणे.

२. कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे बैठक व्यवस्थेसाठी अंतर्गत फर्निचर तयार करणे.
३. लोखंडी खिडक्यां ऐवजी ॲल्युमिनिअम सेक्शनमध्ये स्लायडींग विंडो तयार करणे.
४. जिप्सम फॉल्स् सिलींग व भिंतींना जिप्सम प्लास्टर करणे व लस्टर पेंटचे रंगकाम करणे.
५. कार्यालयात २' x२' आकाराची व्हिट्रीफाईड फरशी बसविणे.
६. भिंतींना २'x२' आकाराची सिरॅमिक टाईलमध्ये ४' उंचीचा डॅडो बसविणे.

उपरोक्त प्रमाणे करावयाचे कामांसाठी तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रुपये ११,१०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणारे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील कार्यालयाचे नुतनीकरण, अंतर्गत सजावटीसाठी फर्निचर तयार करणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ११,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं १३ श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीस रंगकाम करणे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२५ (नगरपंचायत मिळकत नंबर १६६६) क्षेत्र ४० आर मधील खाली नमूद केलेल्या इमारती अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांचे वापरासाठी देण्यांत आलेल्या आहेत.:

| अ. नं. | इमारतीचे नांव | बांधकामाचा प्रकार | वर्ग खोल्या | बांधकामाचे क्षेत्रफळ (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|
| ०१ | जुनी यु टाईप इमारत | पत्रा छत | ११ वर्ग खोल्या | ०७२०.०८ |
| ०२ | न्यु स्कुल इमारत (तळ+१ला मजला ) | आरसीसी | ०६ वर्ग खोल्या | ०३७५.१४ |
| ०३ | साईसरस्वती इमारत (तळ+१ला मजला ) | आरसीसी | १७ हॉल / खोल्या व ०३ स्वच्छतागृहे | १४४१.७८ |
| **एकुण.** | | | | **२५३७.००** |

वरिल तीन ही इमारती मिळून, २९ वर्ग खोल्या व ०४ हॉल्सचे मिळून एकुण बांधकाम क्षेत्रफळ २५३७ चौ. मी. आहे. सदरची जागा व इमारत रुग्णालय विस्तारीकरणासाठी संस्थानला आवश्यक असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८मे,२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१७ अन्वये संस्थानमार्फत नविन इमारतींचे बांधकाम करून सदरहू शाळेचे अन्यत्र स्थलांतरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

आता, उपमुख्याध्यापक, श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि. १५ मे, २०१२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, ".. या विद्यालयामध्ये शिर्डी व परिसरातील साधारणपणे ३५०० विद्यार्थी शिक्षण घेत असून, या इमारतीस संस्थानमार्फत रंगकाम करुन सुमारे ३२ ते ३३ वर्षे होवून गेलेली आहेत. त्यामुळे इमारतींचे रंगकाम निघून गेलेले असून, इमारती जुन्या दिसत आहे. इमारतींच्या योग्य प्रकारच्या जतन व संवर्धनासाठी आणि विद्यार्थ्यांच्या आनंदी व उत्साहपूर्ण वातावरण निर्मितीसाठी या इमारतीमधील वर्ग खोल्यांना व बाहेरील बाजूने रंगकाम करणे तसेच नांदुर्खी रस्त्याचे कडेने संरक्षक भिंत नसल्याने बाहेरील वाहने शाळेच्या मैदानावर ये-जा करत असतात, तसेच रात्रीचे वेळी निवाऱ्यासाठी लोक येवून झोपतात त्यासाठी संरक्षणाचे दृष्टीने सदरहू बाजूने संरक्षक भिंतीचे बांधकाम करुन लोखंडी गेट बसवून मिळणेबाबत विनंती केली आहे. "

उपरोक्त प्रमाणे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे इमारतींना आतिल व बाहेरील बाजूने रंगकाम करणे व नांदुर्खी रस्त्याचे कडेने संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेसाठी इकडील विभागामार्फत तयार करणेत आलेले सन २०११-१२ चे दरसुची (DSR) नुसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ. नं. | कामाचा तपशिल | अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१. | इमारतींचे आतिल बाजूने ओ. बी. डी. व ऑईलपेंटमध्ये रंगकाम करणे. | ५,४३,६८८.०० |
| ०२ | इमारतींचे बाहेरील बाजूने सिमेंटपेंटमध्ये रंगकाम करणे. | ६४,३२०.०० |
| ०३ | संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. | ५,७५,५८७.०० |
| | अधिक ५% कॉंटीन्जन्सीज | ५९,१८०/- |
| **एकुण अपेक्षित खर्च रुपये..** | | **१२,४२,७७५.००** |

तरी उपरोक्त विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.१२,४२,७७५/- खर्चास मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.६६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीस रंगकाम करणे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१२,४२,७७५/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. याकामी विहीत पध्दतीने जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.**

**तसेच श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय ही शाळा संस्थानकडे वर्ग करण्यासंदर्भात चर्चा करणेसाठी शाळेचे समिती सदस्य यांना समक्ष चर्चेसाठी आमंत्रित करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **द्वारकामाई धुनीसाठी लागणाऱ्या गोवरी-सरपण साठयाकरीता शेड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे दर्शनाकरिता येणारे साईभक्तांना द्वारकामाईतील पवित्र धुनीतून प्राप्त होणारी उदी (विभूती) प्रसादरुपाने दिली जाते. उदी तयार करण्यासाठी लागणाऱ्या गोवऱ्या ठेवणेसाठी भक्त निवासस्थानाचे (५०० रुम) बाजूस असलेल्या अधिकारी निवासस्थानालगत लोखंडी पत्र्याचे २४५५ चौ. फुट क्षेत्र असलेले शेड उभारणेत आलेले आहे. सदरचे शेड अपूरे पडत असल्याने अधिक्षक, मंदिर विभाग यांनी सरपण व गोवऱ्या ठेवणेकामी प्रत्येकी एक असे दोन मोठे शेड करुन मिळणेबाबत दि.१० डिसेंबर, २०११ चे टिपणीअन्वये कळविले आहे.

संस्थानचे स.नं. १२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारत परिसराचे नियोजित भांडार इमारतीलगत सदर परिसरात सरपण व गोवऱ्या ठेवणेकामीशेड उभारणेबाबत चर्चा झालेली आहे.

वरिल प्रमाणे गोवरी व सरपण साठ्याकरीता शेडचे बांधकाम संस्थानचे मध्यवर्ती भांडार इमारतीचे परिसरामध्ये ४५०० चौ. फुट. क्षेत्र असलेले तीन फुट उंचीच्या भिंतीवर पत्रे तसेच छतास कलरकोटेड शीट, एम.एस ग्रील व्हेंटीलेटर, रोलींग शटर इत्यादिसह शेड तयार करणेकामी सन २०११-१२ चे (DSR) दरसुचीनुसार अंदाजे रुपये १४,३५,६००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे काम करण्यासाठी येणारे अंदाजे रु.१४,३५,६००/- खर्चास व सदरचे कामी विहीत पद्धतीने जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, स.नं. १२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारत परिसराचे नियोजित भांडार इमारतीलगत द्वारकामाई धुनीसाठी लागणाऱ्या गोवरी-सरपण साठयाकरीता शेड तयार करणेसाठी विहीत पद्धतीने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१४,३५,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५** **श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारीत तयार केलेल्या प्रसंग चित्रांना फ्रेम तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे जिवन चरित्रावर आर्ट गॅलरी तयार करणेकामी आर्टिस्ट, श्री.व्ही.व्ही.सपार, सोलापूर, श्री.सुनील शेगांवकर, पुणे, श्री.हेमंत वाणी, शिर्डी व श्री. राजेंद्र जाधव, पुणे यांचेकडून ६ फुट x ४ फुट या आकारात एकूण ४५ नविन चित्र तयार करुन घेण्याचे मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये ठरले आहे. त्यानुसार वरिल आर्टिस्ट यांचेकडून विविध प्रसंगावर आधारित एकूण २० प्रसंगचित्र तयार करुन घेणेत येवून संस्थान परिसरात बसविणेत आलेले आहेत.

सदरचे चित्रांवर वातावरणातील धुलीचे कण, हवेतील बाष्प यामुळे परिणाम होऊन चित्रे खराब होण्याची शक्यता आहे. याकरीता पहिल्या टप्प्यात मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०११ चे सभेतील नि.क्र.३९९ अन्वये ८ चित्रांना फायबर फ्रेम करुन घेणेत आलेली आहे. उर्वरीत १२ प्रसंग चित्रांना सिन्थेटिक फायबर फ्रेम तयार करणेकरीता अंदाजे रु.१,८०,०००/- मात्र खर्च येईल. सदरचे काम अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेता येईल.

तरी याकरीता येणारे अंदाजे रु.१,८०,०००/- चे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारीत तयार केलेल्या प्रसंग चित्रांना फ्रेम तयार करणेचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **श्री साईप्रसादालय येथील २५० केव्हीए जनरेटर रुम पार्किंग शेड व मेंटेंनन्स ब्लॉक जवळील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय परिसरात मुख्य इमारतीचे लगत तसेच जनरल टॉयलेट, जनरेटर रुम चेजींग रुम अन्नदान कक्ष व पंपरुम या लहान मोठ्या इमारतीचे बाजुने पेव्हींग ब्लॉक बसविण्यात आलेले आहे. श्री साई प्रसादालय येथे नव्याने बांधण्यात आलेल्या मेन्टेनन्स ब्लॉक, पार्किंग शेड, तेल तुपाचे रिकामे डब्बे व बारदान ठेवणेकरीता उभारणेत आलेल्या शेडचे तसेच २५० केव्हीए जनरेटर रुम या इमारतीचे लगतचे मोकळ्या भागात पेव्हींग ब्लॉक बसविलेले नाही.सदरचे मोकळ्या भागात माती असल्याने पावसाळ्याचे दिवसात गवत उगवते त्यामुळे स्वच्छता राहत नाही. श्री साई प्रसादालय परिसरात स्वच्छता राखणेकामी परिसरातील उर्वरीत भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे.

सदरहू भागात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई प्रसादालय परिसरात उर्वरीत मोकळ्या जागेत खोदकाम करुन मुरुम भराई , सोलींग करुन त्यावर पेव्हींग ब्लॉक बसविणे एकूण क्षेत्र - ११०५.०० चौ.मी. | | | | |
| ०१ | खोदकाम -०.४५ मी. | ५००.०० | घ.मी. | ९०/- | ४५,०००/- |
| ०२ | मुरुम भराई -०.२० मी | २२१.०० | घ.मी. | १९२/- | ४२,४३२/- |
| ०३ | ०.१५ ते ०.२० मी जाडीचे सोलींग करणे | १६६.०० | घ.मी. | ५६७.५० | ९४,२०५/- |
| ०४ | खोदकामातून निघालेली माती ट्रॅक्टरव्दारे वाहतुक करणे | ५०० | घ.मी. | ७०.२५ | ३५,१२५/- |
| ०५ | ६० एम एम जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविणे | ८९० | चौ.मी. | ५०१.०० | ४,४५,८९०/- |
| ०६ | ८० एम एम जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविणे | २१५ | चौ.मी. | ६२५.०० | १,३४,३७५/- |
| | | रुपये | | | ७,९७,०२७/- |
| | | अधिक ५% कन्टेनजन्सीज | | | ३९,८५१/- |
| | | एकूण रुपये | | | ८,३६,८७८/- |
| | | **एकूण पुर्णाकींत रुपये** | | | **८,३७,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे मेटेनन्स ब्लॉक पार्किंग शेड, जनरेटर रुम व तेल तुपाचे रिकामे डब्बे व बारदान ठेवणेकरीता उभारणेत आलेले शेड या भागातील लगतचे मोकळ्या जागेत, कोणतेही वाहन जाणार नसल्याने ६० एम एम जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविता येईल. अन्नदान कक्षासमोर व दक्षिण बाजुकडील मोकळ्या जागेत वाहने जातत करीता सोबतचे नकाशात दर्शविलेप्रमाणे ८० एम एम जाडीचे पेव्हींग ब्लॉक बसविता येईल.

तरी श्री साईप्रसादालय परिसरातील स्वच्छता राखणे व परिसर सुशोभिकरणासाठी मोकळ्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकरीता येणारे अंदाजे रक्कम रु.८,३७,०००/- मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथील २५० केव्हीए जनरेटर रुम पार्किंग शेड व मेंटेनन्स ब्लॉक जवळील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी येणाऱ्या अंदाजे रु.८,३७,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. याकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविणेत याव्यात असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७ बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** बांधकाम विभागामार्फत संस्थान परिसरासह इमारतींचे दैनंदिन देखभाल दुरुस्ती केली जाते. या दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामासाठी आवश्यक असणारे सिमेंट सध्या बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी केले जाते.

सन २०१०-१२ मध्ये, मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार ४३ ग्रेड सिमेंट अल्ट्राटेक, ए.सी.सी., राजश्री बिर्ला, बिर्ला अे-१, बिर्ला गोल्ड व अंबुजा या कंपन्याचे अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागवून एकूण १५०० गोण्या सिमेंट बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेत आले असुन, याकामी रक्कम रुपये ३,८६,५००/- मात्र इतका खर्च आलेला आहे. सदर सिमेंट देखभाल दुरुस्तीसह, विभागांतर्गत करणेत येणाऱ्या कामांसाठी वापरणेत आलेले आहे.

आता, मागील वर्षाचे तुलनेत १५ टक्के वाढ गृहीत धरुन, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी, अंदाजे १७२५ गोणी सिमेंट विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेस व अंदाजे रुपये ३२०/- प्रति गोणी या दराने रक्कम रुपये ५,५२,०००/- फक्त खर्च अपेक्षित आहे.

तरी बांधकाम विभागामार्फत करणेत येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी व विभागांतर्गत कामांसाठी, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी अंदाजे १७२०/- गोण्या सिमेंट वर नमुद केलेल्या

कंपन्यांकडून थेट अथवा त्यांचे अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागवून आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेस व त्याकामी अंदाजित रक्कम रुपये ५,५२,०००/- मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदीकामी थेट कंपन्यांकडून अथवा त्यांचे अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागवून आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ५,५२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **वारंगळ पिरॅमिड मेडीटेशन ट्रस्ट, वारंगळ (आंध्र प्रदेश) यांनी मंदीर बांधणेसाठी बक्षीस रुपाने देऊ केलेली जागा स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** चेअरमन, दि वारंगळ पिरॅमिड मेडीटेशन ट्रस्ट, वारंगळ (आंध्र प्रदेश) यांनी मौजे वारंगळ (आंध्र प्रदेश) मधील त्या संस्थेच्या मालकीची २ एकर जागा श्री साई मंदिर बांधण्यासाठी संस्थानला दान म्हणून देणेबाबत त्यांचे दिनांक ०१ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या पत्राने प्रस्ताव दिलेला आहे.

संस्थानचे मौजे शिर्डी व्यतिरीक्त अन्य ठिकाणी मंदीर न बांधण्याचे धोरण आहे. त्यामुळे दि वारंगळ पिरॅमिड मेडीटेशन ट्रस्ट यांनी मौजे वारंगळ येथील २ एकर जागा दान रुपाने श्री साई मंदीर बांधण्यासाठी स्विकारणे उचित होणार नाही.

याबाबत खालील बाबीवर निर्णय होणेस विनंती आहे.

चेअरमन, दि वारंगळ पिरॅमिड मेडीटेशन ट्रस्ट, वारंगळ (आंध्र प्रदेश) येथील श्री साई मंदीर बांधणेसाठी दान म्हणून देऊ केलेली २ एकर जागा स्विकारणे अथवा ना स्विकारणे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, चेअरमन, दि वारंगळ पिरॅमिड मेडीटेशन ट्रस्ट, वारंगळ (आंध्र प्रदेश) यांनी मंदीर बांधणेसाठी बक्षीस रुपाने देऊ केलेली जागा स्विकारणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** खालील संस्थान कायम कर्मचाऱ्यांची रु.१०,०००/- चे पर्यंतचे खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बीले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे. सदर बीलांची संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये तपासणी करुन त्यानूसार छाणणी केल्यानंतर देय होणाऱ्या बीलांची तपशीलवार माहिती खालील तक्त्यात नमूद करण्यात आलेले आहे.

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. संजय फिलिप पाळंदे<br>**विभाग -** सा.भ.नि<br>**हुद्दा -** मदतनीस | वडील | CA Prostate | प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी | ११६७.०० | १०२७.०० | |
| २ | श्री. देवरे प्रशांत महादू<br>**विभाग -** साईनाथ हॉस्पिटल<br>**हुद्दा -** फार्मासिस्ट | आई | ह्दयविकार | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ३७७८.०० | ३७७८.०० | |
| ३ | सुर्वे वैशाली वसंत<br>**विभाग-** साईबाबा रुग्णालय<br>**हुद्दा -** परीचारीका | आई | मधूमेह / ह्दयविकार | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ४१८८.०० | ४१८८.०० | |
| ४ | श्री.तुपे कैलास उध्दवराव<br>**विभाग -** भांडार<br>**हुद्दा -** लिपिक | वडील | COPD-१ Bronchoscopy<br>(२) Pulmonary Function Test | जहांगिर हॉस्पिटल, पुणे | १५६७९.०० | १५६७९.०० | |
| ५ | श्री. गायकवाड संजय अर्जुन<br>**विभाग-** साईबाबा हॉस्पिटल<br>**हुद्दा -** वर्ग ४ कर्मचारी | वडील | ह्दयविकार | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ९७७०.०० | ९५०७.०० | |
| ६ | श्री. शेख नासिरहुसेन राजमहंमद<br>**विभाग -** विद्युत<br>**हुद्दा -** तारतंत्री | मुलगा | Ventriculitis -Endoscopic Management (N.A.hsc) | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई<br>रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २२९८९७.००<br>५०८२९५.०० | २१२७३७.००<br>४७२०००.०० | |
| ७ | वर्पे सविता चांगदेव<br>**विभाग-** साईबाबा हॉस्पिटल<br>**हुद्दा -** परीचारीका | आई | ह्दयविकार | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ८१२.०० | ८१२.०० | |

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | श्री. चौधरी बाळू भाऊसाहेब<br>**विभाग -** लेखाशाखा<br>**हुद्दा -** मदतनीस | पत्नी | Organophosphorus Poisoining | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ११६०६९.०० | ११६०६९.०० | |
| ९ | सोमण प्रणाली प्रमोद<br>**विभाग-** साईनाथ हॉस्पिटल<br>**हुद्दा -** परीचारीका | स्वतः | Arthoscopy | श्री हरी डायग्नोस्टिक सेंटर, कोपरगाव | १७७१९.०० | १७५९९.०० | |
| १० | श्री. वैराळ राजेंद्र देवराम<br>**विभाग-** संरक्षण<br>**हुद्दा -** पहारेकरी | पत्नी | B/L CA - Breast - Bone Scan | टाटा मेमोरीयल हॉस्पिटल, मुंबई | ४३००.०० | ३४४०.०० | |
| ११ | डॉ.एन.एस.म्हस्के<br>**विभाग-** साईबाबा हॉस्पिटल<br>**हुद्दा-**वैद्यकीय संचालक | स्वतः | मधूमेह / ह्दयविकार | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ३५२७.०० | ३५२७.०० | |
| १२ | डॉ. राठी व्ही. आर.<br>**विभाग-** साईनाथ हॉस्पिटल<br>**हुद्दा-**वैद्यकीय अधिकारी | स्वतः | Common Cold | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी | १०२७.०० | १०२७.०० | |
| १३ | डॉ. माने यशवंतराव वसंतराव<br>**विभाग-** प्रशासन शाखा<br>**हुद्दा-** उप कार्यकारी अधिकारी | वडील | ह्दयविकार | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ३१८९.०० | ३१८९.०० | |
| १४ | श्री.चौधरी श्रावण माधव<br>**विभाग -** बांधकाम<br>**हुद्दा -** वरीष्ठ लिपिक | स्वतः / पत्नी | सांधेदुखी / हायपोथायरॉईड | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ४२३१.०० | ३९७७.०० | |
| १५ | श्री. लाड अनंत मनोहर<br>**विभाग-** द्वरावती भक्तनिवास<br>**हुद्दा -** वरीष्ठ लिपिक | आई | आर्थोस्कोपी | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | ५२७२.०० | ५२७२.०० | |
| १६ | श्री. सोळसे बाबासाहेब जयराम<br>**विभाग -** आरोग्य<br>**हुद्दा -** वर्ग ४ कर्मचारी | मुलगी | Dorsolumbar Scoliosis without Neurodeficit | सायन हॉस्पिटल, मुंबई | ९३०५.०० | ६७२४.०० | |
| १७ | भोसले उषा रावसाहेब<br>**विभाग -** संरक्षण<br>**हुद्दा -** पहारेकरी | आई | ह्दयविकार | वृंदावन व अभिनव डायग्नोस्टिक, कोपरगाव | ७९९८.०० | ६५०८.०० | |
| १८ | श्री.खलील इस्माईल खान<br>**विभाग -**चौकशी<br>**हुद्दा -** मदतनीस | वडील | Rt wet ARHD (SRNVM) Lt Dry ARHD (Drasens) | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ३५००.०० | ३५००.०० | |
| १९ | श्री. सोमवंशी दत्तु रामनाथ<br>**विभाग -** प्रसादालय<br>**हुद्दा -** मदतनीस | स्वतः | DM with CVA IHD, LVF with Perf. Peritoitis with Gangering | के.ई.एम. हॉस्पिटल, पुणे | १३२३४५.०० | ९८६९६.०० | |
| २० | कै.कहांडळ बबन रावजी<br>**विभाग-** नविन भक्त निवास<br>**हुद्दा -** मदतनीस | मुलगी | मेंदूविकार | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी | २९०२९.०० | २८५७७.०० | |
| २१ | श्री. कासार रावसाहेब चंद्रभान<br>**विभाग -** प्रसादालय<br>**हुद्दा-** लिपिक टंकलेखक | मुलगा | Nuclear Test of Rt kidney | के.ई.एम. हॉस्पिटल, पुणे / Nuscint Diagnostics, Nashik | ३७७५.०० | ३५७१.०० | |

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | डिसोजा बॅसिल एन्थोनी<br>**विभाग -** इग्लीश मेडीयम स्कूल<br>**हुद्दा -** सहाय्यक शिक्षक | स्वत: | Ca of Laringophyran-gea | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ८१२५६.०० | ७६४९४.०० | |
| २३ | श्री. डोखे मधुकर भिवाजी<br>**विभाग -**साईनाथ रुग्णालय<br>**हुद्दा -** वार्डबॉय | मुलगी | Idiopathic Isosexual Central Precocious Puberty | श्री साईनाथ हॉस्पिटल | ४४१००.०० | ४४१००.०० | |
| २४ | श्री. आंत्रे जालिंदर मोहन<br>**विभाग-** नविन भक्त निवास<br>**हुद्दा -** मदतनीस | आई | मधुमेह / ह्दयविकार | श्री साईबाबा हॉस्पिटल | २७४०.०० | २७४०.०० | |
| २५ | श्री. दहातोंडे शशिकांत विलास<br>**विभाग -** प्रशासन शाखा<br>**हुद्दा -** मदतनीस | आई | ह्दयविकार | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३६२.०० | ३६२.०० | |
| | | | | **एकूण रक्कम रु.** | **१२४३३३०.००** | **११४५१००.००** | |

तरी उपरोक्त बीलांबाबत पुढील आदेश होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावास मान्यता देणेत आली. मात्र अ.नं.०८ चे कर्मचारी श्री. चौधरी बाळू भाऊसाहेब, मदतनीस, लेखाशाखा विभाग यांचे पत्नीच्या उपचारासाठीचे बीलाची देय रक्कम रु. १,१६,०६९.०० ऐवजी रु.१,१४,०६९.०० मात्र देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२० श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता Revolving Chair, Personnel Locker व S/S Cupboard खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील काही विभागांनी खालीलप्रमाणे Revolving Chair व S/S Cupboard ची मागणी केलेली आहे.

| अ. नं. | मागणी | विभागाचे नाव | डी.पी.क्र. व दिनांक | संख्या | मागणीचे कारण | अंदाजे दर प्रती नग रु. | एकुण अंदाजे रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | Revolving Chair with half circle back rest. | श्री साईनाथ प्रशासकीय कार्यालय | १९०-०२/०५/२०१२ | ०३ | संगणकावर काम करणेकामी नविन मागणी | ३०००.०० | ९०००.०० |
| | | श्री साईबाबा हॉस्पिटल रेडीओलॉजी | २८/०५/२०१२ | ०१ | नविन मागणी | ३०००.०० | ३०००.०० |
| ०२ | S/S Cupboard | श्री साईबाबा हॉस्पिटल मार्केटींग विभाग | ५४९-२४/०३/२०१२ | ०२ | फाईल्स व इतर साहित्य ठेवण्यासाठी नविन मागणी | १४५६४.०० | २९१२८.०० |
| | | श्री साईबाबा हॉस्पिटल CVTS Substore | १०३२-०३/०३/२०१२ | ०४ | स्टेन्ट, बलुन व इतर साहित्य ठेवण्यासाठी नविन मागणी | १४५६४.०० | ५८२५६.०० |
| | | श्री साईबाबा हॉस्पिटल Clinical PFT Lab | ०८/०६/२०१२ | ०१ | मटेरीयल ठेवण्यासाठी नविन मागणी | १४५६४.०० | १४५६४.०० |
| ०३ | Personnel Locker ६ Compartment | श्री साईबाबा हॉस्पिटल जनरल ओ.टी. | २८/०५/२०१२ | २ | नविन मागणी | १०३९६.०० | २०७९२.०० |
| | | श्री साईबाबा हॉस्पिटल कॅज्युएल्टी | २८/०५/२०१२ | १ | नविन मागणी | १०३९६.०० | १०३९६.०० |
| | | | | | **एकुण रु.** | | **१,४५,१३६.००** |

वरीलप्रमाणे फर्नीचर खरेदीकामी अंदाजे रु.१,४५,१३६/- इतका खर्च अपेक्षित आहे. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाकरीता हॉस्पिटल व ऑफीस फर्नीचर खरेदीकामीचा अंदाजे रक्कम रु.८,३०,४६४/- चा प्रस्ताव दि.०६/०४/२०१२ रोजीचे त्रीसदस्य समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे. सदरचे खरेदीमध्ये वरीलप्रमाणे लागणारे Revolving Chair, S/S Cupboard व Personnel Locker ची संख्या वाढवून चर्चा / वाटाघाटी करुन खरेदी करता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे Revolving Chair, S/S Cupboard व Personnel Locker चर्चा / वाटाघाटीनंतरचे मंजुर दराने खरेदीस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०६.०४.२०१२ रोजी त्रिसदस्य समिती सभेपुढे श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता Revolving Chairs, Personnel Locker व S/S Cupboard इ.खरेदी करणेकामी झालेल्या मान्यतेनुसार, पुरवठाधारकांशी समक्ष चर्चा / वाटाघाटी करतेवेळी रु.८,३०,४६४/- मात्रचे खरेदीमध्ये आणखी रु.१,४५,१३६/- मात्र एवढया जादा रकमेच्या फर्निचरची, वाढीव संख्येनुसार खरेदी करण्यास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२१ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा विभागासाठी Fully Automatic Biochemistry Analyser मशिन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.२७/०४/२०१२ रोजीचे मागणी पत्रान्वये १ नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिनची मागणी केलेली आहे. कारण सध्या सदर विभागाकडे Biochemistry Analyser साठी एक मशिन उपलब्ध असून ते सन २००५ मध्ये खरेदी केलेले आहे. त्यावर दररोज सरासरी प्रत्येक तासाला २०० ते २५० तपासण्या कराव्या लागतात त्यामुळे सदर मशिनवर जास्त प्रमाणात बोजा पडत आहे तसेच सदर मशिन मध्ये काही कारणास्तव अचानक बिघाड झाल्यास सर्व तपासण्याचे काम बंद पडते व कामाची गैरसोय होते. त्यामुळे अजून एक मशिन घेतल्यास तपासण्या विभागून जातील व दैनंदिन तपासण्यांना वेळ लागणार नाही तसेच जुन्या मशिनवर कामाचा बोजा देखील पडणार नाही.

श्री साईनाथ प्रयोगशाळा विभागासाठी मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई यांचेकडून इकडील पत्र क्र.२७६५ दि.०९/०९/२०११ अन्वये एक नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिन रु.११,०६,७००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले आहे. तेंव्हा श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी खरेदी करावयाचे मशिनसाठी देखील अंदाजे रु.११,०६,७००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी १ नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिन विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.११,०६,७००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी १ नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिन विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन, निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.११,०६,७००/- चे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२२ श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता थ्री सिटर चेअर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिसेविका कार्यालयाने दि.२८/०५/२०१२ रोजीचे मागणी पत्रकान्वये २५ नग गोदरेज कंपनीच्या थ्री सिटर चेअरची मागणी केलेली आहे. सदरच्या चेअर ह्या ओ.पी.डी. विभागात पेशंटला बसण्यासाठी तसेच ॲडमिट पेशंटच्या नातेवाईकांना बसण्यासाठी आवश्यक आहेत. कारण सध्या असलेल्यापैकी काही चेअर ह्या वापरुन खराब झालेल्या आहेत. तसेच रुग्णांची संख्या देखील वाढलेली आहे त्यामुळे रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक यांना बसण्यासाठी सध्या असलेल्या थ्री सिटर चेअर हया कमी पडतात.

सदर थ्री सिटर चेअर खरेदीकामी अंदाजे दरासाठी M/s.Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune यांना दुरध्वनीवरुन दरपत्रक देण्यास सांगितले होते, तेंव्हा त्यांनी दि.२६/०६/२०१२ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे प्रती नग रु.८४०१/- (सर्व करांसह) इतके दर कळविलेले आहेत. त्यानुसार एकुण २५ नग थ्री सिटर चेअर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.२,१०,०२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता २५ नग थ्री सिटर चेअर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. २,१०,०२५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता २५ नग थ्री सिटर चेअर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,१०,०२५/- मात्र चे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नव्याने संगणक व संगणकीय साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.साईबाबा हॉस्पिटल व श्री.साईनाथ रूग्णालयाकरीता पुरवठा आदेशानुसार संगणकिय साहित्य व संगणकिय जाळयाची उभारणी करणेकामी आय.टी. विभागामार्फत M/s.Allied Digital and Services Mumbai यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कार्यादेशानुसार वापरात असलेले संगणकिय साहित्य कालबाहय व तांत्रिक दृष्टया निकामी झालेले असल्याने सदरचे संगणक व संगणकिय साहित्य संस्थानचे विहित पदध्तीने टप्या-टप्याने विक्री करणेस संदर्भ क्रं.२चे टिपणीनुसार मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावर आय.टी. विभागाचे अभिप्रायानुसार अंतर्गत लेखापरिक्षण विभागा मार्फत प्रचलित पध्दतीने कार्यवाही पुर्ण करावी, असे मा. उप-कार्यकारी अधिकारी सो.,यांनी निर्देश दिलेले आहे.

सदर निर्देशानुसार कालबाहय व तांत्रिक दृष्टया निकामी झालेले संगणक व संगणकिय साहित्य विक्री करणेपुर्वी आपणास श्री.साईबाबा हॉस्पिटल व श्री.साईनाथ रूग्णालयाकरीता नव्याने संगणक व संगणकिय साहित्य विहित पध्दतीने खरेदी करणे अत्यावशक आहे,असे नम्र मत आहे. त्यादृष्टीने मा. वैद्यकिय संचालक सो., यांचे आदेशाने संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान सल्लागार श्री. विजय मंडोरा यांचे मार्गदशनानुसार संगणक साहित्याचे Technical Configuration बनविण्यात आले असुन ते खरेदी करणे पुर्वी Software Vendor चा अभिप्राय घेणेत येऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी असे मत स्थानिक तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांनी दि. १३/०७ /२०१२ रोजीच्या ई-मेल द्वारे कळविले आहे.

त्यानुसार संगणकिय साहित्याचे Technical Configuration हे Sofscript Software Ltd., Mumbai यांना कळविण्यातआले आहे. सदरचे Technical Configuration हे Suitable for running CAREWORKS.Net Version at your Hospital असा अभिप्राय संदर्भ क्रं ४ चे ई-मेल द्वारे दि.१४/०७/२०१२ रोजी कळविले आहे. परंतु दि.१३/०७/२०१२ रोजी Sofscript Software Ltd., Mumbaiयांनी पाठविलेल्या प्रस्तावामध्ये ई-मेल मध्ये उल्लेख केले प्रमाणे मुदयाचा समावेश नसल्याकारणाने दोन्ही रूग्णालयाकरीता सॉफ्टवेअर संबधी येणारा खर्च Sofscript Software Ltd., Mumbai यांचेकडुन निश्चीत झाले नंतरच आपणास नविन संगणकिय साहित्य खरेदी विहीत पध्दतीने करता येईल, तो पर्यंत हॉस्पिटल मधील अत्यावश्यक सेवेचा विचार करीता आपणास ई-मेल द्वारे खालील तपशिलातील कळविलेले संगणकिय साहित्य खरेदी करण्यात यावे ,असे संस्थानचे मानद तांत्रिक सल्लागार श्री. विजय नायडु यांनी कळविले आहे.

| Sr. No. | Description | Make/ Brand | Qty |
|---|---|---|---|
| A | System Configuration 2nd generation dual core cpu 4 GB RAM,500 GB Hard Disk keyboard optical mouse DVD/ writer 18.5 “L.E.D monitor 3 yrs on site warranty. | Hp/Lenovo/Dell | 10 |
| B | Printer Laser Jet (2 yrs on site warranty) | Canon 2900 | 5 |
| C | Dot Matrix Printer (2Yrs on site warrenty including printerhead) | LQ 300, 24Pin | 5 |
| D | UPS 600VA OFFLINE WITH 15 MIN backup (2yrs onsite warrenty including battery) | APC/NUMERIC/V-GUARD | 10 |

तरी श्री साईबाबा हॉस्पिटल करीता वरील तपशिलात उल्लेख केले प्रमाणे संगणक संच, प्रिटर्स व युपीएस ची दैनंदिन कामकाजासाठी अडचण भासत आहे. त्यादृष्टीकोनातुन श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता स्थानिक तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांचे ई-मेल मध्ये उल्लेख केलेल्या Technical Configuration चे तपशिलाप्रमाणे नव्याने संगणकिय साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रूपये ४,७५,०००+टॅक्स (अक्षरी चार लाख पंच्चाहत्तर हजार रूपये + टॅक्स मात्र ) इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी हॉस्पिटलमधील अत्यावश्यक सेवेचा विचार करता सध्यस्थितीत श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता आवश्यकतेनुसार लागणारे संगणक संच,प्रिटर्स व युपीएस उपरोक्त तपशिलाप्रमाणे

विविध पुरवठा धारकाकडुन संस्थानचे विहीत पध्दतीनुसार कोटेशन मागवून सदरचे कोटेशन हे मा. उप-कार्यकारी अधिकारी सो., यांचे समक्ष उघडुन त्यातील न्यूनत्तम कोटेशन धारकाकडून वरील तपशिलातील संगणकिय साहित्य खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रूपये ४,७५,०००/- + टॅक्स (अक्षरी रूपये चार लाख पंच्चाहत्तर+टॅक्स मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी आवश्यक असलेले संगणक संच, प्रिंटर्स, यु.पी.एस. इ. खरेदी करणेसाठी पुरवठाधारकांकडून कोटेशन्स मागणी करण्यात यावेत व विहीत पध्दतीने खरेदी करण्यात यावी, असे ठरले. तसेच सदरचे खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रूपये ४,७५,०००/-+ टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२४ एमबीबीएस पदवीधारक इंटर्न प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचे विद्यावेतनात वाढ करणे बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०३.०१.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०५(३९) अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलसाठी १६ इंटर्न डॉक्टर्स महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडून घेणेस मान्यता देणेत आलेली आहे.

तथापि, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी श्री साईबाबा रुग्णालयाकरीता डॉ. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेज, अहमदनगर यांचेकडून २५ एमबीबीएस पदवीधारक इंटर्न प्रशिक्षणार्थी डॉक्टर इंटर्नशिपसाठी पाठविणेस मान्यता दिली असल्याचे नं. एमयूएचएस/युजी/ई-१/२३६९/२०१०, दि.२६.०७.२०१० रोजीचे पत्रान्वये डॉ. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेज, अहमदनगर यांना कळविले आहे.

सध्या श्री साईनाथ/श्री साईबाबा हॉस्पीटलकडे एकूण ०७ एमबीबीएस पदवीधारक इंटर्न डॉक्टर्स कार्यरत असून त्यांना मा. त्रिसदस्यीय समितीचे ०६/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र३०६ नुसार दरमहा रुपये २५५०/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे पन्नास मात्र) विद्यावेतन (स्टायपेंड) देण्यात येत आहे.

आता महाराष्ट्र शासनाचे निर्णय क्रमाकःपीजीएम-१०११/प्र.क्र.१७६/११/शिक्षण-२,मंत्रालय, मुंबई-३२, दि.११ मे २०१२ अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

शासन निर्णयः- राज्यातील शासकिय वैद्यकिय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील आणि शासन अनुदानीत आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील आंतरवासीय प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन दिनांक ०१/०४/०२०१२ पासून दरमहा रु. २५५०/- वरुन दरमहा रु.६०००/- इतके करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयानुसार विद्यावेतनामध्ये रु. २५५०/- वरुन रु. ६०००/- इतकी वाढ मिळावी, अशी विनंती श्री साईबाबा हॉस्पीटलकडील इंटर्न प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स प्रसन्न कुलकर्णी, जितेंद्र गांधी, अव्दैत वैद्य, अकाशदिप वाघमारे, संग्राम शेटे यांनी केली आहे.

तरी, श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेमार्फत पाठविण्यात येणाऱ्या एमबीबीएस पदवीधारक इंटर्न प्रशिक्षणार्थी डॉक्टर्स यांना वरील शासन निर्णयाप्रमाणे विद्यावेतनामध्ये रु. २५५०/- वरुन रु. ६०००/- इतकी वाढ करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, एमबीबीएस पदवीधारक इंटर्न प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचे विद्यावेतन रु.२५५०/- वरुन रु.६०००/- वाढ करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२५ साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात वर्कशॉप करीता तातडीने केलेल्या Albuminus Sirolimus (DE) Stent च्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात Bifurcation Stent च्या शस्त्रक्रिया करणे कामी दि.०३/०४/२०१२ रोजी येथील Greece नामवंत कार्डीयोलॉजिस्ट Dr. Gregory यांचे मार्गदर्शनाखाली वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते. सदर वर्कशॉपमध्ये Bifurcation Stent च्या तीन शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. त्यामध्ये विशिष्ट प्रकारचे Envision Scientific कंपनीचे Albuminus - Sirolimus (DE) Stent वापरतात सदर स्टेंन्ट हा Biodegradble Matrics of Polylacted (Lacted Family Polymer) चा निर्मित केलेला आहे. ज्यामुळे रुग्णांना Thrombosis होण्याची भिती कमी प्रमाणात होते. त्यामुळे सदर स्टेंन्ट तातडीने खरेदी करुन बसविण्यात आलेले आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| अ.नं. | पेशंटचे नाव | शस्त्रक्रियेची दिनांक | नग संख्या | वापरणारे डॉक्टरांचे नाव | आय.पी.डी. नंबर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री पाटील गजानन काशिराम | ०४/०४/२०१२ | २ | डॉ. वर्मा | ६४५१८ |
| २ | श्री. पाटील सुरेश नरसिंह | ०४/०४/२०१२ | १ | डॉ. वर्मा | ६४४९५ |
| ३ | श्री. अहीरे नामदेव रतन | ०३/०४/२०१२ | १ | डॉ. बजाज | ६४४७४ |

सदर Stent करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. परंतू मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२८/०७/२००७ निर्णय क्र.५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

सदर Albuminus- Sirolimus (DE) Stent करीता डॉ. बजाज यांनी दि.०३/०४/२०१२ चे पत्रान्वये आणि डॉ. वर्मा यांनी देखील मागणी पत्रान्वये मागणी केली होती. आपणाकडे सन २०११-१२ या वर्षात Albuminus- Sirolimus (DE) Stent स्टेंन्ट On Consignment Basis वर ठेवण्यात आलेला नव्हता सदर स्टेंन्ट हा वेगळ्याच प्रकारचा आहे तेंव्हा सदर स्टेंन्ट M/s. Heart Beat Intervention Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून खरेदी करुन बसविण्यात आलेले आहे.

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | 14 | 30/04/2012 | 40000.00 |
| 2 | M/s. Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | 15 | 30/04/2012 | 40000.00 |
| 3 | M/s. Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | 16 | 30/04/2012 | 40000.00 |
| 4 | M/s. Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | 17 | 30/04/2012 | 40000.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **160000.00** |

उपरोक्त अ.नं. १ व २ या रुग्णांना सदर स्टेंन्ट बसविण्याच्या शस्त्रक्रियेकरीता जीवनदायी योजने अंतर्गत मंजुरी मिळालेली असून अ.नं. ३ यांनी सदर शस्त्रक्रियेसाठी आलेला खर्च संस्थानला जमा केलेला आहे. त्यांच्या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे -

| अ. नं. | रुग्णाचे नाव | जीवनदायी योजनेची मंजूरी | शस्त्रक्रियेसाठी झालेला खर्च रक्कम रु. | जीवनदायी योजने अंतर्गत मंजूर रक्कम रु. | रुग्णाने जमा केलेली रक्कम रु. | रुग्णालयाने दिलेली सूट रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.पाटील गजानन काशिराम | महाराष्ट्र शासन, उपसंआसे नाशिक/ लेखा-५/ जीवनदायी योजना/ १३७६९-७०/ २०१२ दि.२७/०३/२०१२ | १५७०००.०० | १५००००.०० | ७०००.०० | १५०००.०० |
| २ | श्री.पाटील सुरेश नरसिंह | महाराष्ट्र शासन, उपसंआसे नाशिक/ लेखा-५/जीवनदायी योजना/ १५१५८-५२/ २०१२ दि.३०/०३/२०१२ | १४२०००.०० | १५००००.०० | | |
| ३ | श्री. अहीरे नामदेव रतन | | ८८०००.०० | | | ८८०००.०० |

तरी उपरोक्त रुग्णांसाठी वापरलेल्या ४ नग Albuminus - Sirolimus (DE) Stent च्या बीलाची रक्कम रु. १,६०,०००/- M/s. Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat यांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर Albuminus- Sirolimus (DE) Stent च्या खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.६८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात वर्कशॉप करीता तातडीने केलेल्या Albuminus Sirolimus (DE) Stent च्या खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता रबर मॅट खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** बी.व्ही.जी.इंडिया एलटीडी, पुणे यांना श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे स्वच्छतेचे टेंडर देण्यात आले आहे. सध्या पावसाळा चालु असल्यामुळे व रुग्णालयात स्वच्छता राहावी यासाठी त्यांनी रबर मॅटची दि. ०६.०६.२०१२ रोजीचे पत्रान्वये इकडील कार्यालयास मागणी केली आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाचे मेट्रन ऑफीसने देखील डी.पी. नं. ९२८ दि. १३.०७.२०१२ व डी.पी. नं.

९२५ दि. ०५.०७.२०१२ अन्वये मागणी केली आहे. पावसाळा चालु असल्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे गेट व बाथरुम समोर टाकणेकामी रबर मॅट खरेदी करणे गरजेचे आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. नं. | तपशील | साईज | खरेदी नग | अंदाजे किंमत प्रति नग रु. | एकूण किंमत रु. | विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | होल मॅट - रबर डोअर मॅट SSH | ५x३.५ फुट (रंग काळा) | २२ नग | १०००.०० | २२०००.०० | श्री साईनाथ रुग्णालय- संडास / बाथरुम पॅसेजसमोर |
| २ | होल मॅट - रबर डोअर मॅट BVG | १५x०४ फुट (रंग काळा) | ०८ नग | ३०००.०० | २४०००.०० | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय मेनगेट समोर |
| ३ | होल मॅट - रबर डोअर मॅट BVG | ०६x०४ फुट (रंग काळा) | ०६ नग | १२००.०० | ७२०००.०० | श्री साईबाबा रुग्णालय- संडास / बाथरुम पॅसेजसमोर |
| ४ | होल मॅट - रबर डोअर मॅट BVG | ०४x०२ फुट (रंग काळा) | ०८ नग | ८००.०० | ६४००.०० | |
| **(अक्षरी रक्कम रु. एक लाख चोवीस हजार चारशे मात्र ) एकूण रक्कम रु.** | | | | | **१,२४,४००.००** | |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे खरेदी करणेकामी अंदाजे रु. ०१,२४,४००/- (अक्षरी रु. एक लाख चोवीस हजार चारशे) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त रबर मॅट विहीत पद्धतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ०१,२४,४००/- (अक्षरी रु. एक लाख चोवीस हजार चारशे) पर्यंतचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता रबर मॅट विहीत पद्धतीने कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ०१,२४,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. २७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीव गांधी आरोग्य योजनेकामी इंटरनेट सुविधा व त्याकामी लागणारे हार्डवेअर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये शासनाची राजीव गांधी आरोग्य योजने करीता मान्यता मिळालेली आहे.सदर योजना ही पुर्णत: On Line असल्यामुळे सदर योजना श्री साईबाबा संस्थान रूग्णालयामध्ये राबविणेकामी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील अधिकारी वर्गाचे पथक अभ्यास दौरा करणेकामी हैद्राबाद येथे गेले होते .सदर ठिकाणी त्यांनी राजीव गांधी योजना कार्यान्वीत असलेल्या रूग्णालयाची पाहणी करून राजीव गांधी आरोग्य योजनेचा सविस्तर अभ्यास केला त्यात प्रामुख्याने अपोलो हॉस्पिटल, सिकंदराबाद, निम्स हॉस्पिटल, ग्लोबल हॉस्पिटल, निजाम इन्स्टुट ऑफ मेडीकल सायन्स, हैद्राबाद यांचा समावेश होता. सदर ठिकाणी उपरोक्त योजना ही पुर्णतः On Line असल्या कारणाने सदर ठिकाणी इंटरनेट कामी १० MBPS INTERNET LEASE LINE घेण्यात आलेली आहे

तथापि, राजीव गांधी आरोग्य योजने संबधी काम करणाऱ्या एम .डी. इंडीया या कंपनीकडे विचारणा केली असता त्यांनी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात एकुण चार Terminals वरती कामकाज चालणार असुन त्यासाठी प्रत्येकी २ MBPS INTERNET LEASE LINE ची गरज असल्याचे त्यांनी संदर्भ क्रं.२ चे ई-मेल द्वारे कळविले आहे. सदरचे संदर्भ क्रं.२ चे ई-मेल नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयात एकुण चार Terminals करीता एकुण ८ MBPS INTERNET LEASE LINE लागेल असे सुचविले आहे. तसेच या व्यतिरिक्त आपणास रूग्णालयामध्ये Telerediology, On Line Sonography Reports, Blood Bank,On Line Connectivity for Software,Antivirus,E-mail इत्यादी या करीता सदर LEASE LINE वापरता येईल. त्या दृष्टीकोनातुन श्री. साईबाबा हॉस्पिटल व श्री.साईनाथ रूग्णालयातील दिवसेदिवस वाढती रूग्णाची संख्या लक्षात घेता सदर कामी कामकाज जलद गतीने होणेचे दृष्टीकोनातुन १० MBPS INTERNET LEASE LINE घेणे योग्य राहील, असे नम्र मत आहे.

सदर १० MBPS INTERNET LEASE LINE करीता BSNL विभागाकडे चौकशी केली असता त्यांनी संदर्भीय टिपणी सोबत दर पत्रक सादर केले आहे. परंतु मा. कार्यकारी अधिकारी सो ., व माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांचेशी झालेल्या चर्चेनुसार व त्यांनी संदर्भ क्रं १चे टिपणीवरील दिलेल्या निर्देशानुसार संस्थानचे साईटेक प्रकल्पामध्ये घेण्यात आलेल्या Reliance,Airtel या Internet Service Provider यांचेकडुन १० MBPS INTERNET LEASE LINE दर मागविण्यात आले असुन त्यापैकी प्राप्त झालेल्या कंपन्याकडुन कोटेशन /E-mail द्वारे दर मागवुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे सादर केला आहे .

| Sr. No. | Company Name | Particulars | Qty. | Total Amount +Tax |
|---|---|---|---|---|
| 1 | BSNL | (1:1 NON ISP) 16 IP Address. | 1 | 8,82,400/-+Tax |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **Media-OFC** | | |
| 2 | Reliance | Dedicated Broad-Band Line 8 IP Address. **Media-RF** | **1** | 9,00,000/-+Tax |

वरील दरपत्रकाचा अभ्यास करता व त्यांचेशी झालेले समक्ष चर्चअंती वरील कळविलेले दर हे मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे वाटाघाटी करुन निश्चीत करता येतील. तसेच उल्लेख केलेले दर हे एक वर्षाकरीता असुन सदर कामाकरीता लागणारे हार्डवेअर व त्यांचे Configuration संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री.विजय मंडोरा यांनी ई-मेल द्वारे कळविले असुन ते आपणास बाहेरील पुरवठा धारकाकडून विहित पध्दतीने खरेदी करावे लागणार आहे. तसेच आपणास सदर कामी Internet Service Provider या कंपनी कडुन OFC व Media Converter व इतर आवश्यक ते साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.६,५००००/- + टॅक्स इतका खर्च अपेक्षीत आहे.

वरील सर्व एकत्रीत खर्चाचा विचार करता राजीव गांधी आरोग्य योजने करीता आवश्यक असणा-या १० MBPS INTERNET LEASE LINE करीतां अंदाजे रक्कम रुपये १५,५०,०००/-+ Tax (अक्षरी पंधरा लाख पन्नास हजार रूपये मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदरचा खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीव गांधी आरोग्य योजनेकामी इंटरनेट सुविधा देणाऱ्या कंपनीधारकास पुढील सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलाविण्यात यावे, व त्याकामी लागणारे हार्डवेअर पुरवठाधारकांकडून विहीत पध्दतीने खरेदी करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. २८ रुग्णालयांकरिता तज्ञ वैद्यकिय अधिकारी, सी.एम.ओ., आर.एम.ओ. आदि पदे भरणेकामी दि.२९.०७.२०१२ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीचे अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार रुग्णालयांकरीता खालील पदे भरणेकामी अर्ज मागविणेसाठी दि. २१/०६/२०१२ रोजीचे द. इंडियन एक्सप्रेस या वर्तमान पत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३०/०६/२०१२ देण्यात आलेली होती.

सदर जाहिरातीस अनुसरुन संबंधीत पदांसाठी मुदतीत व मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जदार उमेदवारांच्या प्र. वैद्यकीय संचालक यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर, जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर, वैद्यकीय प्रशासक, श्री साईबाबा हॉस्पिटल व संबंधीत क्षेत्रातील तज्ञ यांची समिती स्थापन करावी. सदरचे पदांकरीता दि. २९/०७/२०१२ रोजी मुलाखती घेऊन मुलाखतीचा अहवाल मान्यतेसाठी त्रिसदस्यीय समितीचे पुढील सभेमध्ये सादर करावा, अशी सूचना मा. त्रिसदस्यीस समितीचे दि. १८/०७/२०१२ रोजीचे सभेमध्ये करण्यात आली.

त्यास अनुसरुन अर्जदार उमेदवारांच्या मुलाखती दि. २९/०७/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता श्री साईनिवास अतिथीगृह (मिटींग हॉल) येथे खालील तज्ञांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या आहेत.

| **अ.नं.** | **नाव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | डॉ. एन. एस.म्हस्के | प्र. वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी. |
| २ | डॉ. नितूरकर सो. | जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर |
| ३ | डॉ. कौशिक मकवाना | वैद्यकिय प्रशासक, श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी. |
| ४ | प्रोफे. डॉ. एस. जी. गंदगे | रेडिओलॉजी विभाग प्रमुख, प्रवरा मेडिकल स्ट्रस्ट लोणी |
| ०५ | डॉ. राहुल प्र. मोदगी | न्यूरो सर्जन, श्री साईबाबा हॉस्पीटल,शिरडी |
| ०६ | डॉ. व्ही. रामाराव | व्हिजीटींग आर्थो तज्ञ, श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी. |
| ०७ | डॉ आर.व्ही. प्रभाकरराव | वरिष्ठ भूलतज्ञ, श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी |
| ०८ | डॉ. रचना सुनिल साबळे | वैद्यकिय अधिकारी (बाल रोग तज्ञ) श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी. |

जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर हे काही कारणास्तव मुलाखती घेणेकरीता येवु शकले नाही.

मुलाखती घेणेत आलेल्या उमेदवारांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. नं. | पदाचे नाव | भरावयाची पद संख्या | मुलाखतीस आलेले एकूण अर्ज संख्या | मुलाखती हजर उमेदवाराचे नाव | शैक्षणिक पात्रता | गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | NEUROSURGEON (मेंदू शल्य विशारद) | ०१ | ०१ | डॉ हितेंद्र बाजीराव गडकरी | एमबीबीएस-१९८७<br>एमएस(जन सर्जरी)-१९९१<br>एमसीएच(न्युरो)-१९९५ | ३५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | UROSURGEON (मुत्रपिंड विकार शस्त्रक्रिया तज्ञ) | ०१ | ०० | --------- | --------- | --------- |
| ३ | SR. RADIOLOGIST (व. क्ष किरण शास्त्रज्ञ) | ०१ | ०० | --------- | --------- | --------- |
| ४ | PEDIATRICIAN (बालरोग तज्ञ) | ०१ | ०१ | डॉ शितल तुळशिराम कोल्हे | एमबीबीएस-२००४ एमडी(बालरोगतज्ञ)-२००८ | ३२ |
| ५ | MEDICAL OFFICER (Orthopaedic Surgeon) वैद्यकिय अधिकारी (आर्थोपेडीक सर्जन) | ०२ | ०७ | डॉ संदिप नारायण देवरे | एमबीबीएस-२००३ एमएस(आर्थो)-२०१० | ३५ |
| | | | | डॉ राहुल रविंद्र बागुल | एमबीबीएस-२००० एमएस(आर्थो)-२००५ | ३४ |
| | | | | डॉ नितीन माधवराव वर्पे | एमबीबीएस-२००३ डीएनबी(आर्थो)-२०१० डी आर्थो (सीपीएस)-२०११ | ३२ |
| | | | | डॉ समिर प्रकाश देशमुख | एमबीबीएस-२००३ एमएस(आर्थो)-२००८ | २९ |
| | | | | डॉ सचीन चांगदेव सोनवणे | एमबीबीएस-२००३ एमएस(आर्थो)-२००९ | २९ |
| ६ | PHYSICIAN (वैद्यकीय उपचार तज्ञ ) | ०१ | ०२ | --------- | --------- | --------- |
| ७ | OPHTHALMOLOGIST (नेत्र विकार तज्ञ) | ०१ | ०१ | डॉ मनिषा उमेषचंद्र आग्रवाल | एमबीबीएस-२००० डीओएमएस-२००२ डीएनबी(ऑफ्थल)-२००५ एफसीपीआरएस-२०११ | २४ |
| ८ | SR.INTENSIVIST (वरिष्ठ अतिदक्षता तज्ञ) | ०२ | ०० | --------- | --------- | --------- |
| ९ | JR. RADIOLOGIST (क. क्ष किरण शास्त्रज्ञ)/ MEDICAL OFFICER (SONOLOGIST) | ०२ | ०३ | डॉ नितीन दिलीपराव आहेर | डीएमआरई(सीपीएस)-२०११ | २८ |
| | | | | डॉ तुषार एकनाथराव पगार | एमबीबीएस-२००४ डीएमआरई(सीपीएस)-२००९ | २७ |
| | | | | डॉ महेश मधुकर वर्पे | एमबीबीएस-२००७ डीएमआरई(सीपीएस)-२०१२ | १८ |
| १० | JR.ANAESTHESIOLOGIST (कनिष्ठ भूलतज्ञ) | ०१ | ०२ | डॉ सम्राट अशोक पारख | एमबीबीएस-२००९ डीए(सीपीएस)-२०१२ | २५ |
| | | | | डॉ अमृता आनंदराव देशमुख | एमबीबीएस-२००९ डीए(सीपीएस)-२०१२ | २० |
| ११ | CMO (अपघात कक्ष अधिकारी) | ०४ | ०१ | --------- | --------- | --------- |
| १२ | RMO (निवाशी वैद्यकीय अधिकारी) | १० | १३ | डॉ किरण मच्छिंद्र औताडे | एमबीबीएस-२०११ | २० |
| | | | | डॉ नितीन राजकुमार बडदे | एमबीबीएस-२०१० | १९ |
| | | | | डॉ हर्षल अजबराव पाटील | एमबीबीएस-२०११ | १८ |
| | | | | डॉ मधुकर मारोतीराव पतंगे | एमबीबीएस-२००२ डी सी एच-२००७ | १८ |
| | | | | डॉ प्रशांत दिलीप काळे | एमबीबीएस-२००९ डी आर्थो - २०१२ | १८ |
| | | | | डॉ पंकज सुभाषचंद्र कारेमोरे | एमबीबीएस-२००३ डी आर्थो (सीपीएस)-२००६ एफसीपीएस(आर्थो)-२००८ | १४ |
| | | | | डॉ अमोद प्रकाश शेठ | एमबीबीएस-२००८ | ११ |
| | | | | डॉ सारंग अर्जुन बोरुडे | एमबीबीएस-२००९ डी आर्थो (सीपीएस)-२०१२ | ०९ |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. १, ४, ५, ९, १० चे पदांसाठी ४० गुणांची तसेच अ.नं. ७ व १२ चे पदांसाठी ३० गुणांची मुलाखत घेण्यात आलेली आहे. सदर मुलाखतीमध्ये उमेदवारांना मिळालेले गुण स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेले असून संबंधीत पदांवर मेरिटनुसार उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे. त्याचा पदनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

**(१) NEUROSURGEON (मेंदू शल्य विशारद)-** या पदाचे एका जागेसाठी दोन अर्ज आलेले होते. त्यापैकी डॉ. हितेंद्र बाजीराव गडकरी हे मुलाखतीसाठी उपस्थित असल्याने या पदासाठी मुलाखत घेऊन त्यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे सदरचे पदावर नेमणूकीकरीता निवड करण्यात आली आहे.

**(२) UROSURGEON (मुत्रपिंड विकार शस्त्रक्रिया तज्ञ)-** या पदासाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही.

**(३) SR. RADIOLOGIST (वरिष्ठ क्ष किरण शास्त्रज्ञ)-** या पदासाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही.

**(४) PEDIATRICIAN (बालरोग तज्ञ)-** या पदाचे एका जागेसाठी डॉ. शितल तुळशिराम कोल्हे यांचा एकमेव अर्ज असल्याने या पदासाठी त्यांची मुलाखत घेऊन त्यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे सदरचे पदावर नेमणूकीकरीता निवड करण्यात आली आहे.

**(५) MEDICAL OFFICER (Orthopaedic Surgeon) वैद्यकिय अधिकारी (आर्थोपेडीक सर्जन)-** या पदाचे दोन जागेसाठी एकूण सात अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी पाच उमेदवार मुलाखतीसाठी हजर होते. सदर उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यापैकी डॉ. संदीप नारायण देवरे व डॉ. राहुल रविंद्र बागुल यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे सदरचे पदावर नेमणूकीकरीता निवड करण्यात आली आहे.

**(६ ) PHYSICIAN (वैद्यकीय उपचार तज्ञ)-** या पदासाठी दोन अर्ज प्राप्त झालेले होते. परंतु एकही उमेदवार मुलाखतीसाठी हजर नव्हते.

**(७) OPHTHALMOLOGIST (नेत्र विकार तज्ञ)-** या पदाचे एका जागेसाठी डॉ. मनिषा उमेशचंद्र अग्रवाल यांचा एकमेव अर्ज असल्याने या पदासाठी त्यांची मुलाखत घेऊन त्यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे सदरचे पदावर नेमणूकीकरीता निवड करण्यात आली आहे.

**(८) SR.INTENSIVIST (वरिष्ठ अतिदक्षता तज्ञ)-** या पदासाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही.

**(९) JR. RADIOLOGIST (कनिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ) / MEDICAL OFFICER (SONOLOGIST)-** या पदाचे दोन जागेसाठी जाहिरातीनुसार दोन व जाहिरातीनंतर एक अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर तीनही उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यापैकी डॉ. नितीन दिलीपराव आहेर यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे व डॉ. तुषार एकनाथराव पगार यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे नेमणूकीकरीता निवड करण्यात आली आहे.

**(१०) JR.ANAESTHESIOLOGIST (कनिष्ठ भूलतज्ञ) -** या पदाचे एका जागेसाठी एकूण दोन अर्ज प्राप्त झालेले असून दोन्ही उमेदवारांच्या मुलाखती घेऊन डॉ. सम्राट अशोक पारख यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे सदरचे पदावर नेमणूकीकरीता निवड करण्यात आली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलकडील डॉ. सचीन खोचीकर यांनी एक महिना पूर्व राजीनामा नोटीस सादर करुन दि. ०१/०८/२०१२ अखेर पासून राजीनामा मंजूर करणेस विनंती केली आहे. त्यांचे राजीनामा झालेनंतर त्यांचे जागेवर नेमणूक करणेसाठी डॉ. अमृता आनंदराव देशमुख यांचे नाव प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात आले आहे.

**(११) CMO (अपघात कक्ष अधिकारी)-** या पदासाठी एक अर्ज प्राप्त झालेला होता. परंतु सदर उमेदवार मुलाखतीसाठी हजर नव्हते.

**(१२) RMO (निवाशी वैद्यकीय अधिकारी)-** या पदाच्या दहा जागांसाठी एकूण तेरा अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी आठ उमेदवार मुलाखतीसाठी हजर होते. सदर उमेदवारांच्या मुलाखती घेऊन डॉ. किरण मच्छिंद्र औताडे, डॉ. नितीन राजकुमार बडदे, डॉ. हर्षल अजबराव पाटील, यांची श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी व डॉ. मधुकर मारोतीराव पतंगे, डॉ. प्रशांत दिलीप काळे, डॉ. पंकज सुभाषचंद्र कारेमोरे यांची श्री साईनाथ रुग्णालयासाठी नेमणूकीकरीता निवड करण्यात आली आहे.

उपरोक्त प्रमाणे संबंधीत पदांसाठी मुलाखती घेणेत आलेल्या उमेदवारांना नेमणूका देणेबाबत सदर समितीने खालील शिफारसी केलेल्या आहेत.

१. NEUROSURGEON, PEDIATRICIAN, MEDICAL OFFICER (Orthopaedic Surgeon), OPHTHALMOLOGIST, JR. RADIOLOGIST/MEDICAL OFFICER (SONOLOGIST), JR. ANAESTHESIOLOGIST या पदासाठी मुलाखतीमधून निवड करण्यात आलेल्या उमेदवारांनी सध्याच्या प्रचलीत वेतनापेक्षा जास्त वेतनाची मागणी केलेली आहे. सध्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी व कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी यांना एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता नेमणूक देऊन अनुक्रमे मासिक रु. ३५,००० व रु. ३२,००० देण्यात येत आहे. त्याऐवजी त्यांना संबंधीत पदासाठी मंजूर असलेला वेतनबॅन्ड व ग्रेड पे देऊन त्यांच्या नेमणूका कराव्यात.

तसेच यापूर्वी एक वर्ष कालावधीसाठी फिक्स पे वर नेमणूक दिलेल्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी व कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी यांना संबंधीत पदाचा वेतनबॅन्ड व ग्रेड पे लागू करावा.

२. मुलाखती घेण्यात आलेल्या आर एम ओ या पदाचे उमेदवारांच्या प्रथम एक वर्षासाठी प्रत्येकी मासिक रु. २७,०००/- फिक्स पे देऊन नेमणूका कराव्यात.

३. श्री साईनाथ रुग्णालयाकडे कनिष्ठ भूलतज्ञाची आवश्यकता असल्याने सदरचे एक पदाचा समावेश जाहिरातीमध्ये करण्यात आला होता. परंतु, दरम्यानचे कालावधीत श्री साईबाबा हॉस्पीटलकडील कनिष्ठ भूलतज्ञ डॉ. सचीन खोचीकर यांनी राजीनामा नोटीस दिलेली आहे. त्यांचे जागेवर श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कनिष्ठ भूलतज्ञाची आवश्यकता भासणार असल्याने प्रतिक्षा यादीवर असलेले डॉ. अमृता आनंदराव देशमुख यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कनिष्ठ भूलतज्ञ या पदावर नेमणूक करावी.

४. उपरोक्त मुलाखतीमधून निवड केलेल्या उमेदवारांपैकी एखादा उमेदवार कामावर हजर होणेस इच्छूक नसल्यास त्या जागेवर मुलाखतीच्या यादीतील त्यापुढील उमेदवाराची मेरीटनुसार निवड करावी.

५. ज्या पदांवर उमेदवार उपलब्ध झाले नाहीत, अशा पदांची नव्याने जाहिरात देण्यात यावी. नव्याने जाहिरात प्रसिध्द होईपर्यंत सध्याच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज आल्यास सदर अर्जदार उमेदवारांच्या वैद्यकिय संचालक यांनी मुलाखती घ्याव्यात व नेमणूकीबाबत पुढील कार्यवाही करावी.

उपरोक्तप्रमाणे तज्ञ समितीने नेमणूकीसंदर्भात शिफारसी केलेल्या आहेत.

**निर्णय क्र.६८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तज्ञ समितीने नेमणूकीसंदर्भात केलेल्या शिफारसी मान्य करण्यात येऊन निवड झालेल्या उमेदवारांना वेतनबँडनुसार १ वर्ष कालावधीसाठी नेमणूका देण्यात याव्यात.**

**तसेच, सध्या फिक्स पे वर नेमणूका देण्यात आलेल्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी यांना दि.०१.०९.२०१२ पासून संबंधीत पदासाठी मंजूर असलेला वेतनबँड व ग्रेड पे लागू करणेत येऊन त्याप्रमाणे वेतन देण्यात यावे, तसेच यापुढे तज्ञ वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी या पदाच्या नेमणूका वेतनबँड व ग्रेड पे देऊन कराव्यात असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. २९** **लॅप्रोस्कोपी कॅमेरा दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयाचे जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता इकडील पुरवठा आदेश क्र. १४४३१/ २००९ दि. २६/११/२००९ अन्वये मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी या कंपनीचे भारतातील तेव्हांचे अधिकृत विक्रेते मे. चिमको इंटरनॅशनल, मुंबई यांचेकडून विविध प्रकारचे इंडोस्कोपी इस्ट्रुमेंट व कॅमेरा सेट एकुण रू. ९,७५,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपला आहे. सदर इस्ट्रुमेंट सेटची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जाते. परंतु दुरुस्तीकरीता जर काही स्पेअर पार्ट बदलणेची आवश्यकता असेल तेव्हा पुरवठाधारक कंपनीकडुन दुरुस्त करुन घेतले जातात.

सध्या जनरल ऑपरेशन थिएटर विभागातील एक Telecam Camera नादुरुस्त झाल्यामुळे दि. १२/०६/२०१२ रोजी मे. कार्ल स्टोअर्ज, एडोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली यांचे इंजिनीअरने कॅमेराची तपासणी करणेकामी आले असता त्यांनी सर्व्हिस रिपोर्ट क्र. १५८४० दि. १२/०६/२०१२ अन्वये सदर Telecam Camera दुरुस्तीकरीता कंपनीकडे पाठविणेची आवश्यकता असल्याचे सांगीतले. त्यामुळे इकडील पत्र क्र. ८२० दि. १८/०६/२०१२ अन्वये सदर Telecam Camera दुरुस्तीकरीता कंपनीकडे पाठविण्यात आला आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र क्र. KSMH २२०६१२०२३५७ दि. २६/०६/२०१२ अन्वये Telecam Camera दुरुस्तीकरीता सर्व करांसहीत एकुण रु. ६६,८८३/- (अक्षरी रु. सहासष्ट हजार आठशे त्र्याऐंशी मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची आगाउ मागणी केली आहे. सदर दुरूस्तीसाठी कंपनी सहा महीन्यांची वॉरंटी देत आहे. सदर लॅप्रोस्कोपी व युरोलॉजी इस्ट्रुमेंट सेटकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट फक्त मे. कार्ल स्टोअर्ज, एडोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली यांचेकडेच मिळतात.

तरी मे. कार्ल स्टोअर्ज, एडोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली यांचेकडुन Telecam Camera दुरुस्त करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ६६,८८३/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. कार्ल स्टोअर्ज, एडोस्कोपी इं. प्रा. लि., नवी दिल्ली यांचेकडुन Telecam Camera दुरुस्त करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ६६,८८३/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. ३०** **श्री साईनाथ रुग्णालयाचे विविध वॉर्डमध्ये वाढीव सेंट्रल मेडीकल गॅस पाईपलाईनचे आऊट लेट बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयातील इमारत क्र. १ करीता सन ११९१ साली तेंव्हाची आय.ओ. एल. इंडीया लि. मुंबई व सध्याची मे.डॅटेक्स ओमेडा लि.मुंबई यांचेकडून सेंट्रल मेडीकल गॅस पाईपलाईन सिस्टीम बसविणेत आली होती. तसेच इकडील कार्यादेश क्र. १२२०९ दि. ०१/१०/२००९ अन्वये इमारत क्र. ०२ करीता सेंट्रल मेडीकल गॅस पाईपलाईन सिस्टीम व इमारत क्र. ०१ करीता काही मेडीकल गॅस आउलेट व अलार्म सिस्टीम बसविणेत आली असुन नियमीत वापरात आहे. सिस्टीमची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जाते आहे. परंतु दुरुस्तीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट संबंधीत पुरवठाधारक कंपनीकडुन खरेदी केले जातात.

श्री साईनाथ रुग्णालयाने त्यांचे दि. २७/०३/२०१२ चे मागणी पत्रान्वये विविध वॉर्डस् मध्ये सेंट्रल ऑक्सीजन व व्हॅक्युम आउटलेट बसवुन मिळणेबाबत कळविले आहे. त्यानुसार ऑक्सीजन व व्हॅक्युम आउटलेट प्रत्येकी ३० नग बसविणे कामी करावी लागणारी पाईपलाईन व अन्य आवश्यक बाबीकरीता अशाप्रकारच्या मेडीकल गॅस पाईपलाईनची कामे करणारे पुरवठाधारंक मे. युनायटेड सर्जिकल, ठाणे यांचे कडे विचारणा केली असता त्याचे इंजिनीअरने प्रत्यक्ष पाहणी करून त्याचे दि. २५, २६/०६/२०१२ व १०/०७/२०१२ चे पत्रान्वये सर्व करांसहीत अंदाजे एकुण रू. ४,७१,२६२/- (अक्षरी रू. चार लाख एक्काहत्तर हजार दोनशे बासष्ट मात्र) इतक्या रक्कमेचे कोटेशन पाठविले आहे. परंतु अशा प्रकारचे कामे करणाऱ्या विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून सदरचे काम विहित पध्दतीने निम्नतम दराने करून घेता येईल, असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रूग्णालयातील विविध वॉर्डमध्ये मेडीकल गॅस आउटलेट व पाईपलाईन विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून निम्नतम दराने बसवुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. ४,७१,२६२/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रूग्णालयातील विविध वॉर्डमध्ये मेडीकल गॅस आउटलेट व पाईपलाईन विविध कंपन्यांकडुन कोटेशन मागणी करून निम्नतम दराने बसवुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. ४,७१,२६२/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं. ३१ श्री.धनाजी जगन्नाथ बेडके, ऑडिओलॉजीस्ट, श्री साईनाथ रुग्णालय यांना अध्ययनासाठी असाधारण रजा मिळणेबाबत व या कालावधीत दर आठवडयाला (रविवारी) श्री साईनाथ रुग्णालयात व्हीजीट देणेकरीता व्हीजीट फी मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/५३२३/२०१० दि. ०४/१२/२०१० अन्वये श्री धनाजी जगन्नाथ बेडके यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे ऑडिओलॉजीस्ट, या पदावर नेमणूक करण्यात आली असून, जा. नं. एससएसएस/एसएसबीएच/एचआर/२९/२०१२ दि. १०/०४/२०१२ त्यांना दि. १४/०२/२०१२ पासून संस्थान सेवेत कायम करण्यात आले आहे.

श्री धनाजी जगन्नाथ बेडके, ऑडिओलॉजीस्ट, श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि. ०३/०७/२०१२ रोजीचे अर्जान्वये एम.ए.एस.एल.पी. मास्टर ऑफ ऑडिओलॉजीस्ट अॅन्ड स्पीच लँग्वेज पॅथॉलॉजीस्ट (श्रवण व वाचा तज्ञ) हे उच्च शिक्षण घेणेकरीता दि. ०१/०८/२०१२ ते दि. ३१/०७/२०१४ अखेर दोन वर्ष कालावधीसाठी विनावेतन असाधारण रजा मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.

सदरच्या उच्च शिक्षणानंतर संस्थान नियमानुसार मी तीन वर्ष सेवा देणेस तयार असून, तीन वर्षे सेवा न दिल्यास मी तीन महिन्यांचे वेतन संस्थानमध्ये जमा करील. तसे बंधपत्र मी संस्थानला लिहून देईल. माझ्या सेवेचा कालावधी ०१ वर्षे ०६ महिने झालेला असल्याने मला नियमाप्रमाणे अध्ययन रजा (पगारी) देय नाही. अध्ययन रजेच्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून आपण परवानगी दिल्यास मी पंधरा दिवसातून एकदा श्री साईनाथ रुग्णालयात येऊन सेवा देण्यास तयार आहे. तरी मे साहेबांनी मला माझ्या उच्च शिक्षणासाठी दि. ०१/०८/२०१२ ते दि. ३१/०७/२०१४ पर्यंत दोन वर्षे कालावधीसाठी विनावेतन असाधारण रजा मंजूर करावी, अशी विनंती श्री बेडके यांनी केली आहे.

वैद्यकिय अधिक्षक श्री साईनाथ रुग्णालय यांनी त्यांचेकडील दि. ०५/०७/२०१२ रोजीचे टिपणीमध्ये श्री. बेडके यांना दोन वर्ष कालावधीसाठी उच्च शिक्षणास सोडल्यास दैनंदिन रुग्णांची गैरसोय होईल. तसेच इतरही कर्मचारी अशा प्रकारच्या दीर्घकालीन असाधारण रजेची मागणी करतील असे वाटते असे नमूद केलेले आहे.

सदर टिपणीवर वैद्यकिय संचालक यांनी पुढीलप्रमाणे शेरा दिलेला आहे. Discussed with Dy E.O. Leave Sanctioned without pay. Agreed to conduct Audiology O P D once in a week.

त्यानंतर श्री बेडके यांनी त्यांचे दि. ०३/०७/२०१२ रोजीचे अर्जाचे अनुषंगाने दि.२८/०७/२०१२ रोजी खालीलप्रमाणे अर्ज सादर केला आहे. मी पंधरा दिवसा ऐवजी प्रत्येक आठवड्याला दर रविवारी व्हिजीट द्यायला तयार आहे. मी शिक्षणाला पुण्याला असल्याने मला दर रविवारी पुण्यावरुन यावे लागेल. तरी मे. साहेबांनी २००० ते २५०० रुपये व्हिजीटींग फी देऊन उपकृत करावे ही नम्र विनंती. ज्यामुळे शिक्षण घेत असतांना मला आर्थिक व शैक्षणिक झळ सोसावी लागणार नाही.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २१/११/२०१० रोजीचे सभेत अध्ययन रजेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

सभेतील निर्णय क्र. ९३२ नुसार श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकिय अधिकारी, स्टाफ नर्स, पॅरामेडिकल स्टाफ व इतर कर्मचारी यांना अध्ययन असाधारण रजेवर सोडतांना खालीलप्रमाणे नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

१) पहिले कर्मचारी परत आलेनंतरच एका वेळी दोन परीचारीका, एक वैद्यकिय अधिकारी, एक पॅरामेडीकल कर्मचारी व इतर पैकी एक असे कर्मचारी असाधारण रजेवर सोडणेस सेवाजेष्ठतानुसार परवानगी देणे.

२) उच्च शिक्षण झालेनंतर किमान ०३ वर्ष संस्थान सेवा करावी लागेल. तसे रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन घेणे.

३) रजेच्या कालावधीत त्यांना कोणतेही वेतन, भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

४) रजा कालावधीत त्यांना आवश्यक असणारा ०५ वर्षाचा सेवा कालावधी नसल्यास त्यांची सेवा जेष्ठता कोणत्याही प्रकारे सुरक्षित राहणार नाही.

५) रजा कालावधी संपुष्टात आल्यानंतर रजेचा नियमीत करणे अथवा भत्ते, वेतन वगैरेसाठी साईबाबा संस्थानचे मा. व्यवस्थापन मंडळ, मा. न्यायालय अथवा फोरम समोर त्यांना दाद मागता येणार नाही.

६) उच्च शिक्षणाचा कालावधी संपताच त्यांनी कामावर त्वरीत हजर होऊन ०३ वर्षापर्यंत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीस सेवा द्यावी लागेल. अगर ०३ वर्षाची सेवा करणार नसलेस ०३ महिन्यांचे वेतन संस्थानमध्ये जमा करावे लागेल.

वरील प्रमाणे नियमावली आहे. सदरचे नियमावलीमध्ये अटी-शर्ती क्र. ३- रजेच्या कालावधीत त्यांना कोणतेही वेतन, भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत अशी आहे.

श्री बेडके यांनी श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रत्येक दर रविवारी व्हिजीट देणेस तयार असून मला प्रति व्हिजीट रु. २,००० ते रु. २,५०० मिळावे, अशी विनंती केली आहे. तसेच वैद्यकिय संचालक यांनी श्री बेडके यांना प्रति व्हिजीट रु. १,०००/- देण्यात यावे, असे सुचविले आहे.

तरी उपरोक्त नमुद केलेल्या नियमावलीनुसार श्री धनाजी जगन्नाथ बेडके, ऑडिओलॉजीस्ट श्री साईनाथ रुग्णालय यांना एम.ए.एस.एल.पी या उच्च शिक्षणासाठी दि. ०१/०८/२०१२ ते दि. ३१/०७/२०१४ या दोन वर्षाचे कालावधीसाठी सोडणेबाबत तसेच त्यांना दर आठवड्याला (रविवार) व्हिजीट फी देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.धनाजी जगन्नाथ बेडके, ऑडिओलॉजीस्ट, श्री साईनाथ रुग्णालय एम.ए.एस.एल.पी. या उच्च शिक्षणासाठी दि. ०१/०८/२०१२ ते दि. ३१/०७/२०१४ या दोन वर्षाचे कालावधीसाठी रजा मंजुर करण्यात यावी मात्र या कालावधीत दर आठवडयाला (रविवारी) श्री साईनाथ रुग्णालयात व्हीजीट देणेकरीता व्हीजीट फी मिळणेबाबतची विनंती अमान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२** **मौजे कोऱ्हाळे येथील सर्व्हे नं.९७ मधील डाळींब बागेची खोती देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मौजे - कोऱ्हाळे, तालुका- राहाता येथील सर्व्हे नं ९७ पै. मधील खातेदार चौधरी यांचे मालकीचे एकुण ०१ हे ६२ आर क्षेत्र दिनांक १४/०१/२०११ रोजी खरेदी करण्यात आलेले आहे.

सदरच्या खरेदी करण्यात आलेल्या क्षेत्रात अंदाजे ६०० ते ७०० डाळींबाची झाडे आहेत. या ठिकाणी एक विहीर असुन सदरच्या विहीरीवर पाण्याची सोय आहे. सदरचे क्षेत्रात कोणत्या विकास प्रकल्प प्रस्तावित नसल्याने या ठिकाणची बाग तशीच ठेवता येईल. डाळींब बागेसाठी वारंवार औषधांची आवश्यक असते. ०३ वर्ष मुदतीसाठी स्थानिक बागवान / फळविक्रते / लगतचे शेतकरी यांच्या कडून दर बाबतचे दरपत्रके घेवून खोती देता येईल. जेणे करुन बागेची मशागत होईल व खत औषधांचा खर्च पण खोतीदाराला करावा लागेल.

मागील वर्षी या बागेची खोती देण्यात आलेली होती. सदरची खोतीची मुदत माहे-सप्टेंबर १२ अखेर संपत आहे. मौजे-कोऱ्हाळे येथील डाळींब बागेच्या जागेवर सध्या दुसऱ्या कोणत्याही कामाचा प्रस्ताव नसल्याने या बागेची ०३ वर्षची कालावधीसाठी खोती देता येईल.

तरी सदरचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३३** **शिर्डी येथील सर्व्हे नं. १२४ मधील चिक्कू बागेची खोती देणे बाबत**

**प्रस्ताव-** मौजे-शिर्डी, तालुका राहाता येथील सर्व्हे नं १२४ मधील ०१ हेक्टर २० आर क्षेत्र संस्थाने दिनांक १२/१०/२००७ खरेदी केलेले आहे. या क्षेत्रामध्ये फळबाग असून यामध्ये चिक्कू २०२ झाडे, नारळ १३ झाडे, आंबे १५ झाडे, रामफळ ०८ झाडे, सिताफळ ०६ झाडे, जांभूळ ०४ झाडे, चिंच ०१ व इतर ०५

झाडे आहेत. या पैकी चिक्कू झाडांची ०२ वर्षासाठीची खोती देणेकामी स्थानिक बागवान / फळविक्रते यांच्या कडून दरपत्रके घेवून खोती देता येईल. जेणे करुन बागेची मशागत व्यवस्थित राहील.

मागील वर्षी ०१ कालावधीची चिक्कू झाडांची खोती बागवान / फळविक्रेते यांचेकडून दरपत्रक घेवुन चिक्कु बागाची खोती रु.६७,०००/ रक्कमेला श्री.साहेबखॉं सब्जेखॉं पठाण, शिर्डी यांना देण्यात आलेली होती. सदर खोतीची मुदत जुलै-१२ अखेर संपलेली आहे.

सध्या चिक्कु बागेच्या जागेवर दुस-या कामाचा कोणताही प्रस्ताव नसल्याने ०२ वर्षाची कालावधी साठी बागेची खोती देता येईल. चिक्कू बागेची खोती देणेसाठी स्थानिक फळविक्रेते व बागवान यांचे कडून दरपत्रके घेवुन चिक्कू बागेची खोती देता येईल.

तरी सदर प्रस्तावावर निर्णय होणस विनंती.

**निर्णय क्र.६८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४ एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक पाणी नमुने तपासणीकामी नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाकडिल कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परीसरामध्ये विविध ठिकाणी वितरित केले जाते. सदरचे पाणी शुध्द होऊन ते पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याच्या नमुन्यांची लॅबमध्ये तपासणी होणे आवश्यक असल्याने त्याची पाणी पुरवठा विभागाकडिल लॅबमध्ये अणुजीव व रासायनिक पध्दतीने तपासणी केली जाते. तसेच अहमदनगर येथील जिल्हा आरोग्य केंद्रात पाणी नमुने अणुजीव तपासणी करीता दर महिन्याला पाठविले जातात. याशिवाय एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची याकामी पाणी नमूने तपासणीसाठी (रासायनिक व अणुजीव) नेमणूक करण्यात आलेली होती व त्यांचेकडून पाणी नमुने तपासणीचा दरमहा अहवाल मागविला जात आहे. व त्यांनी केलेल्या सुचना अमलात आणून पाणी शुध्दीकरणासाठी उपाय योजिले जातात.

पाणी पुरवठा विभाग दि.१५.१२.२०१२ रोजीचे मंजुर टिपणीन्वये एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक यांना दि.०१.०१.२०१२ ते दि.३१.१२.२०१२ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करणेसाठी टिपणी सादर करण्यात आलेली होती. यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.०१.२०१२ निर्णय क्रं. १०३ नुसार यावर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"पाणी तपासणीकामी संस्थानची स्वतंत्र लॅब तयार करणेकामी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, दरम्यानचे काळात मे. एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांना दि. ०१.०१.२०१२ पासून पूढे सहा महिने कालावधीसाठी पूर्वीचेच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले."

त्यानुसार एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक यांना दि.०१.०१.२०१२ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी पूर्वीचेच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात आली होती. एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक यांची मुदत माहे जुन-२०१२ अखेर संपलेली आहे. एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांनी पुन्हा पुर्वीचे दर व अटीशर्तीप्रमाणे पुढील कालावधीसाठी पाणी तपासणी करणेची तयारी दर्शविलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्देशाप्रमाणे संस्थानची पाणी तपासणी लॅब कार्यरत असुन, त्यामध्ये पाण्याची तपासणी करणेत येत आहे. एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांचे ९.५ वर्षाचे काम समाधानकारक असल्याने तसेच पाणी शुध्दीकरणांकरीता त्यांचे मार्गदर्शनाची आपणास आवश्यकता असल्याने त्यांना मुदतवाढ देणेबाबत नम्र मत आहे.

तरी एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांना पूर्वीचेच अटीशर्तीप्रमाणे त्यांना प्रती शॅम्पल रुपये ८००/- मात्र दरमहा ०४ शॅम्पल + रुपये १७५/- मात्र व्हीजीट चार्ज + सर्व्हीस टॅक्ससह दिनांक ०१-०८-२०१२ ते दिनांक ३१-१२-२०१२ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करणेसाठी मान्यता मिळावी.

**निर्णय क्र.६८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि.नाशिक यांची पूर्वीचेच अटीशर्तीप्रमाणे प्रती शॅम्पल रुपये ८००/- मात्र दरमहा ०४ शॅम्पल + रुपये १७५/- मात्र व्हीजीट चार्ज + सर्व्हीस टॅक्ससह दिनांक ०१-०८-२०१२ ते दिनांक ३१-१२-२०१२ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५ संस्थान परिसरासाठी पाणी पुरवठा करणेकामी भाडोत्री टँकर लावणेचे खर्चास व कनकुरी साठवण तलावात पाणी घेणेकरीता खरेदी करण्यात आलेल्या मटेरियलचे खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे सर्व विभागांना व परिसरातील इमारतींना कनकुरी साठवण येथील साठवण तलावातून पाणी पुरवठा करण्यात येतो. कनकुरी साठवण तलाव ते ओहर हेड टँक येथून साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), व्दारावती, श्री साईप्रसादालय इमारत, रुग्णालय साईप्रसाद इ. ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

**पाणी पुरवठा योजनेचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.नं. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| ०१ | पाणी पुरवठा योजना कधीपासून कार्यान्वित करणेत आली. | सन १९९२ |
| ०२ | महिन्याला इरिगेशन विभागाकडुन घेण्यात येणारे सरासरी पाणी. | १२,५९,१०,३३३ लिटर्स. |
| ०३ | साठवण तलावाची क्षमता. | ३३२ एम.एल.डी. |
| ०४ | साठवण क्षमता किती दिवस पुरते. | ४० ते ४५ दिवस. |
| ०५ | साठवण तलावात उन्हाळयात अथवा गर्दीच्या काळात किती दिवस पाणी पुरते. | ३० ते ३५ दिवस. |
| ०६ | २४ तासात अंदाजे किती दिवस पाणी पुरवठा करण्यात येतो. | ३८ ते ४० लाख लिटर्स. |

कनकुरी साठवण तलाव दि. १३.०५.२०१२ रोजी पुर्ण क्षमतेने भरून घेण्यात आलेला होता. परंतू दि.१३.०६.२०१२ रोजी साठवण तलावातील पाणीसाठा २ फुट शिल्लक असल्याने तलाव पुर्ण क्षमतेने भरुन मिळणेसाठी पाटबंधारे विभागास पत्र देण्यात आलेले होते. याबाबत सिंचन शाखा, शिर्डी यांचे कडुन उपरोक्त संदर्भिय पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी सध्या दारणा धरणात अत्यल्प पाणीसाठा असल्याने पाणी सोडणे शक्य होणार नाही. तरी आपण आपलेकडील उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

यावर उपाय-योजना म्हणून पाणी वापर काटकसरीने करणेबाबत परिपत्रक ठिकठिकाणी लावण्यात आलेले आहेत. बगीचासाठी बोअरवेल व विहीरीच्या पाण्याचा वापर करणेबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच श्री साईप्रसादालयात ताटांऐवजी पत्रावळीचा वापर सुरु करण्यात आलेला आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी पाणी कपात सुरु करण्यात आलेली आहे. कर्मचारी वसाहत व बगीचासाठी वापरात येणारे पाण्याचे प्रमाण कमी करुन उर्वरीत पाण्याचा वापर साईभक्तांचे वापरासाठी करण्यात येत आहे.

दि.२१.०६.२०१२ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब, उपकार्यकारी अधिकारी साहेब, वरिष्ठ मुख्य अभियंता तसेच पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचेसमवेत कनकुरी साठवण तलावाची प्रत्यक्ष पाहणी केली असता व दि.२२.०६.२०१२ रोजीचे मा. अध्यक्ष साहेब व सर्व विभाग प्रमुख यांचे समवेत झालेल्या सभेत दिलेल्या निर्देशाप्रमाणे सध्या साठवण तलावातील पाण्याची पातळी कमी झालेली असल्याने, साठवण तलावाचे बाजुचे विहीरीतून साठवण तलावात पाणी घेण्याचे नियोजन करणेबाबत व ठिक-ठिकाणी बोअरवेल व विहीरीचे पाणी वापरास घेणेबाबत सुचना दिल्या.

**अ)** पाणी पुरवठा विभाग **दिनांक २०.०६.२०१२** रोजीचे टिपणीन्वये भाडोत्री टँकर लावणेस व त्यासाठी येणारे अंदाजे खर्चास प्रशासकिय मान्यता घेण्यात आलेली आहे. स्थानिक भाडोत्री टँकरधारकांकडे पाणी पुरवठा करणेबाबत कोटेशन घेवून याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. भाडोत्री टँकरव्दारे पाणी पुरवठा करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च आलेला आहे.

| अं.नं. | तपशिल | टँकरधारकाचे नांव | न्युनतम कोटेशन दर रुपये (प्रती खेप) | बील खर्च तपशिल |
|---|---|---|---|---|
| ०१ | स्वतः पाणी पुरवठा करण्याचे स्त्रोत शोधून स्वःमालकीच्या **ट्रॅक्टर-टँकरव्दारे** वाहतुन करुन संस्थानने निश्‍चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणीपुरवठा करणे. | श्री राजेंद्र भाऊसाहेब कातोरे, निघोज- निमगांव | ३००.०० | **संस्थान खर्च - निरंक** (श्री राजेंद्र देवराम कोते, शिर्डी यांनी उपरोक्त टँकरधारकांकडून संस्थान करीता एकुण १८९ ट्रॅक्टर टँकरच्या खेपा संस्थानकरीता विनामुल्य पुरविल्या आहेत.) |
| ०२ | संस्थानने शोधलेल्या / सुचविलेल्या पाणीस्त्रोतापासून स्वःमालकीच्या **ट्रॅक्टर-टँकरव्दारे** वाहतुन करुन संस्थानने निश्‍चित केलेल्या ठिकाणी सर्वसमावेशक खर्चासह पाणीपुरवठा करणे. | श्री सुयोग गणपत गोंदकर, शिर्डी | २२५.०० | **संस्थान खर्च - निरंक** (श्री राजेंद्र देवराम कोते, शिर्डी यांनी उपरोक्त टँकरधारकांकडून संस्थान करीता एकुण २९ ट्रॅक्टर टँकरच्या खेपा संस्थानकरीता विनामुल्य पुरविल्या आहेत.) |
| ०३ | संस्थानने शोधलेल्या / सुचविलेल्या पाणीस्त्रोतापासून स्वःमालकीच्या ट्रक/ट्रॅक्टर व्दारे (फक्त इंधन खर्च संस्थानमार्फत) वाहतूक करुन संस्थानने निश्‍चित केलेल्या ठिकाणी पाणी पुरवठा करणे. | १) सी.एन.कातकडे, कोपरगांव (ट्रक टँकर)<br>२) कमलाकर गणपत कोते,शिर्डी, (ट्रॅक्टर टँकर) | प्रत्यक्ष इंधन खर्च येणारा. | <u>**एकुण ८२ खेपा.**</u><br>१) मे. सी.एन.कातकडे, कोपरगांव एकुण डिझेल १०९लि. x दर रु. ४४.२५ = **रु. ४,८२३.००**<br>२) श्री साई सर्व्हिस सेंटर, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | सावळीविहीर<br>एकुण डिझेल ४०.६५लि. x दर ४४.०७<br>= **रु. १७९१.००** |
| | | | **एकुण डिझेल खर्च रक्कम-** | **रु. ६,६१४.००** |

टँकर व्यतिरिक्त संस्थानचे पाणी वापरासाठी खालील शेतकरी बांधवांनी त्यांचे विहीरीतून व सायफनव्दारे संस्थान इमारतींना पाणी पुरवठा करण्याची तयारी / इच्छा दर्शविल्याने त्यांचे विहीरीतून तसेच उपलब्ध साफयनव्दारे संस्थानकरीता पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

| अं.नं. | विहीर मालकाचे नांव | गांव | स्थळ |
|---|---|---|---|
| ०१ | बाबासाहेब रामभाऊ डांगे | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ. |
| ०२ | गायकवाड (वाघमारे) | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ. |
| ०३ | रंगनाथ सिताराम डांगे. | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ. |
| ०४ | वसंतराव किसन डांगे | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ. |
| ०५ | रामकृष्ण नाना सरोदे व ज्ञानदेव अनाजी जाधव | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ. |
| ०६ | संपत सुर्यभान डांगे व कचरु सुका डांगे | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ. |
| ०७ | भाऊसाहेब सुर्यभान डांगे व मच्छिंद्र सुर्यभान डांगे | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ. |
| ०८ | बाबासाहेब भिमराज चौधरी | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ. |
| ०९ | वसंतराव महादू गोंदकर | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ |
| १० | सुदाम विठ्ठल डांगे | कनकुरी | क.साठवण तलाव जवळ |
| ११ | गोविंद माधव कोते. | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव पुर्व बाजू** |
| १२ | नितीन पंढरीनाथ शेळके. | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव पुर्व बाजू** |
| १३ | कैलास निवृत्ती जगताप. | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव पुर्व बाजू.** |
| १४ | एकनाथ दुर्गाजी शेळके | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव पुर्व बाजू** |
| १५ | सुरेश सखाराम डांगे | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव पश्चिम बाजू** |
| १६ | बाबासाहेब विठ्ठल चौधरी | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव पुर्व बाजू.** |
| १७ | ज्ञानदेव नारायण चौधरी | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव पुर्व बाजू.** |
| १८ | सचिन सुधाकर औताडे. | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव उत्तर बाजू** |
| १९ | प्रकाश तेजमल खाबिया | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव पुर्व बाजू.** |
| २० | राजेंद्र बाबुराव चौधरी. | शिर्डी. | **शिर्डी न.पं. तलाव पुर्व जवळ** |

**ब)** पाणी पुरवठा विभाग **दि. २१.०६.२०१२, दि. २२.०६.२०१२ व दि. १८.०७.२०१२** चे मंजुर टिपणीनुसार कनकुरी साठवण तलाव परिसरातील एकुण २० विहीरींचे पाणी साठवण तलावात घेणेसाठी आवश्यक असणारे पाईप व इतर अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून न्युनतम दराचे दरपत्रक धारकांकडुन साहित्य खरेदी करणेसाठी प्रशासकिय मान्यता घेण्यात आलेली आहे. याकरीता झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **दुकानाचे नांव** | **मटेरियल तपशिल** | **नग** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे. अनुराधा अ‍ॅग्रो सर्व्हिस, लोणी खु. बील नं. ८२६६, दि. २८.०६.२०१२ | १) २" H.D.P.E. पाईप. | १९६९ फुट | रु. २८/- प्रती फुट | **५५,१३२.००** |
| | | | | एकूण- | **५५,१३२.००** |
| ०२ | मे. अनुराधा अ‍ॅग्रो सर्व्हिस, लोणी खु. बील नं. ८२७१, दि.०२.०७.२०१२ | १) २" होज नेपल.<br>२) २" पाईप क्लीप.<br>३) २.१/२" पाईप क्लीप.<br>४) ३" पाईप क्लीप. | ०२ नग.<br>३० नग.<br>३० नग.<br>३० नग. | रु.१००/- प्रती नग.<br>रु. २०/- प्रती नग.<br>रु. २०/- प्रती नग.<br>रु. २०/- प्रती नग. | २००.००<br>६००.००<br>६००.००<br>६००.०० |
| | | | | एकूण- | **२०००.००** |
| ०३ | मे. अनुराधा अ‍ॅग्रो सर्व्हिस, लोणी खु. बील नं. ८२६५, दि.२८.०६.२०१२ | १) २.१/२" H.D.P.E. पाईप.<br>२) ३" H.D.P.E. पाईप. | १९६९ फुट<br>६२० फुट | रु. ३८/- प्रती फुट<br>रु. ४७/- प्रती फुट | ७४,८२२.००<br>२९,१४०.०० |
| | | | | एकूण- | **१,०३,९६२.००** |
| ०४ | मे. अनुराधा अ‍ॅग्रो सर्व्हिस, लोणी खु. बील नं. ८२७०, दि.०२.०७.२०१२ | १) २.१/२" H.D.P.E. पाईप | ४९२३ फुट | रु. ३८/- प्रती फुट | १,८७,०७४.०० |
| | | | | एकूण- | **१,८७,०७४.००** |
| ०५ | श्री अ‍ॅग्रो इरिगेशन, संगमनेर. बील नं. ७७३, दि.२५.०६.२०१२ | १) ४" PVC पाईप<br>२) ४" PVC बेंड.<br>३) PVC सोल्युशन.<br>४) सॅडल.<br>५) ऐअर व्हॉल.<br>६) स्टॅंड | २२५ नग.<br>२० नग.<br>०३ लिटर्स.<br>०४ नग.<br>०४ नग.<br>०४ नग. | रु.६८०/-प्रती नग.<br>रु.२०६/-प्रती नग.<br>रु.२६३/- प्रती लि.<br>रु. ७०/- प्रती नग.<br>रु.४९२/-प्रती नग.<br>रु. ९०/- प्रती नग. | १,५३,०००.००<br>४,१२०.००<br>७८९.००<br>२८०.००<br>१,९६८.००<br>३६०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण- | **१,६०,५१७.००** |
| ०६ | श्री ॲग्रो इरिगेशन, संगमनेर.<br>बील नं. १०२२, दि.०२.०८.२०१२ | १) ४" PVC पाईप. | ९८ नग. | रु.६८०.४० प्र.नग. | ६६,६७९.२० |
| | | | | एकूण- | **६६,६७९.००** |
| | | | | **अ.नं. ०१ ते ०६ एकुण खर्च रक्कम-** | **५,७५,३६४.००** |

**क)** पाणी पुरवठा विभागाकरीता आवश्यक इले. मोटारींची खरेदी करणेकरीता मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०२.२०१२ विषय नं. ६४, निर्णय क्रं. २३४ अन्वये अंदाजे रु. २,३८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती. परंतू सदर इले.मोटारींची खरेदी करणेची प्रक्रिया पुर्ण न झ ााल्याने **दि. २१.०६.२०१२** चे मंजुर टिपणीनुसार व उपरोक्त ठरावानुसार कनकुरी साठवण तलाव परिसरातील एकुण २० विहीरींचे पाणी साठवण तलावात घेणेसाठी आवश्यक इले. मोटारींची खरेदी करणेकरीता विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून न्युनतम दराचे दरपत्रक धारकांकडुन इले. मोटारींची खरेदी करण्यात आलेले आहेत. याकरीता आलेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | दुकानाचे नांव | मटेरियल तपशिल | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई ॲग्रो एजन्सी, लोणी बु.<br>बील नं. १२०९, दि.२६.०६.२०१२ | १) ५ एच.पी. पाणबुडी मोटार<br>२) ३/१७ सबर्मसिबल मोटार. | ०४ नग.<br>०३ नग. | रु.१९,७००/- प्र.नग.<br>रु.१६,९००/-प्र. नग. | ७८,८००.००<br>३३,८००.०० |
| | | | | एकूण- | **१,१२,६००.००** |
| ०२ | श्री साई ॲग्रो एजन्सी, लोणी बु.<br>बील नं. १२१२, दि.२७.०६.२०१२ | १) १० एच.पी. पाणबुडी मोटार | ०१ नग. | रु.३४,६००/- प्र.नग. | ३४,६००.०० |
| | | | | एकूण- | **३४,६००.००** |
| ०३ | श्री साई ॲग्रो एजन्सी, लोणी बु.<br>बील नं. १२५०, दि.१५.०७.२०१२ | १) १० एच.पी. पाणबुडी मोटार<br>२) ६/१२ सबर्मसिबल मोटार. | ०१ नग.<br>०२ नग. | रु.३४,६००/- प्र.नग.<br>रु.२४,७००/-प्र. नग. | ३४,६००.००<br>४९,४००.०० |
| | | | | एकूण- | **८४,०००.००** |
| | | | | **अ.नं. ०१ ते ०३ एकुण खर्च रक्कम-** | **२,३१,२००.००** |

तरी वरील अ) प्रमाणे रुपये ६,६१४/-मात्र ब) प्रमाणे रुपये ५,७५,३६४/-मात्र व क) प्रमाणे रुपये २,३१,२००/-मात्र नुसार साहीत्य खरेदी करणेसाठी असे एकुण रु. ८,१३,१७८/- मात्र खर्च आलेला आहे. सदरच्या साहित्याची तातडीने आवश्यकता असल्याने वर नमुद केलेले साहीत्य दरम्यानचे कालावधीत प्रशासकिय मान्यता घेवून खरेदी करण्यात आलेले आहे. तरी सदरच्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरासाठी पाणी पुरवठा करणेकामी भाडोत्री टँकर लावणेचे व कनकुरी साठवण तलावात पाणी घेणेकरीता खरेदी करण्यात आलेल्या मटेरियलचे रु. ८,१३,१७८/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं. ३६** **इलेक्ट्रीक मोटारींचे रिवायडींग करणेकरीता खरेदी करावयाच्या मटेरिअलचे माहे ऑगस्ट २०१२ ते मार्च २०१३ या कालावधीसाठी दर मंजूर करणे बाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाकडे संस्थान परिसराकरीता पाणी पुरवठा करणेसाठी व विविध इमारतींचे टाक्या हौद भरणेसाठी ठिकठिकाणी इले.मोटारी बसविण्यात आलेल्या आहेत. पाणी पुरवठा विभागांतर्गत अंदाजे १५० मोटारींचे रिवायडींग व मेन्टेनंस करणेचे काम करण्यात येते. तसेच प्रसादालय विभाग, बगीचा विभाग, आय.टी.आय विभाग, हॉस्पिटल विभाग अशा इतर विभागाकडील इले.मोटारींचे रिवायडींग सुध्दा पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे. सदरच्या मोटारींचे रिवायडींग करणेकरीता त्यासाठी आवश्यक मटेरियल खरेदी करण्यात येवून मोटारींचे रिवायडींग करण्यात येते.

प्रत्येक वेळी वेगवेगळया साईजची वाईडिंग वायर असलेली मोटार वायडींग व मेन्टेनंस करण्यासाठी येते. त्यामुळे पुर्ण वर्षाची वार्षिक खरेदी करता येत नाही. विशिष्ट गेजची वायडींग वायर खरेदी केल्यास तसेच तिचा वापर न झाल्यास ती वायर तशीच शिल्लक राहते. तसेच प्रत्येक वेळी मंजुरी घेणे, कोटेशन मागविणे, आलेल्या कोटेशनवर कार्यवाही करणे व नंतर ऑर्डर देणे यामध्ये बराच कालावधी निघून जातो. प्रसादालय विभागातील व पाणी पुरवठा विभागातील काम बंद ठेवता येत नाही. यामुळे कामात अडथळे निर्माण होतात.

याकरीता मोटारींचे वायडींग करीता आवश्यक असलेले मटेरियल खरेदी करणेसाठी संबंधीत दुकानदारांकडून मटेरियलचे आपणास आवश्यक कालावधीसाठी एकदाच भाव घेवून त्यांना स्टँडिंग ऑर्डर दिल्यास प्रत्येक वेळी मंजुरी घेवून मटेरियल खरेदी करणेसाठी वेळ जाणार नाही व कामात अडथळे येणार नाही.

यापुर्वी आपणांकडुन सन २००९-२०१०,२०१०-२०११ व २०११-२०१२ करीता मा.व्यवस्थापन समितीचे मान्यता घेवून रिवायडींग मटेरियल एक वर्षाकरीता पुरविणेसाठी कोटेशन मागविण्यात आलेले होते व निम्नतर कोटेशन धारकास ऑर्डर देवून मटेरियलची खरेदी करण्यात आलेली आहे.

त्यानंतर सन २०१२-२०१३ करीता वार्षिक ऑर्डर देवून मटेरियल खरेदी करणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करावयाचा असल्याने स्थानिक दुकानदारांकडे चौकशी केली असता त्यांनी मटेरियलचे भावात मोठया प्रमाणात वाढ होत असल्याकारणांने वार्षिक मटेरियल पुरविणेसाठी कोटेशन देणेस नकार दिलेला होता. त्यामुळे पाणी पुरवठा विभागाकडुन सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे माहे एप्रिल २०१२ ते माहे जुलै २०१२ या कालावधीत विभागास आवश्यक त्यावेळी कोटेशन मागवून वायडींग मटेरियलची खरेदी करुन काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

सध्या पाणी पुरवठा विभाग, श्रीसाईप्रसादालय विभाग यांचेकडील बऱ्याच इलेक्ट्रिक मोटारी रिवायडींग करणेकरीता आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांची टप्प्या-टप्प्याने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. स्थानिक दुकानदारांकडे मटेरियलबाबत चौकशी केली असता त्यांनी पुढील कालावधीसाठी माहे ऑगस्ट २०१२ ते माहे मार्च २०१३ या कालावधीसाठी एकदाच भाव देवून मटेरियल पुरविण्याची तयारी दर्शविलेली आहे.

तरी संबंधीत स्थानिक दुकानदारांकडुन वरील कालावधीसाठी मटेरियलचे दर मंजुर करुन घेवून, मंजुर दराने आपणास आवश्यक मटेरियलची ज्यावेळी आवश्यकता भासेल त्यावेळी खरेदी केल्यास दरवेळी कोटेशन मागवून खरेदी करणेस जो वेळ जाईल त्यामध्ये बचत होईल व काम त्वरीत होईल.

तरी यावेळी माहे ऑगस्ट २०१२ ते मार्च २०१३ या कालावधीकरीता इले.मोटारींचे रिवायडींगसाठी लागणारे मटेरियल पुरविणेसाठी कोटेशन बोलविण्यास व न्युनतम कोटेशन धारकास मटेरियल पुरविणेस ऑर्डर देणेसाठी मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, इलेक्ट्रीक मोटारींचे रिवायडींग करणेकरीता माहे ऑगस्ट २०१२ ते मार्च २०१३ या कालावधीसाठी मटेरिअल पुरविणेसाठी कोटेशन बोलविण्यास व न्युनतम दरधारकांकडून सदर मटेरिअल खरेदी करणेस मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा रुग्णालयामध्ये घनकचरा ठेवणेकामी कचरा कुंडी व शेड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे बांधकाम विभागाने दि.२२-०६-२०१२ च्या पत्रान्वये, श्री साईबाबा रुग्णालयातील घनकचरा ओ.पी.डी.चे बाहेरील बाजूला टाकला जातो. परंतू सदरच्या ओल्या कच-याची दुर्गंधी पसरुन रुग्ण व नातेवाईकांना त्रास होतो, करीता कचरा ठेवणेसाठी मॉर्च्युरी रुमजवळ एका बाजूला कचरा कुंडी तयार करुन मिळणेबाबत वैद्यकीय संचालक यांनी कळविल्याचे तसेच श्री साईबाबा रुग्णालय यांचे मागणीनुसार सोबत जोडलेले प्लॅनमध्ये दर्शविल्याप्रमाणे कचराकुंडी साठी शेड तयार करणेसाठी आवश्यक स्ट्रक्चरल पाईप बसविणेचे काम करुन मिळणेकामी उपरोक्त संदर्भान्वये कळविले आहे. श्री साईबाबा रुग्णालयामध्ये घनकचरा ठेवणेसाठी कचरा कुंडी व त्यावर शेड तयार करण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | जी.आय.`सी ` क्लास राऊंड पाईप साईज :- २`` | १६० फूट | रु.२००/- (प्रति फूट) | रु. ३२,०००.०० |
| ०२) | एम.एस.राऊंड पाईप, साईज :- १.१/२`` x ३ एम.एम. | ४० फूट | रु.१२५/- (प्रति फूट) | रु. ०५,०००.०० |
| ०३) | एम.एस.अँगल, साईज :- ३५ x ३५ x ३ एम.एम. | १५० किलो | रु.१००/- (प्रति किलो) | रु.१५,०००.०० |
| ०४) | एम.एस.फ्लॅट पट्टी, साईज :- ३५ x ३ एम.एम. | २५ किलो | रु.८०/- (प्रति किलो) | रु. ०२,०००.०० |
| ०५) | एम.एस.स्क्वेअर जाळी, साईज :- २५ x २५ x ४ एम.एम. | १०० रनिंग फूट | रु.९०/- (प्रति र.फूट) | रु.०९,०००.०० |
| ०६) | ६`` हेवी बट बिजागरी | ०४ नग | रु.१००/- (प्रति नग) | रु. ००,४००.०० |
| ०७) | १२`` स्टेनलेस स्टील, हेवी ऑल्ड्रॉफ | ०१ नग | रु.५००/- (प्रति नग) | रु. ००,५००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु.६३,९००.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयामध्ये घनकचरा ठेवणेकामी कचरा कुंडी व शेड तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स /वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.६३,९००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयामध्ये घनकचरा ठेवणेकामी कचरा कुंडी व शेड बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून तयार करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६३,९००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८ श्री साईबाबा रुग्णालयामधील प्रयोगशाळा विभागातून बाथरुममध्ये जाणेसाठी शेड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे बांधकाम विभागाने दि.१९-०६-२०१२ च्या पत्रान्वये श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारत क्र.०१ (दक्षिणेकडील) मधील प्रयोगशाळा विभागातून बाहेरचे बाजूला असणा-या बाथरुममध्ये जाणेसाठी उघडया मार्गाने जावे लागते. ऊन, पावसापासून तसेच वरचे मजल्याचे खिडक्यांमधून टाकल्या जाणा-या घाणी पासून संरक्षण होणेचे दृष्टीने सोबत जोडलेले ले-आऊट प्लॅनमध्ये दर्शविलेले ठिकाणी शेड करणेसाठी आवश्यक स्ट्रक्चरल पाईप बसविण्याचे काम करुन मिळणेकामी कळविले आहे. तरी सदरहू कामी आवश्यक असणारे शेडचे स्ट्रक्चर व त्यावर पाईप बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | जी.आय.`सी ` क्लास राऊंड पाईप साईज :- २`` | १०० फूट | रु.२००/- (प्रति फूट) | रु. २०,०००.०० |
| ०२) | एम.एस.राऊंड पाईप, साईज :- १.१/२`` x ३ एम.एम. | २२० फूट | रु.१२५/- (प्रति फूट) | रु. २७,५००.०० |
| ०३) | एम.एस.अँगल, साईज :- ४० x ४० x ५ एम.एम. | ०२० किलो | रु.१००/- (प्रति किलो) | रु. ०२,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ४९,५००.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयामधील प्रयोगशाळा विभागातून बाथरुममध्ये जाणेसाठी व शेड तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स /वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.४९,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयामधील प्रयोगशाळा विभागातून बाथरुममध्ये जाणेसाठी बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून शेड तयार करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ४९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३९ श्री साईबाबा हॉस्पिटल नवीन एअर कॉम्प्रेसर करिता शेड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांनी श्री साईबाबा हॉस्पीटलमधील सेंट्रल गॅस सिस्टिम करीता आणखी एक एअर कॉम्प्रेसर बसविणेकामी एक नविन रुम करणेकामी कळविले आहे. त्यानुसार मा.व्यवस्थापन समीतीचे दि.०६ एप्रिल, २०१२ रोजीचे सभेत सदरचे शेड उभारणे व याकामी येणारे रुपये ८६,५५०/- मात्रचे खर्चास तसेच शेडचे स्ट्रक्चरल काम विद्युत विभागाकडून करुन मिळणेकामी संस्थानचे बांधकाम विभागाने दि.२२-०६-२०१२ च्या पत्रान्वये कळविले आहे. तरी श्री साईबाबा हॉस्पीटल नवीन एअर कॉम्प्रेसरकरीता शेड तयार करण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर (अंदाजे) रु. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१) | जी.आय.`सी ` क्लास राऊंड पाईप साईज :- २`` | १०० फूट | २००/- (प्रति फूट) | २०,०००.०० |
| ०२) | एम.एस.राऊंड पाईप, साईज :- १.१/२`` x ३ एम.एम. | १२० फूट | १२५/- (प्रति फूट) | १५,०००.०० |
| ०३) | एम.एस.सॉलीड स्क्वेअर बार, साईज :- १० एम.एम. | २५० किलो | १००/- (प्रति किलो) | २५,०००.०० |
| ०४) | एम.एस.अँगल, साईज :- ४० x ४० x ५ एम.एम. | १०० किलो | ८०/- (प्रति किलो) | ०८,०००.०० |

| | | | एकुण रक्कम :- | रु.६८,०००.०० |
|---|---|---|---|---|

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल नवीन एअर कॉम्प्रेसरकरीता शेड तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स /वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.६८,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल नवीन एअर कॉम्प्रेसर करिता बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून शेड तयार करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ६८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

विषय नं.४० **साईआश्रम भाग १ व भाग- २ प्रकल्पातील सबस्टेशन व जनसेटच्या कामाचे फायनल बील आदा करणेबाबत.**

निर्णय क्र.६९५ **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

विषय नं.४१ **सी.सी.टी.व्ही कॅमेरे, नाईट व्हिजन कॅमेरे,४२ इंच एल.सी.डी या सुरक्षा साहित्याचे टॅक्स, वायरिंग व इन्स्टॉलेशनसाठी आलेल्या वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागाचे कॅश रुमचे (मागील व पुढील पॅसेजमध्ये)०२ नग सी.सी.टी.व्ही.फिक्स कॅमेरे, स्टॉंगरुम मध्ये नाईट व्हिजन ०१ नग कॅमेरा,मंदिर तळघरात नाईट व्हिजन ०१ नग कॅमेरा असे एकुण ५ नग कॅमेरे व त्यासाठी आवश्यक ४२ इंची ०१ नग एल.सी.डी.,सर्व्हर इत्यादी साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे ९,५०,०००/- (अ.रु.नऊ लाख पन्नास हजार )खर्च अपेक्षित असल्याने साहित्यांची खरेदी व येणाऱ्या खर्चास मान्यतेसाठी सदरचा विषय हा दि.२४.०९.२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे विषय नं.४१ नुसार ठेवण्यात आलेला होता.त्यावर निर्णय क्रं.७१४ नुसार उपरोक्त प्रस्तावात नमुद केले प्रमाणे मे.व्हेन्टेज कंपनीमार्फत त्यांना देण्यात आलेल्या पूर्वीचे मान्य दरानुसार सदरचे साहित्य खरेदी करुन याकामी येणारी रक्कम ९,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

त्यानुसार मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन यांना एसएसएसटी / वशी - संरक्षण / ५६२८ /१२ दि.०९.०२.२०१२ अन्वये यापूर्वीचे कामासाठी देण्यात आलेल्या वर्कऑर्डर मधील दराप्रमाणे व त्यांनी करुन दिलेल्या करारनाम्यास अनुसरुन उपरोक्त सुरक्षा साहित्य पुरविणे कामी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.त्याप्रमाणे पुरवठादार यांनी उपरोक्त मागणी प्रमाणे सर्व सुरक्षा साहित्य सदर ठिकाणी कार्यन्वित केले आहे.

याकामी उपरोक्त प्रमाणे साहित्य व त्यासाठी लागणारी वायरिंग, शासकिय टॅक्स,लेईंग चार्ज, सर्व्हीस चार्ज,कडयुंट यांचा मिळून एकुण खर्च रु.१०,७६,५९३/- मात्र आलेला आहे.

सदर साहित्यांसाठी लागणारी वायरिंग, लेईंग ,कंडयुट इत्यादीसाठी आवश्यक असणारा खर्च रुपये १,२६,५९३/- मात्रचे खर्चाचा समावेश वरील रक्कम रु.९,५०,०००/- मात्रचे खर्चात समाविष्ट नव्हता. यापूर्वी मंदिर व परिसरात बसविलेल्या सुरक्षा साहित्यांमध्ये त्यांना देण्यात आलेल्या वर्कऑर्डर मध्ये साहित्यांचे व्यतिरिक्त सर्व्हीस टॅक्स, डिगींग वायरिंग,कन्डयुट या बाबतचा खर्च स्वतंत्र आदा केलेला आहे.

तरी मे.व्हेन्टेज यांना देण्यात आलेल्या वर्कऑर्डर व पूर्वीचे करारनाम्यास अनुसरुन उपरोक्त ठिकाणी साहित्यांचे व्यतिरिक्त झालेल्या साहित्यांचा टॅक्स, वायरिंग, लेईग, कंडयुट इत्यादीसाठी एकुण रक्कम रु.१,२६,५९३/- (अ.रु.एक लाख सवीस हजार पाचशे त्र्यान्नो रुपये) मात्रचे झालेल्या जास्तीच्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती आहे.

निर्णय क्र.६९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सी.सी.टी.व्ही कॅमेरे, नाईट व्हिजन कॅमेरे,४२ इंच एल.सी.डी या सुरक्षा साहित्याचे टॅक्स, वायरिंग व इन्स्टॉलेशनसाठी आलेल्या रु.१,२६,५९३/- मात्रचे वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

विषय नं.४२ **शिर्डी शहरातील सार्वजनिक स्वच्छतेसाठी कर्मचारी देणेबाबत.**

प्रस्ताव- "शिर्डी शहरामधील विविध रस्ते, मोकळ्या जागा व मंदिरासभोवतीच्या परीसराची साफसफाई करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीला दररोज किमान १५० सफाई कामगारांची गरज आहे. आज रोजी शिर्डी नगरपंचायतीमार्फत नियुक्त केलेल्या ठेकेदाराकडुन दररोज फक्त ७० सफाई कर्मचारी नेमण्यात येत आहे. त्यासाठी दरमहा रुपये ८.१५ लक्ष इतका खर्च येत आहे. नगरपंचायतीस इतका खर्च परवडत नाही. तसेच दैनंदिन सफाईचे काम सुध्दा समाधानकारकपणे पार पडत नाही. तरी श्री साईबाबा संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीला सफाई कामांसाठी दररोज १५० सफाई कर्मचारी दोन

शिफ्टमध्ये मिळणेस विनंती आहे." अशी मागणी मा.उपनगराध्यक्ष, शिर्डी नगरपंचायतीचे नगरसेवक व शिर्डी ग्रामस्थ यांनी दि. १९/०७/२०१२ चे निवेदनाव्दारे केलेली आहे.

सध्या मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर- मनमाड रोड हा राज्य महामार्ग व मनोजकुमार पथ या ठिकाणांची साफसफाई करणेसाठी दररोज दोन शिफ्टमध्ये एकूण ४० कर्मचारी देण्यात येत आहेत.

उपरोक्त निवेदनाप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीस १५० सफाई कामगार द्यावयाचे झाल्यास खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येईल.

१५० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्चः-

| अ.क्र. | तपशील | होणारा खर्च |
|---|---|---|
| १ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. (सध्याचा दर) | २०७.८६ |
| २ | प्रॉ.फंड १३.६१% | २८.२८ |
| ३ | सर्व्हिस चार्ज ०.१०% | **०.२०** |
| | एकूण- | २३६.३४ |
| ४ | सर्व्हिस टॅक्स १२.३६% | २९.२१ |
| ५ | प्रति दिन प्रति कर्मचारी खर्च रु. | २६५.५५ |
| ६ | **प्रति दिन १५० मचारी खर्च रु.** | **३९,८३२.५०** |
| ७ | प्रति दिन १५० कर्मचारी ३६५ दिवसांचा खर्च | १,४५,३८,८६२.५० |
| ८ | +२०% वर्षात होणारी अपेक्षित वाढ | २९,०७,७७२.५० |
| | **एकुण रुपये -** | **१,७४,४६,६३५.००** |

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना १५० अकुशल कंत्राटी सफाई कर्मचारी द्यावयाचे झाल्यास एक वर्षाचे कालावधी करीता वेतनासाठी अंदाजे रु.१,७४,४६,६३५/- (रु.एक कोटी चौऱ्याहात्तर लाख शेहेचाळीस हजार सहासे पस्तीस ) मात्र पर्यंत खर्च येईल.

पुढील निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- आरोग्य विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३ श्री साई प्रसादालयातील धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत**

**प्रस्ताव-** प्रसादालयामध्ये दर्रोज ३५,००० ते ७०,००० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असून दर्रोज सुमारे सरासरी ८००० अन्नपाकीटे व २,००,००० मोतीचूर लाडूंची विक्री होत आहे. त्याकामी लागणारा किराणा माल धान्य व कडधान्य, डाळी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येते. सदर माल मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो निवडला जातो. गहु व हरबराडाळ दळण्यात येत असून दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळणकांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे,मातेरे निघते. वातावरणातील बदलामुळे ही वजनात घट येते. या सर्व कारणामुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्ये घट-तुट येत असते.

पुर्वी वरील कारणास्तव येणारी घट-तुट थेट किराणा मालामध्ये खर्ची टाकण्याची पध्दत होती. परंतू सन २००५-२००६ या अर्थिक वर्षामध्ये स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक श्री लोंगाणी यांनी किराणा मालामध्ये येणारी घट-तुट नांवे टाकण्याबाबत मुद्दा उपस्थीत करुन घट-तुट नांवे टाकणेबाबत नियमावली तयार करावी असे सुचविले होते. त्यानूसार दिनांक १५/०८/२००६ पासून प्रसादभोजन , अन्नपाकीटे , व मोतीचूर लाडूकरीता प्रत्यक्ष खर्च होणारा किराणा माल खर्ची टाकण्यात आलेला होता. घट-तुट , कचरा, काडी, मातेरे कोंडा, वेस्टेज आटा वगैरे खर्ची टाकण्यात आला नव्हता. त्यानूसार दि.१५/०८/२००६ ते ३१/०३/२००७ अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०५/२००७ चे सभेचे निर्णय क्र.४०५ मान्यतेने खर्ची टाकणेत आलेली आहे. मात्र त्यापुढील कालावधीतल घट-तुट खर्ची टाकणेसाठी नियमावली तयार करण्यात यावी असा निर्णय झालेला असल्यामुळे घट-तुट खर्ची टाकणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ,शिर्डी सारखे मोठया प्रमाणात भोजन तयार करणा-या संस्थेकडील पध्दत व प्रमाण याबाबत माहीती मागविण्यात आलेली होती. त्यापैकी तिन संस्थेने त्यांचेकडील घट-तुट पध्दत कळविलेली होती. सन २००७ ते २००८ मध्ये प्रसादालय किराणा मालामध्ये आलेली घट-तुट व इतर संस्थेचे घट-तुट नांवे टाकण्याचे प्रमाण यांच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता प्रसादालयामध्ये आलेली घट-तुट कमी दिसून आलेली होती.

मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.५६० अन्वये सन २००७-२००८ या वर्षात आलेली प्रत्यक्ष घट-तुट खर्ची टाकणेत आलेली आहे. मात्र सदर घट-तुटीस मान्यता

देतांना मा.श्री अभय शास्त्री, मा.श्री ए.जी.लोंगाणी, अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविलेली होती. त्यास मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.५६० नूसार मान्यता मिळालेली आहे.

१) सन २००७-२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिण्यानंतर प्रस्तावित प्रमाणानूसार घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिस्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्त नियमावलीनूसार सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयातील एकूण खर्ची पडलेल्या किराणामालात प्रत्यक्ष आलेल्या घट-तुटीस मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०७/२०११ चे सभेतील निर्णय क्रं.५८६ ने मान्यता घेण्यात आलेली आहे

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षामध्ये दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली होती. तपासणीअंती प्रत्यक्ष आलेली किराणा मालातील घट-तुट ही सरासरी मान्य असलेल्या प्रमाणापेक्षा कमी आढळलेली आहे. त्याचा वस्तूनिष्ठ अहवाल खालीलप्रमाणे आहे.

**सन २०११-२०१२ मध्ये धान्य-कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घटतुटीचा तपशील.**

| अ.नं. | मालाचा तपशिल | दि.०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल | दि.०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ अखेर प्रत्यक्ष आलेली घट तुट | घट तुटीचे प्रमाण | मान्य झालेली घट - तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | कि. ग्रॅ. | कि. ग्रॅ. | कि. ग्रॅ. | कि. ग्रॅ. |
| १ | गहू | १२९४३५३.००० | ३३७८१.००० | २.६१० | **३.०००** |
| २ | तांदूळ | ८२५७१४.१०० | ६७२८.००० | ०.८१५ | **१.०००** |
| ३ | तुरडाळ | १८९०५८.४०० | १६९१.००० | ०.८९४ | **१.०००** |
| ४ | हरबराडाळ | ६९१८२२.९०० | ९४५०.००० | १.३६६ | **२.०००** |
| ५ | मुगडाळ | ३२८९२.०७५ | २९७.००० | ०.९०३ | **१.०००** |
| ६ | गुळ | २३१९८.८५० | १५४.००० | ०.६६४ | **१.०००** |
| ७ | रवा | १८९२१.००० | १८६.००० | ०.९८३ | **१.०००** |
| ८ | शेंगदाणे | ३८२०५.१०० | ३३८.००० | ०.८८५ | **१.०००** |
| ९ | मिरची | १५१२७.३०० | ५९६.००० | ३.९४० | **४.०००** |
| १० | हळद | ८८०६.४५० | ३०२.००० | ३.४२९ | **४.०००** |
| ११ | मोहरी | ४४७७.३५० | ७६.००० | १.६९७ | **२.०००** |
| १२ | जिरे | ५११२.५५० | ७७.००० | १.५०६ | **२.०००** |
| १३ | मसाला | १९६३.२०० | ४०.००० | २.०३७ | **२.२५०** |
| १४ | धनेपावडर | १३९८८.३५० | ३४३.००० | २.४५२ | **२.५००** |
| १५ | खोबरेवाटी | १३१५३.०२० | ९६.००० | ०.७३० | **१.०००** |
| १६ | हिरवी विलायची | ४६६४.२९५ | ४५.००० | ०.९६५ | **१.०००** |
| १७ | हरबरा | ८६१६३.००० | ७४८.००० | ०.८६८ | **१.०००** |
| १८ | वाटाणा | ४००७१.००० | ३६७.००० | ०.९१६ | **१.०००** |
| १९ | मुग | ७७३०८.००० | ७२४.००० | ०.९३७ | **१.०००** |
| २० | मठ | ७२४६५.७०० | ६२०.००० | ०.८५६ | **१.०००** |
| २१ | मेथी | २१४.७५० | ४.००० | १.८६३ | **२.२५०** |
| २२ | सुंठ | २४६.५०० | १२.००० | ४.८६८ | **५.२५०** |
| २३ | मैदा | ५३९८३.५५५ | २२५.००० | ०.४१७ | **०.५००** |
| २४ | भगर | ३१९.००० | ६.२०० | १.९४४ | **२.०००** |
| २५ | शाबुदाणा | २३१७७.००० | २५३.००० | १.०९२ | **१.२५०** |
| २६ | कच्चे पोहे | १२४२.४५० | १२.००० | ०.९६६ | **१.०००** |
| २७ | भाजके पोहे | १७३७.००० | ६८.५०० | ३.९४४ | **४.०००** |
| २८ | डाळया | ५५६.००० | ६.००० | १.०७९ | **१.२५०** |

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयातील खर्च पडलेल्या किराणा मालात वरीलप्रमाणे प्रत्यक्ष घट-तुट आलेली आहे. सदर घट-तुटीचे अवलोकन करता सदर प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीचे प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे उपरोक्त घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्रं.३ नूसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.६९८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय)

---

**विषय नं.४४ किटकनाशक औषध फवारणी (पेस्ट, रोन्डट कंट्रोल, फॉगिंग ट्रिटमेन्ट) निविदा (लिफाफा नं.०१) समक्ष उघडलेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०१/०६/२०१२ ते ३१/०५/२०१३ या एक वर्षाच्या कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान,साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान इमारतीमधील खोल्यामध्ये भक्तांना ढेकुण, झुरळे इत्यादी किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन किटकनाशक फवारणी (पेस्ट कंट्रोल, रोडन्ट कंट्रोल,फॅगिग ट्रिटमेन्ट) करणेकामी इच्छुक,अनुभवी ठेकेदार/कंपनी यांचेकडुन व्दि लिफाफा पध्दतीने सिलबंद निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदरकामी येणा-या खर्चाची तरतुद सन-२०१२/२०१३चे भक्तनिवासस्थानकामी मंजुर अर्थसंकल्पीय रकमेतुन करता येईल. सदरकामी दि.२३/०२/२०१२ रोजीचे दैनिक लोकमतमधील निविदा सुचनेबाबत जाहिरात प्रसिध्द केली होती. निवीदा व्रिकीची मुदत दि.२५/०२/२०१२ ते ०३/०३/२०१२ अखेर तसेच निवीदा स्विकारण्याची मुदत दि.१२/०३/२०१२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत होती. संस्थानचे शिर्डी व मुंबई कार्यालयातुन निवीदाची विक्री करुन ठेकेदारांनी भरुन दिलेल्या सिलबंद निविदा दोन्हीही कार्यालयात आलेल्या आहेत. त्या एकुण ०५ सिलबंद निविदा असुन निविदा लिफाफा नंबर-०२ (Techinical Bids) दि.२१/४/२०१२ रोजी समक्ष उघडण्यात आले आहे.तथापी फक्त पाचच निविदा असल्याने सर्वांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले आहे. लिफाफा नंबर-०१ दि.२३/०६/२०१२ रोजी समक्ष उघडण्यात आला.

निविदामधील दराबाबत तुलनात्कमक तक्ता तयार करुन हजर निविदाधारंकाशी चर्चा/ वाटाघाटी करण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

तुलनात्मक तक्ता-

| करावयाचा कामाचा तपशील | मे सिध्दी पेस्ट कंटोल नाशिक | | मे.यशोमंगल फर्निचर्स ॲन्ड पेस्ट कंट्रोल,पुणे. | | मे.पेस्ट कंट्रोल एम वाल्शे,मुंबई | | मे.रिलीफ प्लस पेस्ट कंट्रोल, संगमनेर. | | मे.हयुजेस ॲन्ड हयुजेस केम लि. दिल्ली | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **निविदेतील दिलेले दर** | **चर्चा वाटाघाटी मध्ये मान्य केलेले दर** | **निविदेतील दिलेले दर** | **चर्चा वाटाघाटी मध्ये मान्य केलेले दर** | **निविदेतील दिलेले दर** | **चर्चा वाटाघाटी मध्ये मान्य केलेले दर** | **निविदेत दिलेले दर** | **चर्चा वाटाघाटी मध्ये मान्य केलेले दर** | **निविदेतील दिलेले दर** | **चर्चा वाटाघाटी मध्ये मान्य केलेले दर** |
| पेस्ट कंटोल रोडन्ट कंट्रोल वर्षातुन सहा फवारण्या | ०१.९० प्रति चौ.फुट | ०१.८७ प्रति चौ.फुट | ०१.०० प्रति चौ.फुट | ०१.०० प्रति चौ.फुट | ०२.४० प्रति चौ.फुट | ०२.२० प्रति चौ.फुट | ०६.०० प्रति चौ.फुट. | ०२.२५ प्रति चौ.फुट | ०.२५ प्रति चौ.फुट. | गैरहजर |
| फॉगिंग ट्रिटमेंन्ट आठवडयातुन एकदा प्रति फवारणी एक वर्षासाठी | १०००.०० | ९५०.०० | २०००.०० | २०००.०० | १६००.०० | १४००.०० | ---- | ---- | ०.२५ | गैरहजर |
| सा.भ.नि. - | १५००.०० | १४००.०० | १८००.०० | १८००.०० | १६००.०० | १२००.०० | ---- | ---- | | |
| साईप्रसाद - | १०००.०० | ९५०.०० | २०००.०० | २०००.०० | १६००.०० | १२००.०० | ---- | ---- | | |
| व्दारावती. - | | | | | | | | | | |

वरीलप्रमाणे वाटाघाटी करुन दर घेण्यात आलेले आहेत, त्याचा विचार करता -

१) मे.सिध्दी पेस्ट कंट्रोल,नाशिक हि कंपनी ISO मांनाकन प्राप्त नाही. तसेच IPCA सभासद नाही त्यांचेकडे स्वंतत्र P. F. कोड नंबर नाही त्यामुळे अपात्र ठरत आहे

२) मे.पेस्ट कंट्रोल एम वाल्शे,मुंबई हि कंपनी ISO मांनाकन प्राप्त व IPCA चे सभासद आहे. त्यांचेकडे स्वंतत्र P.F .कोड नंबर आहे त्यामुळे पात्र ठरत आहे.

३) मे.रिलीप प्लस पेस्ट कंट्रोल,संगमनेर हि कंपनी ISO मांनाकन प्राप्त नाही ते IPCA चे सभासद नाही तसेच इतर ठिकाणचा अनुभव नाही व त्यांचेकडे स्वंतत्रP.F. कोड नंबर नाही त्यामुळे ते अपात्र ठरत आहे.

मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे हि कंपनी ISO.मांनाकन प्राप्त नाही. IPCAचे सभासद नाही त्याप्रमाणे त्यांचेक डे स्वंतत्र P.F.कोड नाही त्यामुळे ते अपात्र ठरत आहे. मागील वर्षामध्ये त्यांना पेस्ट कंट्रोल कॉन्ट्रॅक्टदेण्यात आले होते.तथापी त्यांचे काम अत्यंत असमाधानकारक आहे. साईभक्तांच्या तक्रारी वाढलेल्या आहे. याबाबत त्यांना वारंवार लेखी पत्राने तसेच दुरध्वनीवरुन व समक्ष सुचना देण्यात आलेल्या आहेत.तथापी त्याचे काम अत्यंत असमाधानकारक आहे.

१) मे.हयुजेस ॲण्ड हयुजेस केम लि.दिल्ली हि कंपनी ISO मांनाकन प्राप्त आहे. ते IPCA चे सभासद आहेत. त्याप्रमाणे त्यांचेकडे स्वंतत्र पी.एफ.कोड आहे त्यामुळे ते पात्र ठरत आहे.

आता उपरोक्तपैकी अं.नं-२ पेस्ट कंट्रोल एम.वाल्शे,मुंबई व अं.न.-०५ व मे.हयुजेस ॲण्ड हयुजेस केम लि.दिल्ली या दोनच कंपन्या पात्र ठरत असल्यामुळे त्याचे दराचा विचार करता पेस्ट कंट्रोल एम वाल्शे,मुंबई यांनी वर्षातुन सहा फवारणी करण्यासाठी रु ०२.२० पैसे Sq.Ft दर दिलेला आहे व फॉंगिगचे साईभक्तनिवासस्थानकरीता रु १४००/-,साईप्रसाद व व्दारावती करीता रु.१२००/- दर दिलेले आहे तर मे.हयुजेस ॲण्ड हयुजेस केम लि.दिल्ली यांनी फवारण्या करण्यासाठी व फॉंगिगसाठी ००.२५ पैसे दर दिलेला आहे.

सदर दराचा तुलानात्मक दृष्टया विचार करता मे.हयुजेस ॲण्ड हयुजेस केम लि.दिल्ली यांचे दर निश्चितच कमी आहे. तथापी सदर कंपनीकडुन प्री बीड मिटिंगला व चर्चा/वाटाघाटीच्या संस्थानच्या निमंत्रणाला प्रतिसाद मिळालेला नाही. तसेच

(१) मे.हयुजेस ॲण्ड हयुजेस केम लि.दिल्ली यांनी दिलेल्या ००.२५ पैसे एवढया कमी दरामध्ये ते हे काम समधानकारक रित्या करु शकत नाही. त्यामुळे सदर कंपनीकडुन वर्षभर पेस्ट कंट्रोलचे काम चांगल्या पध्दतीने होईल यांची खात्री नाही कारण मागील वर्षी मे.यशोमंगल पेस्ट कंट्रोल पुणे या कंपनीला ००.८० पैसे दराने काम देऊनही त्यांनी कामाचा दर्जा राखलेला नाही, त्यामुळे भक्तांच्या तक्रारी वाढलेल्या आहेत.

(२) त्यांनी कोटेशनमध्ये त्यांचे औषधफवारणीचा परीणाम २ महिने व १५ दिवस असा २ फॉर्म मध्ये नमुद केलेला आहे.

याउलट पेस्ट कंट्रोल एम वाल्शे,मुंबई या कंपनीने यापुर्वी सन- २००६ ते २०११ या कालावधीत ५ वर्षे प्रति Sq.Ft. रुपये २.६० पैसे दराने काम देण्यात आले होते.

सदर कालावधीतील त्यांचे काम अत्यंत समाधानकारक होते. संस्थानने दिलेल्या वेळेत कामाचा दर्जा राखुन अतिशय वेगाने गरजेनुसार काम पूर्ण केलेले आहे.त्यांच्या कालावधीत भक्तांच्या तक्रारी आलेल्या नाहीत. त्यांनी रक्कम रु २.२० प्रति Sq.Ft. प्रमाणे व फॉंगिगसाठी अनुक्रमे रु १४००/- व रु १२००/- दर दिलेले आहेत.

तरी वरील सर्व परिस्थिती विचारात घेता दि.१/६/२०१२ ते ३१/५/२०१३ या एकावर्षाच्या कालावधीसाठी साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान,साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती निवासस्थान या इमारतीमधील खोल्यामध्ये किटकनाशक औषधफवारणी (पेस्ट,रोन्डंट कंट्रोल) व इमारत परिसरामध्ये धुरीकरण (फॉंगिग टिट्रमेन्ट) करुन घेण्याचे काम पेस्ट कंट्रोल एम.वाल्शे,मुंबई यांना उपरोक्त नमुद दरात मान्यता देण्यात आली. कामाची तातडी,साईभक्तांना किटकांचा होणारा त्रास याचा विचार करुन तातडीने मे.पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श,मुंबई यांना कार्यादेश क्र.एसएसएस/वशी-साभनि/१६३३/ २०१२ दि.१३/०७/२०१२ पारीत करण्यास आलेला आहे.तरी सदर विषयास मंजुरी असावी हि विनंती.

**निर्णय क्र.६९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- भक्तनिवास विभागप्रमुख)

---

**विषय नं. ४५ मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांची अनामत रक्कम परताव्याबाबत**

**प्रस्ताव-** दि.०१/०६/२०११ते३१/०५/२०१२ या एक वर्षाचे कालावधीसाठी संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारातवती निवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान या इमारतीमधील खोल्यामध्ये साईभक्तांना ढेकुण झुरळे आदी किटकाचा त्रास होऊ नये म्हणुन वर्षातुन सहा किटकनाशक फवारण्या प्रति चौ.फुटास ००.८० पैसे व सहा महिन्यातुन एकदा व वर्षातुन दोन वेळा उपरोक्त इमारती व परीसरामध्ये मोफत फॉंगिग ट्रिटमेंन्ट करणेबाबत दि.२१/०५/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे झालेल्या चर्चा वाटाघाटीनुसार मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांना दि.२६/११/२०११ रोजी रितसर अटी/शर्तीसह करारनामा करण्यात आला. कामाची हमी म्हणुन मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांनी खालीलप्रमाणे अनामत रक्कमेचा भरणा संस्थानचे लेखाशाखेत केला आहे.

मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे हे करत असलेली किटकनाशक औषध फवारणी प्रभावी नसल्याचे वेळोवेळी केलेल्या समक्ष पाहणीमध्ये आढळुन आल्याने व साईभक्तांनी तक्रार केल्याने साईप्रसाद निवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडुन त्यांना वेळोवेळी करारनाम्यानुसार काम करणेबाबत पत्रे देण्यात आली,समक्ष पाचारण करुन सक्तनिर्देश देण्यात

आले.परंतु संबंधितांनी याबाबत काहीच कार्यवाही केली नाही.प्रत्येकवेळी पुढील फवारणीच्या वेळी १०० % परिणाम दाखवतो असे सांगुन वेळमारुन नेली व कार्यकाल पुर्ण केला.कार्यकाल पुर्ण झ ाल्यानंतर (३१/०५/२०१२ नंतर) पुढील ०२ महिने ज्या खोल्यांमध्ये किटकांचा प्रादुर्भाव आहे (किटकनाश औषध फवारणी करुनही) अशा खोल्यांमध्ये किटकांचा संपुर्ण नायनाट होईपर्यन्त स्वखर्चाने किटकनाशक फवारणी करुनदेणे बंधनकारक असतानाही फवारणी केली नाही.त्यामुळे त्यांचेकडुन अटी/शर्ती नं.१० चा भंग झालेला आहे. सदर कालावधी मध्ये किटकांचा प्रादुर्भाव वाढल्याने साईभक्तांना किटकांचा त्रास होऊ नये म्हणुन विभागामार्फत किटकनाशक औषधे खरेदी करुन आपले कर्मचा-याकरवी किटकनाशक औषधफवारणी करण्यात आली.

त्यामुळे सदर बाब मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ रोजीचे सभे समोर सविस्तर टिपणीद्वारे सादर करण्यात आली यावर सविस्तर चर्चा होऊन मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांचे काम समाधानकारक नसल्याने नविन ठेकेदार नियुक्तीसाठी जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. नविन ठेकेदाराची नियुक्ती झाले नंतर मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांची निविदा रद्द करण्यात यावी असे ठरले,त्यास अनुसरुन दि.२३/०२/२०१२ रोजी रितसर निविदा वर्तमानपत्रात जाहिर करुन निविदा प्रक्रिया चालु करण्यात आली व दि.२६/०६/२०१२ रोजी समक्ष चर्चे/वाटाघाटीद्वारे निर्णय होऊन नविन ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली या कार्यवाही मध्ये मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांचा कार्यकाल दि.३१/०५/२०१२ रोजी संपुष्टात आला.

त्याचप्रमाणे मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांनी मान्य केल्याप्रमाणे व करुन दिलेल्या करारनाम्यामधील अटी/शर्ती नंबर-२१ नुसार नेमुण दिलेल्या सर्व निवासस्थाने व परीसरामध्ये मलेरिया,डेंगु,चिकन गुणिया आदी मच्छराचे बंदोबस्ताकरीता दर सहा महिन्यातुन एकदा व वर्षातुन दोनवेळा मोफत फॉगिग ट्रिटमेंन्ट करुन देण्यात यावे असे नमुद आहे. व तसा कार्यादेश पारीत करण्यात आला आहे.

तथापी मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांनी त्यांना दिलेल्या कार्यकालामध्ये एकदाही नेमुण दिलेल्या निवासस्थानामध्ये व परीसरात फॅगिग ट्रिटमेंन्ट केलेली नाही शिर्डी कार्यक्षेत्रावरील त्यांचे कामगार व त्यांनाही समक्ष याबाबत वारंवार सागुनही त्यांनी फॉगिग ट्रिटमेन्ट केली नाही.

यावरुन मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांनी दि.२६/११/२०११ रोजी करुन दिलेल्या करारनाम्यातील अटी/शर्ती नंबर- २१ नुसार कार्यवाही केलेली नाही. सबब त्यांनी अटी/शर्ती नं.१० व २१ व इतर अटी/शर्तीचा भंग केलेला आहे. त्यामुळे अटी/शर्ती नंबर-२४ नुसार कामाचे हमीपोटी त्यांनी आपल्याकडे भरलेली अनामत रक्कम रुपये २८७९०/- अठ्ठावीस हजार सातशे नव्वद मात्र) संस्थान जमा करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- भक्तनिवास विभागप्रमुख)

---

**विषय नं.४६ साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग इमारतीचे पुर्वेकडील सार्वजनिक संडास, बाथरुम पे ॲण्ड युज तत्वावर चालविणेस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे पुर्वेकडील शिर्डी नगरपंचायतीचे पिण्याचे-पाणी टाकीजवळील सार्वजनिक संडास बाथरुममध्ये महिला व पुरुषांकरीता अनुक्रमे-०५ संडास-०५ बाथरुम-०२ मुतारी आहेत. पुर्वी सदरच्या संडास बाथरुम समोरचे पटांगण मोकळे असल्याने उत्सव/गर्दीमध्ये कालावधीमध्ये सदरचे ठिकाण वाहन पार्कीग करीता उपयोगात आणले जात असे तसेच भक्तांची अतिरीक्त निवासव्यवस्था करणेकामी कापडी मंडप गर्दीकालखंडात उभारण्यात येत असे. सदर ठिकाणी भक्तांचे सोईसाठी उपरोक्त प्रमाणे सार्वजनिक संडास-बाथरुम निर्माण केले होते.

साईआश्रम इमारत निर्मीती नंतर सदर सार्वजनिक संडास बाथरुमचा साईभक्त वापर करत नाहीत सदर सेवेचा उपयोग सभोवतालचे नागरीकच करत असतात त्यामुळे सदर ठिकाणी नेहमी अस्वच्छता असते. साईभक्तांचा सदर सुविधेचा वापर बंद झाल्याने हि सुविधा बंद न करता नाममात्र शुल्कावर सार्वजनिक संडास बाथरुम ठेकेदारास चालविण्यास दिल्यास सदर ठिकाणच्या स्वच्छते बरोबर सभोवतालच्या रहिवाशांची सोय होईल. भविष्यामध्ये साईआश्रम इमारतीचे वाहनतळ या सार्वजनिक संडास बाथरुम इमारतीचे समोरच असल्याने वाहनचालकांची संडास बाथरुम सुविधा चांगल्या प्रकारे होऊ शकेल.

करीता वीज आकार,पाणी आकार, नियमानुसार व नाममात्र परवाना शुल्क देऊ करणा-या परीसरातील स्वच्छता ठेकेदार यांना उपरोक्त सार्वजनिक संडास बाथरुम पे ॲन्ड युज तत्वावर देणेस व त्याचेकडुन दरपत्रके मागविण्यास मान्यतेकामी त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०१ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग इमारतीचे पुर्वेकडील सार्वजनिक संडास/ बाथरुम, पे ॲण्ड युज तत्वावर चालविणेस देणेकामी स्वच्छता ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- भक्तनिवास विभागप्रमुख)

---

**विषय नं.४७ साईआश्रम भाग १ (खोल्या) व साईआश्रम भाग- २ (हॉल) चे सेवा आकार निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईंचे दर्शनासाठी शिर्डीस येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यादृष्टीने भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी श्री साई ट्रस्ट, चेन्नई यांनी दिलेले देणगीतुन संस्थानने साईआश्रम भाग १ व साईआश्रम भाग २ या भव्य इमारतींचे बांधकाम केलेले आहे. सदरचे बांधकाम पुर्ण झालेले असुन सदरच्या इमारती भक्तांचे निवासासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.

साईआश्रम भाग १ व भाग २ या इमारतींमध्ये खालील प्रमाणे एकूण खोल्या / हॉल्स असुन त्यामध्ये खालील तपशीलात नमुद केल्याप्रमाणे भक्तांची निवासक्षमता आहे.

**अ) साईआश्रम :- ०१ (१२ इमारती)**

| अ.नं | एकूण इमारती | एकूण मजले | प्रत्येक इमारतीमधील रुमची संख्या | एकूण रुमची संख्या | एका रुममध्ये भक्त निवास क्षमता | एकूण होणारी निवास क्षमता (भक्तांची संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | इमारती - ०९ ( नॉन एसी ) | तळमजला +३ (G+३) | १२८ रुम | ११५२ | ३+२= ५ | ५,७६० |
| ०२ | इमारती - ०३ ( एसी ) | तळमजला +३ (G+३) | १२८ रुम | ३८४ | ३+२= ५ | १,९२० |
| **एकूण** | **इमारती - १२** | | | **१,५३६** | | **७,६८०** |

प्रत्येक रुममध्ये तीन कॉटची व्यवस्था केलेली आहे. याशिवाय भक्तांचे मागणीनुसार जादा दोन गादया, चादरी व फायबर उशी पुरविल्या जातील. १२ इमारती पैकी ३ इमारतीमध्ये एसी रुमची व्यवस्था करण्यात येणार आहे.

**ब) साईआश्रम :- २ (०६ इमारती)**

| अ.न. | एकूण इमारती | मजले | प्रत्येक इमारतीमधील हॉल ची संख्या | एकूण हॉलची संख्या | एका हॉलमधील भक्ताची निवास क्षमता | एकूण होणारी निवासक्षमता (भक्तांची संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | इमारती - ०५ | तळमजला +३ (G+३) | ३२ हॉल | १६० हॉल | १८+२=२० | ३,२०० |
| ०२ | इमारत - ०१ | तळमजला +३ (G+३) | ३२ हॉल | ३२ हॉल | १४+१४=२८ | ८९६ |
| **एकूण** | **इमारती - ०६** | | | **१९२** | | **४०९६** |

एका हॉलमध्ये १८ कॉटची व्यवस्था केलेली आहे. त्यात प्रत्येक हॉलमध्ये भक्तांचे मागणीनुसार जादा दोन गादया,चादर पुरविल्या जातील.

साईआश्रम भाग १ व २ या प्रकल्पासाठी खालील तपशीलात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे संबंधीत विभागांमार्फत खर्च झालेला आहे.

| अ.नं. | विभागाचे नाव | झालेला खर्च | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | साईआश्रम-१ | साईआश्रम-२ | | |
| १ | शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई मार्फत | ६२,५२,३३,३१७/- | २७,१७,५७,६२६/- | | |
| २ | बांधकाम विभाग(संस्थान) | १८,३५,७०,४६९/- | १६,८३,०५,३७२/- | | |
| २ | विद्युत विभाग (संस्थान) | ७,२०,१९,०५७/- | ४,४३,७५,४१६/- | | |
| ३ | खरेदी विभाग (संस्थान) | २,५९,२५,९२७/- | १,४१,५०,०२५/- | | |
| ४ | पाणी पुरवठा विभाग (संस्थान) | -- | -- | | |
| ५ | साईआश्रम १ व २ विभाग (संस्थान) | १८,५४,९२२/- | २,३१,८३७/- | | |
| | **एकूण खर्च** | **९०,८६,०३,६९२/-** | **४९,८८,२०,२७६/-** | **१४०,७४,२३,९६८/-** | |
| + | **गार्डन साठी झालेला खर्च** | | | **३५,००,०००/-** | |
| | **एकूण झालेला खर्च** | | | **१४१,०९,२३,९६८/-** | |

सध्या द्वारावती भक्तनिवासस्थान, श्री साईप्रसाद निवासस्थान व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००रुम) या इमारतींमध्ये श्रीसाईभक्तांचे निवासाची व्यवस्था करण्यात येत आहे. सदरचे निवासस्थानामध्ये निवासासाठी येणा-या साईभक्तांकडुन खालील प्रमाणे सेवाआकार व डिपॉझीट घेण्यात येत आहे.

**◈ द्वारावती भक्तनिवास ◈**

| अ.नं. | तपशील | खोली/ हॉलची संख्या | सेवाआकार २४ तासासाठी | | व्यक्ती संख्या | निवासव्यवस्था क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सेवाआकार | डिपॉझीट | | |
| १ | A.C. रुम | ८० | ९०० | १००० | ०३ | ०३ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी रु ५०/- प्रमाणे गादी व चादर सह (जादा ०२ व्यक्ती मर्यादा) |
| २ | Non A.C. रुम | २३६ | ५०० | ५०० | ०३ | ०३ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी रु ५०/- प्रमाणे गादी व चादर सह ( जादा ०२ व्यक्ती मर्यादा) |
| | | ३१६ | | | | |

**◈ साईप्रसाद निवासस्थान विभाग ◈**

| अ.नं. | तपशील | खोली/ हॉलची संख्या | सेवाआकार २४ तासासाठी | | निवासव्यवस्था क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| | | | सेवाआकार | डिपॉझीट | |
| १ | साईप्रसाद नं. ०१ साधे रुम | ६० | १००/- | १००/- | ०८ ते १० व्यक्ती मर्यादा दोन कॉट |
| २ | साईप्रसाद नं. ०१ नविन दोन रुम | रुम नं. ८२/८४ | १५०/- | २००/- | ०८ ते १० व्यक्ती मर्यादा दोन कॉट |
| ३ | साईप्रसाद नं. ०१ नविन दोन रुम | रुम नं. ८३/८५ | २००/- | २००/- | १० ते १२ व्यक्ती मर्यादा दोन कॉट |
| ४ | साईप्रसाद नं. ०१ व्ही आय पी रुम | २१ | १५०/- | १५०/- | ०४ ते ०५ व्यक्ती दोन कॉट |
| ५ | साईप्रसाद नं. ०२ साधे रुम | ५४ | २२५/- | २००/- | ०४ व्यक्ती करीता पुढील व्यक्तीस ५०/- रुपये जादा दोन कॉट |
| ६ | साईप्रसाद नं. ०२ व्ही आय पी रुम गिझर सह | १८ | ३००/- | ३००/- | ०६ व्यक्ती करीता पुढील व्यक्तीस ५०/- रुपये जादा दोन कॉट |
| ७ | साईप्रसाद नं. ०२ मोठे रुम | ०६ | ४००/- | ४००/- | ०८ व्यक्ती करीता पुढील व्यक्तीस ५०/- रुपये जादा दोन कॉट |
| ८ | शांतिनिकेतन लहान रुम | ११ | २००/- | २००/- | ०४ ते०६ व्यक्ती मर्यादा दोन कॉट |
| ९ | शांतिनिकेतन मोठे रुम | ०४ | ३००/- | ३००/- | ०६ ते ०८ व्यक्ती मर्यादा दोन कॉट |
| १० | समर्पण | ०२ | २००/- | २००/- | ०३ ते ०४ व्यक्ती दोन कॉट |
| ११ | साईउदयान लहान रुम | १६ | ५०/- | १००/- | ०८ ते १० व्यक्ती पर्यंत दोन कॉट |
| १२ | साईउदयान मोठे रुम | २० | १००/- | १००/- | १५ ते २० व्यक्ती पर्यंत दोन कॉट |
| १३ | सेवाधाम | ६६ | ५०/- | १००/- | ०३ ते ०४ व्यक्ती पर्यंत एक कॉट |
| १४ | साईउदयान हॉल | १२ | ४००/- | ४००/- | ५० व्यक्ती पर्यंत |
| १५ | साईउदयान लॉकर | ९९ | १०/- | १००/- | ०२ व्यक्ती करीता |
| १६ | साईनिवास अतिथीगृह A/C | २४ | ८००/- | ५००/- | ०२ व्यक्ती करीता तसेच पुढील प्रत्येक व्यक्तीस रु. २००/- |
| १७ | साईछाया | ०१ | १०००/- | १०००/- | अंदाज एका हॉल मध्ये ५० माणसे राहु शकतात |
| १८ | मंगल कार्यालय | ०२ | १०००/- | १०००/- | १००० साईभक्त राहु शकतात |

**◈ साईबाबा भक्तनिवासस्थान ◈**

| अ.नं. | तपशील | सेवाआकार २४ तासासाठी | | व्यक्ती संख्या | निवासव्यवस्था क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| | | सेवाआकार | डिपॉझीट | | |
| १ | ३ कॉट खोल्या संडास बाथरुमसह | १२५/- | ३००/- | ३ | ३ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी रु २७+३ गरमपाणी = ३० प्रमाणे गादी व चादर सह ०५ व्यक्ती मर्यादा |
| २ | ४ कॉट खोल्या संडास बाथरुमसह | १५०/- | ३००/- | ४ | ४ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी रु २७+३ गरमपाणी = ३० प्रमाणे गादी व चादर सह ०६ व्यक्ती मर्यादा |
| ३ | ३ कॉट नॉन एसी खोल्या दोन संडास / बाथरुमसह व गिझर | ४०० | ६००/- | ३ | ०३ पेक्षा जादा व्यक्तीस प्रत्येकी रु. ५०/- प्रमाणे ( १० वर्षा पर्यंत मुले वगळुन ) गादी व चादरसह जादा ०५ व्यक्ती मर्यादा |
| ४ | ३ कॉटा एसी खोल्या दोन संडास | ५५०/- | ७००/- | ३ | ०३ पेक्षा जादा व्यक्तीस प्रत्येकी रु. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | / बाथरुमसह व गिझर | | | | १००/- प्रमाण ( १० वर्षा पर्यंत मुले वगळुन ) गादी व चादरसह जादा ०६ व्यक्ती मर्यादा |
| ५ | ६ कॉट नॉन एसी खोल्या ट्रान्झीट सुट व दोन संडास / बाथरुमसह | ६००/- | ७००/- | ६ | पुढील जादा व्यक्तीची मर्यादा २ पर्यंत प्रती व्यक्ती रु. ५० /- प्रमाणे सेवा आकार ( १० वर्षा पर्यंत मुले वगळुन ) |
| ६ | ६ कॉट एसी खोल्या दोन संडास/ बाथरुमसह गिझरसह | १०००/- | १२००/-. | ६ | पुढील जादा व्यक्तीची मर्यादा २ पर्यंत प्रती व्यक्ती रु. १०० /- प्रमाणे सेवा आकार ( १० वर्षा पर्यंत मुले वगळुन ) |
| ७ | ११ कॉट खोल्या दोन संडास/ बाथरुमसह गिझरसह | ५५०/- | ४५०/- | ११ | ११ पेक्षा जादा व्यक्तीस प्रत्येकी रु . २७ /- प्रमाणे जादा ०५ व्यक्ती पर्यंत मर्यादा |
| ८ | १२ कॉट खोल्या दोन संडास/ बाथरुमसह गिझरसह | ५००/- | ६००/- | १२ | १२ पेक्षा पुढील जादा व्यक्तीस प्रत्येकी रु .३० प्रमाणे जादा ०४ व्यक्तीपर्यंत मर्यादा |
| ९ | तळमाळा साध्या खोल्या संडास / बाथरुमसह कॉट नाही | १००/- | ३००/- | १० | जादा व्यक्तीस रु १०+३ गरमपाणी = १३ प्रमाणे आकार ०३ जादा व्यक्तीची मर्यादा |
| १० | जनरल हॉल नं. ३०१,३०२ गादया व संडास / बाथरुमसह | ५००/- | ६००/- | ५० | गरमपाणी रु.३/- प्रमाणे जादा आकार |
| ११ | स्टोअर हॉल ३० गादया व बिगर संडास/ बाथरुम | ३००/- | ४००/- | ५० | |
| १२ | १९८ लॉकर्स , संडास व बाथरुम कॉमन | १००/- | १०/- | १०० | |
| | गादी | ५/- | ------ | | |
| | चादर | ३/- | २००/- | | |
| | गरमपाणी पहाटे ( ४ ते १२ ) | प्रती बादली ३/- | | | |

नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या साईआश्रम भाग १ आणी २ या इमारतीमध्ये भक्तांना खालील प्रमाणे सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

| अ.नं. | सुविधा तपशील |
|---|---|
| १. | साईआश्रम - १ मध्ये १२ इमारतीपैकी ३ इमारतीसाठी एसीची सुविधा देण्यात येणार आहे. (म्हणजेच ३८४ रुम एसी राहणार आहेत.) |
| २. | ९ इमारती या नॉन एसी रुम राहणार आहे (म्हणजेच ११५२ रुम नॉन एसी राहणार आहेत.) |
| ३. | एसी व नॉन एसी प्रत्येक रुम मध्ये खालील दर्शविल्याप्रमाणे साईभक्तांच्याचे सुविधेसाठी साहीत्य पुरविण्यात येणार आहे. |

| अ.नं. | वस्तुचे नाव | नग | अ.नं. | वस्तुचे नाव | नग | अ.नं. | वस्तुचे नाव | नग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कॉट | ३ | ७ | मग | १ | १३ | बेडशिट (३+२) | ५ |
| २ | क्वायर मेट्रेस फोम गादी | ३ | ८ | डस्टबीन | १ | १४ | चादर (३+२) | ५ |
| ३ | रबरराईज्ड टू फोल्ड गादी (मागणीनुसार) | २ | ९ | अंघोळीचे स्टुल | १ | १५ | आरसा | १ |
| ४ | फायबर उशी (३+२) | ५ | १० | बादली | १ | १६ | रॉड | १ |
| ५ | स्टिल ग्लास | २ | ११ | प्लास्टीक खुर्ची | २ | १७ | स्वच्छतागृहात मग | १ |
| ६ | वॉटर जग | १ | १२ | उशीकव्हर (३+२) | ५ | -- | -- | -- |

| | |
|---|---|
| ४. | ठरविला जाणारा सेवा आकार २४ तासासाठी असेल. |
| ५. | सौर उर्जा प्रणालीद्वारे रुममध्ये २४ तास गरमपाणी. |
| ६. | भक्तांना पहील्या, दुस-या व तिस-या मजल्यावर जा ये करण्यासाठी २४ तास स्वयंचलित लिफ्ट सुविधा. |
| ७. | एसी रुममध्ये टर्किश टॉवेल व हात धुण्यासाठी साबण वडीची सुविधा. |
| ८. | २४ तास विद्युत पुरवठा. |
| ९. | विभागाच्या परीसरामध्ये रेस्टॉरंट सुविधा. |
| १०. | परिसरामध्ये डॉक्टर कॅबीन व २४ तास मेडिकल स्टोअरची सुविधा. |
| ११. | परिसरात राष्ट्रीयकृत बँकेची ATM सुविधा. |
| १२. | श्रींच्या दर्शनासाठी भक्तांना जाणे - येणे साठी फ्री बस सेवा. |
| १३. | विभागाच्या परीसरात भक्तांचे सामान वाहतुकीसाठी लगेज ट्रॉलीची सुविधा. |
| १४. | भक्तांना रुम पर्यंत जाणे येणे कामी बॅटरी कारची सुविधा. |
| १५. | रुम चेक आऊट नंतर बेडशिट, उशीकव्हर व चादर बदलण्यात येईल. |
| १६. | साईआश्रम - २ मधील हॉल मध्ये १८ कॉट टाकुन ग्रुप असलेले साईभक्त व पालख्यांची सुविधा व सामान ठेवणेसाठी लॉकर सुविधा. |
| १७. | दोन्ही विभागाचे संकेतस्थळावरुन रुम बुकींग सुविधा. |
| १८. | दोन्ही विभागात विशेष लक्ष देऊन वारंवार साफसफाई चे नियोजन. |
| १९. | भक्तांना डास, ढेकूण, झुरळे इत्यादी किटकांचा त्रास होऊ नये म्हणून किटकनाशक फवारणी ( पेस्ट कंट्रोल ) करणे. |

साईआश्रम भाग १ व २ या इमारतीचे बांधकाम व अनुषंगीक कामे पुर्ण झालेली असुन, किरकोळ शिल्लक असलेली कामे पुर्ण करुन या इमारती भक्तांचे निवासासाठी शक्य तेवढया लवकर

उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्याने तत्पुर्वी या इमारतीमधील खोल्या व हॉल्सचा सेवाआकार निश्चित करणे आवश्यक आहे.

**I - सेवाआकार निश्चिती बाबत.**

साईआश्रम भाग १ /२ या इमारतींचे बांधकामासाठी श्री साई ट्रस्ट, चेन्नई या धर्मदाय संस्थेने आर्थिक सहाय्य केलेले असल्यामुळे या प्रकल्पा संदर्भात सदर ट्रस्ट आणी श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी या दोहोंमध्ये दिनांक ०४/०२/२००६ रोजी झालेल्या लेखी करारनाम्यात श्री साईभक्तांची या इमारतींमध्ये निवासव्यवस्था करतांना सेवाआकाराच्याबाबत खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

The Sansthan will offer the accommodation only to the devotees of shirdi Saibaba visiting Shirdi.

The Sansthan will provide the accommodation to the devotees at a concessional cost,without any profit.

The Sansthan specifically agrees to provide accommodation in Sai Ashram buildings,to the needy and deserving poor devotees at a subsidized cost including the cost of all facilities and amenities,as follows.

१. atleast १०% of the accommodation in Sai Ashram will be given at a cost not exceeding १० Rs. per person per day of stay.

२. atleast ४०% of the accommodation in Sai Ashram will be given at a cost not exceeding ५० Rs. per person per day of stay.

३. the balance accommodation in Sai Ashram, may be givin at any nominal cost as decided by the Sanshtan.

उपरोक्त प्रमाणे करारनाम्यामध्ये भक्तांकडुन आकारणी करावयाच्या सेवाआकाराबाबत तरतुद करण्यात आलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **साईआश्रम भाग १** | खोल्यांची संख्या १५३६ | यामध्ये भक्तांची एकूण निवासक्षमता --- | ७६८० |
| **साईआश्रम भाग २** | हॉलची संख्या १९२ | यामध्ये भक्तांची एकूण निवासक्षमता --- | ४०९६ |
| | | **एकूण ---** | **११७७६** |

शिर्डीला येणा-या साईभक्तांमध्ये बरेचशे भक्त हे गोरगरीब स्थरातील असतात. त्यामुळे करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे १००% धारणक्षमता गृहीत धरल्यास

| **अ.नं.** | **तपशील** | **भक्त संख्या** |
|---|---|---|
| १ | करारनाम्यातील तरतुदीनुसार प्रती भक्त रु. १०/- याप्रमाणे भाग १ व २ या इमारतीमधील एकूण भक्तसंख्येच्या निवासक्षमतेच्या १०% प्रमाणे येणारी भक्त संख्या | ११७७ |
| २ | करारनाम्यातील तरतुदीनुसार प्रती भक्त रु. ५०/- याप्रमाणे एकूण भक्तसंख्येच्या निवासक्षमतेच्या ४०% प्रमाणे येणारी भक्त संख्या | ४७१० |
| | **एकूण-** | **५,८८७** |

करारनाम्यातील तरतुदीनुसार उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भाग १ व भाग २ मधील एकूण भक्त निवासक्षमतेच्या १०% + ४०% प्रमाणे एकूण ५८८७ भक्तांची निवासव्यवस्था आरक्षीत करण्यात आलेली आहे.

साईआश्रम भाग २ या इमारतीमध्ये भक्तांची निवासक्षमता ४०९६ आहे. त्यानुसार या इमारतीमधील हॉलमध्ये एवढया भक्तांची निवास साईआश्रम भाग २ या इमारतीमध्ये करता येईल.

| | | |
|---|---|---|
| करारानाम्यातील तदतुदी नुसार एकूण निवासक्षमतेच्या १० % | प्रती व्यक्ती रु.१० /- प्रमाणे --- | ११७७ |
| करारानाम्यातील तदतुदी नुसार एकूण निवासक्षमतेच्या ४० % | प्रती व्यक्ती रु.४० /- प्रमाणे --- | २९१९ |
| | **एकुण भक्त संख्या ---** | **४०९६** |

करारनाम्यातील तरतुदीनुसार आरक्षीत ५८८७ भक्तसंख्येपैकी ४०९६ एवढया भक्तांची साईआश्रम भाग २ मध्ये निवासव्यवस्था केल्यानंतर ५८८७ – ४०९६ = १७९१ एवढया संख्ये इतके भक्तांची निवासव्यवस्था साईआश्रम भाग १ मधील इमारतीमध्ये करता येईल व त्यासाठी १७९१ / ५ = ३५८ एवढया खोल्यांची आवश्यकता राहील.

साईआश्रम भाग १ व भाग २ कडील खोल्या व हॉल भक्तांचे निवासासाठी उपलब्ध करुन देण्यासाठी करारनाम्यातील तरतुदीनुसार सेवाआकाराची निश्चिती केल्यास, साईआश्रम भाग १ मधील नॉन एसी रुम ३५८ खोल्यांसाठी प्रती भक्त रुपये ५०/- प्रमाणे ५ भक्तांसाठी प्रती खोलीचा सेवाआकार रु.२५०/- निश्चित करावा लागेल व शिल्लक रहाणा-या ११७८ खोल्यांचा सेवाआकार प्रति खोली अंदाजे रु. ५००/- असा राहील. त्यामुळे सारख्याच आकाराच्या व टाईपच्या खोल्यांसाठी

सेवाआकार निश्चितीमध्ये मोठया प्रमाणात विसंगती निर्माण होईल व भक्तांचे निवासासाठी खोल्या देतांना मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होतील तसेच कमी-जास्त सेवाआकार घेतांना भक्तांचे मध्ये गैरसमज निर्माण होईल.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन दि. २०/०८/२०१२ रोजी श्री शिर्डी साई ट्रस्ट चेन्नईचे कार्यकारी विश्वस्त श्री रमणी सो. यांचेशी साईआश्रम भाग १ व २ मधील हॉल व खोल्यांचे सेवाआकाराबाबत चर्चा केली असता चर्चेत साईआश्रम भाग २ मधील सर्व हॉलमध्ये प्रती भक्तांसाठी रु. १०/- सेवाआकार निश्चित करणेत यावा व ना नफा ना तोटा तत्वावर साईआश्रम भाग १ मधील खोल्यांचा सेवाआकार निश्चित करणेत यावा अशी चर्चा झालेली आहे. त्यानुसार साईआश्रम भाग २ कडील १९२ हॉलमध्ये निवासक्षमतेनुसार ४०९६ एवढी भक्तनिवासक्षमता असुन ४०९६ भक्तांचेकडुन प्रती भक्त रु.१०/- प्रमाणे सेवाआकार आकारणी करता येईल.

साईआश्रम भाग १ व दैनंदीन ७०% धारणक्षमता धरल्यास संस्थानला दैनंदीन खालील प्रमाणे सेवाआकाराची रक्कम मिळेल

| अ.नं | एकुण खोल्या | ७०% धारणक्षमता | खोलीचा दैनंदीन सेवाआकार रु. पै. | रक्कम रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ११५२ नॉनएसी | ८०६ | ५००/- | ४०,३०००/- |
| २ | ३८४ एसी | २६९ | ९००/- | २४,२१००/- |
| ३ | साईआश्रम भाग २ १९२ हॉल | २८६७ भक्त | प्रती भक्त रु.१०/- | २८,६७०/- |
| | | | एकूण | ६,७३,७७०/- |
| प्रती खोलीमध्ये ५ भक्त निवासक्षमता धरल्यास जादा गादयांचा ७० % प्रमाणे येणारा सेवाआकार रक्कम रुपये | | | | ६२,५००/- |
| **एकूण** | | | | **७,३४,२७०/-** |

श्री साईआश्रम भाग १ व २ मधील इमारतीमध्ये भक्तांची निवासव्यवस्था करणेसाठी दोनही इमारतीसाठी खालील प्रमाणे अंदाजित **दैंनदिन खर्च** अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **खर्चाचा तपशील** | **रक्कम** |
|---|---|---|
| १ | विद्युत | ८०,३१९ |
| २ | पाणीपुरवठा /प्लंबींग | १०,९८१ |
| ३ | कर्मचारी वेतन ( कायम व कंत्राटी ) | ३,५३,३६९ |
| ४ | किटकनाशक औषध फवारणी | ३,७४२ |
| ५ | नगरपंचायत / ग्रामपंचायत कर | २०,५४८ |
| ६ | बस सेवा | १५,०५० |
| ७ | लॉन्ड्री चार्जेस | १,६९,५७८ |
| ८ | स्टेशनरी व संगणकीय खर्च (@ १.२५%) | ४६,३८७ |
| | एकूण | ६,९९,९७४ |
| | + लाईट, पाणीपट्टी, घरपट्टी,कर्मचारी वेतन या शुल्काच्या आकारणीत वेळोवेळी होणारी वाढ, रोजच्या वापरातील वस्तु तसेच चादर,बेडशीट या सारखे वापर करावयाचे कपडे खराब होणे,फाटणे, हरविणे वापरातील वस्तुंचे किमंतीत होणारी वाढ व इतर चार्जेस ( @ २५% Year) | १,७४,९९३ |
| | **एकूण खर्च रु.** | **८,७४,९६७** |

साईआश्रम भाग १ व २ या मधील इमारती भक्तांचे निवासासाठी कार्यान्वीत करण्यासाठी उपरोक्त तपशीलात नमुद केलेप्रमाणे दैनंदीन खर्च अपेक्षीत आहे.

साईआश्रम भाग १ मधील ३ इमारतीच्या १२८ x ३ = ३८४ खोल्या ए.सी. करण्याचा प्रस्ताव आहे.

उपरोक्त सर्व तपशीलानुसार-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग २ मधील ४०९६ बेड प्रती व्यक्ती रुपये | --- | १०/- |
| २ | साईआश्रम भाग १ मधील ११५२ नॉन ए.सी. खोली, प्रती खोली रुपये | --- | ५००/- |
| ३ | साईआश्रम भाग १ मधील ३८४ ए.सी. खोली, प्रती खोली रुपये | --- | ९००/- |
| ४ | साईआश्रम भाग १ मधील जादा व्यक्तीसाठी (प्रत्येकी) | --- | ५०/- |

याप्रमाणे सेवाआकार घेवुन साईआश्रम भाग १ व २ मध्ये भक्तांचे निवासासाठी निवासस्थाने देता येतील.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.४८ संस्थानचे निवासस्थानमधील रुम देताना साईभक्तांकडून अनामत रक्कम (डिपॉझीट) न घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना संस्थानकडुन चहा, पाणी, कॉफी, दुध, नाष्टा, प्रसादाभोजन, निवास, औषधोपचार यासारख्या अत्यावश्यक जास्तीत जास्त पायाभुत सुविधा माफक दरात उपलब्ध करुन देण्यात येतात. याचाच एक भाग म्हणुन भक्तांचे निवासासाठी संस्थानचे श्री साईप्रसाद निवासस्थान, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती निवासस्थान या निवासस्थान विभागांमार्फत भक्तांची निवासव्यवस्था निश्चित करण्यात आलेल्या माफक सेवाआकार दराने करणेत येत आहे.

संस्थानचे इमारतीमध्ये भक्तांची निवासव्यवस्था करतांना, त्यांना खोली देते वेळी खोलीचे दैनंदीन सेवाआकारा एवढी रक्कम अनामत ( डिपॉझीट ) रक्कम म्हणुन संस्थानकडे जमा ठेवणेची पध्दत सध्या अस्तिवात आहे.

भक्तांना त्यांचे निवासासाठी खोली दिल्यानंतर संबंधीतांकडुन संस्थानची चीज वस्तु चोरीला जाणे, अथवा काही मोडतोड , अथवा संस्थानची नुकसान झाल्यास त्याची वसुली करणे, विहीत मुदतीचे वेळेपेक्षा खोलीमधील त्यांचे मुक्कामात काही जादा तास झाल्यास त्याचा ओव्हर स्टे चार्जेस घेण्यासाठी, तसेच खोलीमधील मुक्काम वाढल्यास त्याचे मुदतवाढीसाठी खोलीचे दैनंदीन सेवाआकरा एवढी रक्कम अनामत रक्कम संस्थानकडे जमा ठेवण्याचा उद्देश आहे.

मात्र परिस्थितीजन्य ठेवण्यात येणा-या अनामत रक्कमेबाबत आता भक्तांकडुन ठेवण्यात येणा-या अनामत रक्कमेबाबत खालील अडचणींना सामोरे जाण्याचे प्रसंग निर्माण होत आहेत.

| | |
|---|---|
| १ | अनामत रक्कमेमुळे गरीब साईभक्तांची रक्कम लॉक होऊन जाते. |
| २ | अनामत रक्कम परत घेण्यासाठी येणे जाणे यासाठी व सही करुन पैसे घेऊन जाणेसाठी भक्ताच्या वेळेचा अपव्यय होतो. |
| ३ | रिफंड काऊंटरवर गर्दीचे प्रमाण वाढते. |
| ४ | अनामत रक्कमेमुळे मोठया रक्कमेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जोखीम वाढते. |
| ५ | लेखा-परिक्षणाच्या अहवालामध्ये त्रुटी येतात. |
| ६ | काही साईभक्त डिपॉझीट न घेता जातात व त्यांचे गावी जाऊन पोस्टाने डिपॉझिटचे मागणीसाठी अर्ज करतात. |
| ७ | डिपॉझिट देवाण- घेवाण करतेवेळी कर्मचारी व साईभक्तांमध्ये वाद होतात. |
| ८ | काही प्रसंगी कायदेशीर बाबी निर्माण होतात. |
| ९ | रुम घेतेवेळी ज्या भक्तांची डिपॉझीट पावतीवर स्वाक्षरी असते त्याचा भक्ताची डिपॉझीट परत घेतांना स्वाक्षरी आवश्यक असते. तो भक्त जर श्रींच्या दर्शनासाठी किंवा अन्यत्र गेल्यास केवळ त्याच्या डिपॉझीट पावतीवरील स्वाक्षरीमुळे अनामत रक्कम त्यांचे समवेत असलेल्या भक्तांना दिली जात नाही. त्यामुळे भक्तांना तास न - तास थांबावे लागते अशावेळी त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. |

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता संस्थानच्या सर्व निवासस्थानामध्ये व सुरु होणा-या नविन साईआश्रम - १ व २ मध्ये साईभक्तांना रुम देते वेळी अनामत रक्कम न घेता निवास सुविधा उपलब्ध करुन दिल्यास निवासस्थान विभागामध्ये खालील प्रमाणे कामामध्ये सुटसुटीतपणा व पारदर्शकता राहील.

| | |
|---|---|
| १ | भक्तांचे पैसे अडकुन न पडल्यास संस्थानचे देणगीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. |
| २ | प्रत्येक पावतीवरील स्वाक्षरी तपासण्याचे अंतर्गत तपासणीस विभागाचे काम कमी होऊन हिशोबाचे कागद ठेवणेकमी होईल व लेखा परिक्षणाचे काम कमी होईल. |
| ३ | रात्री बे - रात्री व संपुर्ण दिवसभर कांऊटवरील अनामत रक्कमेपोटी जमा असलेली शिल्लक रक्कम संभाळण्याची जोखीम १०० % कमी होईल. |
| ४ | अनामत रक्कम अदा करणे कामी कर्मचा-यांचा वापर कमी होऊन खर्चात बचत होईल. |
| ५ | पोस्टाने अनामत रक्कम परत करणेबाबतचा पत्रव्यवहार १००% बंद होईल. |
| ६ | अनामत रक्कम देवाण- घेवाणबाबत भक्त व कर्मचा-यांमध्ये होणारे वाद व गैरसमज १०० % कमी होतील. |
| ७ | गरीब भक्तांचे पैसे लॉक होणार नाहीत |
| ८ | पैसे परत मागणीसाठी सही करणे, त्यासाठी रांगेत उभे राहणे यासाठी भक्ताचा वेळ वाचेल व अनामत रक्कम न घेतल्यामुळे रक्कम परत मिळणेसाठी भक्तांना तासनतास तिष्ठत बसावे लागणार नाही त्यामुळे भक्तांना मानसिक समाधान लागेल. |
| ९ | कायदेशीर उदभवणारी प्रकरणे १०० % संपुष्टात येतील. |

सद्य परिस्थितीत संगणक प्रणालीचा अवलंब करण्यात आलेला असल्याने भक्तांचे ओव्हरस्टेचे रिपोर्ट संगणकावर वेळचेवेळी मिळतात व त्यानुसार संबंधीत भक्तांकडुन नियमाप्रमाणे होणा-या जादा सेवाआकाराची रक्कम घेता येते. त्यामुळे सध्या तसे ओव्हर स्टे चे प्रमाण कमी झ ालेले आहे. विहीत वेळ पूर्ण होतांना भक्तांकडुनच खोली खाली करुन देण्याची कार्यवाही होत आहे. भक्तांना खोली उघडुन देतांना माळयावरील संस्थान कर्मचारी भक्तांना खोलीमध्ये असणा-या वस्तुची खातरजमा करुन करुन देतो. तसेच भक्तांनकडुन खोली खाली करुन दिल्यानंतरही माळयावरील

कर्मचारी खोलीमधील चीज वस्तुंची पुन्हा खातरजमा करतो. परिणामी नुकसानीचे प्रमाण नगण्य झालेले आहे. प्रसंगी भक्तांकडुन काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन देण्यास सांगितल्यास भक्तांकडुनही पैसे भरण्यात येतात. भक्तांनी खोलीचा सेवाआकार एक दिवसासाठी भरलेला असेल व प्रसंगपरत्वे त्यांचा मुक्काम वाढल्यास व त्याकारणे मुदतवाढ देणे आवश्यक झाल्यास त्यांचेकडुन संस्थान नियमाप्रमाणे सेवाआकार भरणा करुन घेऊन मुदतवाढ देता येते. क्वचीत प्रसंगी संस्थानची खोली घेतलेला भक्त खोलीस कुलूप लावुन बाहेरगावी गेला असल्यास अशावेळी त्या कुलूपासोबत "कृपया कांऊटर नं. १ वर संपर्क साधावा " अशा आशयाचा लहान बोर्ड मराठी - इंग्रजी भाषेत लावता येईल. त्यानुसार संबंधीत भक्त आल्यानंतर तो निवासस्थान कार्यालयाकडे संपर्क साधील.

उपरोक्तप्रमाणे बदललेली परिस्थिती विचारात घेता संस्थान कामाच्या सोयीच्या दृष्टीने, तसेच भक्तांचे दृष्टीने सारासार विचार करुन भक्तांचे निवासासाठी नव्याने सुरु होत असलेल्या साईआश्रम भाग १ व २ मधील इमारतीमध्ये भक्तांना खोली देतांना त्यांचेकडुन, अनामत ( डिपॉझीट ) रक्कम न घेता फक्त सेवाआकाराची रक्कम घेऊन निवासस्थान देण्यात यावे.

त्याचबरोबर सध्या कार्यरत असलेले १) श्री साईप्रसाद भक्तनिवास २) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ( ५०० रुम ) तसेच ३) द्वारावती भक्तनिवासस्थान या विभागाकडेही भक्तांना खोली देतांना फक्त सेवाआकर घेणेबाबत व सद्य परिस्थितीत घेण्यात येत असलेली अनामत रक्कम ( डिपॉझीट ) रक्कम घेणे यापुढे बंद करणेबाबत धोरणात्मक विचार व्हावा.

**निर्णय क्र.७०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान/ साईबाबा भक्तनिवासस्थान/ द्वारावती भक्तनिवास/ साईआश्रम १ व २/ आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.४९ साईआश्रम- १ व २ च्या एकूण १७ इमारतीमध्ये रुमबाबतचे मार्गदर्शन भक्तांना व्हावे यासाठी मार्गदर्शक/ दिशादर्शक बोर्ड बनवुन बसविणेकामी येणारा खर्च व त्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईंचे दर्शनासाठी शिर्डीस येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यादृष्टीने भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी श्री साई ट्रस्ट, चेन्नई यांनी दिलेले देणगीतुन संस्थानने साईआश्रम १ व साईआश्रम २ या भव्य इमारतींचे बांधकाम केलेले आहे. सदरचे बांधकाम पुर्ण झालेले असुन सदरच्या इमारती भक्तांचे निवासासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.

दि. ०१/०८/२०१२ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांनी साईआश्रम - १ ची पहाणी केली असता, १२ इमारतीमध्ये व परिसरामध्ये साईभक्तांसाठी रुम नंबरबाबत मार्गदर्शक / दिशादर्शक बोर्ड लावणे आवश्यक आहे. तत्पुर्वी A इमारतीमधील अंतर्गत बोर्ड तात्काळ तयार करण्यात येऊन, बसविण्यात यावेत व त्याबाबतचा डेमो दाखविण्यात यावा. डेमोमुळे बोर्ड साईज, बोर्डवरील मजकुर व बोर्ड लावण्याची जागा निश्चित होईल. त्यानुसार साईआश्रम - १ चे उर्वरीत ११ व साईआश्रम - २ च्या ६ इमारतीचे अंतर्गत बोर्ड तयार करुन घेता येतील असे निर्देश दिले होते.

या दोन्ही इमारतीमधील रुमवरील नंबर प्लेटचे काम मे. सोमवंशी एम.जी.,राहाता यांना जा.नं. एसएसएस / वशी - साईआश्रम १ व २ / ११८५ / २०१२ दि. १८/०६/२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यांचे त्याठिकाणी नंबर प्लेटचे काम चालु असल्याने मा. कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार मे. सोमवंशी एम.जी.,राहाता यांना बोलावुन इमारतीत आवश्यक असणारे बोर्ड तयार करुन A इमारतीमध्ये डेमो दाखविणेबाबत निर्देश दिले. त्यानुसार मे.सोमवंशी एम.जी. राहाता यांनी वेगवेगळया मजकुराचे व साईजचे एकूण १२० नग बोर्ड पी.व्ही.सी फोम सीट ५ एमएम व्हीनाईल प्रिटींगमध्ये केमिकल बाँडमध्ये आवश्यक त्या ठिकाणी फोर स्ट्रींग स्क्रु चा वापर करुन निश्चित केलेल्या जागेवर फिटींग करुन दिल्यानंतर, मा. कार्यकारी अधिकारी यांना दि. ०९/०८/२०१२ रोजी डेमो दाखविण्यात आला आहे.

खालील तक्यात दर्शविलेप्रमाणे एका इमारतीसाठी बोर्ड संख्या, बोर्ड लावण्याचे जागा, बोर्डसाठी वापरावयाचे मटेरिअल व मजकुर निश्चित करण्यात आले.

| अ.नं. | बोर्डचा मजकुर | साईज | संख्या | बोर्ड लावण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | विद्युत पॅनल रुम - १<br>तळमजला | ५"x१३" | ४ | पॅनल रुम वर (पहीला मजला, दुसरामजला,तिसरा मजला ) |
| २ | विद्युत पॅनल रुम - २<br>तळमजला | ५"x१३" | ४ | पॅनल रुम वर (पहीला मजला, दुसरामजला, तिसरा मजला ) |
| ३ | रुम नंबरचे दिशा दर्शक बोर्ड<br>उदा. १ ते ८ ९ ते १६<br>⇐ ⇒ | ९"x१८" | ३२ | तळमजला ,पहिला मजला,दुसरा मजला,<br>तिसरा मजला |
| ४ | तळमजला<br>Ground Floor | ८"x१४" | ४ | प्रत्येक माळयावरील लिफ्टच्या दरवाजा समोर तसेच रुम नंबर दिशा दर्शक बोर्डच्या वरती दोन्ही बाजुने |
| ५ | पहिला मजला<br>1st Floor | ८"x१४" | ४ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | दुसरा मजला<br>2nd Floor | ८"x१४" | ४ | |
| ७ | तिसरा मजला<br>3rd Floor | ८"x१४" | ४ | |
| ८ | स्टोअर रुम - १<br>STORE ROOM -1 | ७"x१०" | ४ | स्टोअर रुमवर |
| ९ | स्टोअर रुम - २<br>STORE ROOM -2 | ७"x१०" | ४ | स्टोअर रुमवर लावणे |
| १० | उदवाहन<br>LIFT | ८"x१०" | ४ | लिफ्टच्या दरवाजावर |
| ११ | थुंकू नका<br>DO NOT SPIT<br>स्वच्छता राखा<br>Please keep Cleanliness | ८"x११" | ८ | प्रत्येक मजल्यावरील जिना चढतांनाचे समोरील बाजुस |
| १२ | धुम्रपान निषिध्द<br>NO SMOKING | ५"x१०" | ४ | जिन्यांच्या टप्प्यावरील वळणावर |
| १३ | थुंकू नका<br>DO NOT SPIT | ८"x१०" | ४ | जिन्यांच्या टप्प्यावरील वळणावर |
| १४ | A डक्ट - १ | ७"x३" | १६ | प्रत्येक डक्टच्या दरवाजावर (१ ते १६) |
| १५ | दरवाजा नं. - १<br>Gate No - 1 | ६"x८" | ३ | इमारतीचे मुख्य प्रवेशद्वार सोडुन इमारतीला इतर तीन प्रवेशद्वार आहे त्यासाठी १ ते ३ |
| १६ | थुंकू नका<br>DO NOT SPIT<br>स्वच्छता राखा<br>Please keep Cleanliness | २२"x१७" | १६ | प्रत्येक इमारतीमधील खिडक्यावर लावणेसाठी |
| १७ | जिन्याकडे<br>STAIRCASE<br>⇨ | ११"x७" | १ | जिन्यासमोरील पिलरवर लावणेसाठी |
| | एकूण बोर्ड संख्या | | १२० | |
| | साईआश्रम - १ मधील एक इमारती सोडुन उर्वरीत ११ इमारती व साईआश्रम - २ मधील ६ इमारतीची एकुण संख्या | | १७ | |
| | **एकुण बोर्ड संख्या** | | **२०४०** | |

एका इमारतीचे डेमो दाखविण्यासाठीची साहीत्य, फिटींगसह मजुरीची रक्कम रुपये १९,६९५/- मान्यतेनंतर उर्वरीत साईआश्रम - १ च्या शिल्लक इमारती ११ व साईआश्रम - २ च्या ६ इमारती असे एकूण १७ इमारतीसाठी अनुक्रमे २०४० बोर्डसाठी पी.व्ही.सी फोम सीट ५ एम एम व्हीनाईल प्रिटींग- केमिकल बॉंडमध्ये आवश्यक त्या ठिकाणी फोर स्ट्रींग स्क्रुचा वापर करुन याकामासाठी अंदाजे रु. ३,३४,८१५/- असे एकत्रीत रु.३,५४,५१०/- इतका खर्च अपेक्षीत असून ही कामे त्वरीत करुन घ्यावयाची आहेत.

तरी डेमोसाठी झालेल्या खर्च रु. १९,६९५/- व १७ इमारतीसाठी येणारा अंदाजे खर्च रु. ३,३५,०००/- अपेक्षीत खर्चास तसेच सदर कामासाठी दरपत्रके मागविणेचे प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम- १ व २ हे प्रकल्प अद्याप सुरु न झाल्याने दिवसेंदिवस वाढणाऱ्या गर्दीचा विचार करता भक्तांचे निवासाची गैरसोय होत आहे. हे दोन्ही प्रकल्प सुरु झाल्यास सुमारे ११,७०० एवढया भक्तांची निवासव्यवस्था माफक दरात होणार आहे. त्यामुळे हे प्रकल्प तातडीने सुरु करणे आवश्यक आहे. साईआश्रम प्रकल्पांसाठी खर्च होणारी रक्कम जादा वाटत असली तरीसुध्दा खर्च होणारी ही रक्कम भक्तांकडून सेवाआकाराचे रुपाने वसुल होणार आहे. त्यामुळे त्याचा संस्थानवर आर्थिक बोजा पडणार नाही उलट भक्तांची निवासव्यवस्था करण्याचे संस्थानचे उद्दीष्ट पुर्ण होऊन याद्वारे गोरगरीब भक्तांची निवासासाठी होणारी गैरसोय थांबणार आहे. त्यामुळे या इमारती भक्तांच्या निवासासाठी त्वरीत सुरु करावयाच्या असल्याने प्रस्तावित केलेल्या कामासाठी जाहिरात प्रसिध्द करणे, दरपत्रके मागविणे यासाठी विलंब लागणार असल्याने, साईआश्रम- १ व २ च्या एकूण १७ इमारतींमध्ये खोल्यांबाबतचे भक्तांना मार्गदर्शन व्हावे यासाठी मार्गदर्शक/ दिशादर्शक बोर्ड बनवुन, बसविणेसाठी यापुर्वी या कामाचे संबंधीत डेमोचे काम केलेले मे.सोमवंशी एम.जी. राहाता यांचेकडून करुन घेण्यात यावे, याकामी येणाऱ्या रु.३,३५,०००/- मात्रचे खर्चास व डेमोसाठी झालेल्या रु.१९,६९५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.५०** **साईआश्रम भाग १ व २ च्या एकूण १७ इमारतीस बाहेरील बाजुस प्रवेशद्वाराजवळ एल.ई.डी. (न्युऑन इफेक्ट) ग्लोसेल बोर्ड बसविणेकामी येणारा खर्च व त्याकामी दरपत्रके मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम - १ च्या A इमारतीमधील रुमबाबतचे मार्गदर्शन भक्तांना व्हावे यासाठीचे मार्गदर्शक / दिशादर्शक बोर्ड तयार करुन दि. ०९/०८/२०१२ रोजी मा. कार्यकारी अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांना डेमो दाखविण्यात आला.

डेमोची पहाणीकरते वेळी असे निर्देश दिले की, भक्तांना प्रत्येक इमारतीमधील मजल्यानुसार रुम संख्येबाबतची माहितीचा एक बोर्ड व भक्तांना लांबुनच इमारतीचे नाव दिसावे यासाठी इमारतीच्या नावाचा LED ( निऑन इफेक्ट) ग्लोसाईन बोर्ड तयार करुन त्याचाही डेमो दाखविण्यात यावा. तसेच प्रत्यक्ष डेमोचे काम करतांना बोर्डवरील मजकुर साईज, रंग-संगती व जागा निश्‍चित होईल त्यानुसार पुढील इमारतीचे बोर्ड करणे सोयीचे होईल. अशा सुचना करण्यात आल्या.

उपरोक्त निर्देशानुसार मे. सोमवंशी एम.जी. राहाता यांचेकडुन A इमारतीमध्ये खालील तक्यात दर्शविलेप्रमाणे ॲल्युमिनियम कंपोझीट+ॲक्रायालीक सीट मध्ये, A इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ A इमारतीमधील मजल्यानुसार रुमबाबतची माहिती तसेच LED ( निऑन इफेक्ट ) ग्लोसाईन बोर्ड दोन साईड ACP बॉक्स + आतील बाजुस लोखंडी पाईप स्ट्रक्टचर ॲक्रॅलिक लेटरमध्ये A नावाचा बोर्ड तयार करुन त्याचाही डेमो दाखविण्यात आला.

खालील तक्यात दर्शविलेप्रमाणे एका इमारतीसाठी बोर्ड संख्या, बोर्ड लावण्याचे जागा, बोर्डसाठी वापरावयाचे मटेरिअल व मजकुर निश्‍चित करण्यात आले.

| अ.नं. | बोर्डचा मजकुर | साईज | संख्या | फिटींग व फिटींग मटेरियलबाबत तपशील | बोर्ड लावण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | A इमारत<br>(सर्व वातानुकूलीत खोल्या)<br>तळमजला १ ते ३२<br>पहीला मजला ३३ ते ६४<br>दुसरा मजला ६५ ते ९६<br>तिसरा मजला ९७ ते १२८<br>A Building<br>(All A.C. Rooms)<br>Ground Floor १ to ३२<br>१st Floor ३३ to ६४<br>२nd Floor ६५ to ९६<br>३rd Floor ९७ to १२८ | ३ 'x २' | १ | ॲल्युमिनियम कंपोझीट<br>+<br>ॲक्रायालीक सीट मध्ये | प्रत्येक इमारती प्रवेशद्वाराजवळ |
| २ | <br>प्रत्येक इमारती प्रवेशद्वाराजवळ | २.५'x२.५' | १ | LED ( निऑन इफेक्ट) ग्लोसाईन बोर्ड<br>दोन साईड<br>ACP बॉक्स<br>+<br>आतील बाजुस लोखंडी पाईप स्ट्रक्टचर<br>ॲक्रॅलिक लेटर व बोर्ड फिटींग खर्चासह | इमारतीचे बाहेरील बाजुस फिटींगमध्ये |
| | **एकूण बोर्ड संख्या** | | **२** | | |

तथापी A इमारतीचे डेमो दाखविलेल्या बोर्डचे साहीत्य, फिटींगसह मजुरीची रक्कम रुपये १५,४००/- मान्यतेनंतर उर्वरीत साईआश्रम - १ च्या शिल्लक इमारती ११ व साईआश्रम - २ च्या ६ इमारती असे एकूण १७ इमारती अनुक्रमे ३४ बोर्डसाठी अंदाजे रु. २,६१,८००/- खर्च येईल, असे एकत्रीत रु. २,७७,२००/- इतका खर्च अपेक्षीत असून ही कामे त्वरीत करुन घ्यावयाची आहे.

तरी डेमोसाठी झालेला खर्च रु. १५,४००/- व १७ इमारतीसाठी येणारा अंदाजे खर्च रु. २,६१,८००/- अपेक्षीत खर्चास तसेच सदर कामासाठी दरपत्रके मागविणेचे प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम- १ व २ या इमारती साईभक्तांच्या सोयीसाठी त्वरीत सुरु करावयाच्या असल्याने सदर कामासाठी जाहिरात प्रसिध्द करणे, दरपत्रके मागविणे यासाठी वेळ लागणार असल्याने साईआश्रम भाग १ व २ च्या एकूण १७ इमारतीस बाहेरील बाजुस प्रवेशद्वाराजवळ एल.ई.डी. (न्युऑन इफेक्ट) ग्लोसेल बोर्ड बसविणेसाठी यापुर्वी संदर्भीय कामाच्या डेमोचे काम केलेले मे.सोमवंशी एम.जी. राहाता यांचेकडून करुन घेण्यात यावे,**

**याकामी येणाऱ्या खर्च रु.२,६१,८००/- मात्रचे खर्चास तसेच डेमोसाठी झालेल्या रु. १५,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.५१ लॉण्ड्री कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री शिरडी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे देणगी मधुन संस्थानने साईभक्तांचे निवासासाठी सुमारे १२००० भक्तनिवास क्षमता असलेल्या साईआश्रम भाग १ व २ या इमारतींचे बांधकाम केलेले आहे. सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण झालेले असुन या इमारती निवासासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. साईआश्रम भाग १ या इमारतीमध्ये एकूण १५३६ खोल्या असुन साईआश्रम भाग २ या इमारतीमध्ये १९२ हॉल आहेत.

सदर इमारती भक्तांचे निवासासाठी उपलब्ध करुन दिल्यानंतर या दोनही इमारतीमधील दैनंदिन वापराचे कपडे उदा. सतरंज्या , चादरी , बेडशीट , उशा खोळी , टॉवेल्स इत्यादी. धुण्यासाठी आवश्यकत्या क्षमतेची लॉन्ड्री असणे आवश्यक आहे.

भक्तांचे निवासासाठी सध्या श्री साईप्रसाद निवासस्थान, श्री साईबाबा भक्तनिवास ( ५०० रुम) तसेच द्वारावती भक्तनिवास हे विभाग कार्यरत आहेत. तसेच श्री साईभक्तांचे औषधोपचारासाठी साईबाबा ( सुपर स्पेशॉलिटी ) हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल कार्यरत आहेत . सर्व विभागांकडील दैनंदीन वापराचे कपडे धुण्यासाठी सध्या श्री साईबाबा भक्तानिवासस्थान ( ५०० रुम ) व श्री साईनाथ हॉस्पीटल शिर्डी येथे संस्थान कर्मचारी नेमून लॉन्ड्री चालविण्यात येत आहे.

आता, नव्याने साईआश्रम भाग १ व २ या इमारती भक्तांच्या निवासासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्याने संस्थानची सर्व भक्तनिवासस्थाने, हॉस्पीटलस् व इतर विभागाकडील दैनंदीन वापराचे कपडे धुण्यासाठी एकाच ठिकाणी आवश्यक त्या क्षमतेच्या अद्ययावत लॉन्ड्रीची उभारणी करणे आवश्यक आहे.

उभारणी करावयाच्या लॉन्ड्रीसाठी किती जागा असावी, लॉन्ड्रीसाठी किती आणि कोणती मशीनरी खरेदी करावी लागणार आहे. लॉन्ड्रीसाठी किती कर्मचारी आवश्यक आहेत इ. सर्व अनुषंगीक बाबीचे मार्गदर्शन मिळण्यासाठी कन्सलंटटची नेमणुक करणे आवश्यक आहे.

सदर कन्सलंटट नेमणुकीसाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन या व्यवसायात किमान २० वर्ष अनुभव असलेल्या इच्छुक व्यक्तींकडून त्यांच्या मानधन आपेक्षेसह कोटेशन वजा अर्ज मागणी करता येईल. त्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.५२ साईआश्रम भाग १ व २ या विभागातील हाऊस किपींग कामासाठी अंतीम निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२९/०७/२०१२ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

प्रत्येक निविदाधारकांना OFFICE OF THE COMPTROLLER AND AUDITOR GENERAL OF INDIA - NEW DELHI, Tender No.418 / GS / 5- 2011 Dated 06 September, 2011 या कॅग रिपोर्टप्रमाणे सादर केलेल्या कागदपत्रासाठी ( टेक्निकल बीडवर ) ७० % मार्कस् व चर्चा वाटाघाटीमध्ये दिलेल्या दरावर ( प्राइस बीडवर ) ३० % मार्कस् देण्यात येऊन, Successful Bidder (SB- १,२---) बाबतचे अंतीम तक्ते तयार करुन मिटींगमध्ये सादर करणेत यावेत.

उपरोक्त निर्णयानुसार साईआश्रम १ व २ साठीचे Successful Bidder (SB- १,२---) संबंधीत अंतिम तक्ते तयार करुन ते यासोबत सादर केलेले आहेत.

तरी उपरोक्त तक्त्यांचे अवलोकन होऊन, साईआश्रम १ व २ येथील हाऊसकिपींग कामाचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक- २९/०७/२०१२ रोजी झालेल्या सभेतील निर्णयानुसार, Office of The comptroller And Auditor General of India New Delhi, Tender No ४१८ / Gs/५-२०११ Dated Septmber, २०११ या कॅग रिपोर्ट नुसार सादर केलेले अंतीम तक्त्याचे अवलोकन केले असता Successful Bidder ( SB -1 ) साठी मे. बी.व्ही. जी. इंडिया लि., पुणे हे साईआश्रम १ व २ या विभागाच्या हाऊसकिंपींग कामासाठी पात्र ठरत आहेत.**

**तथापी मे. बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांनी देऊ केलेलें मनुष्यबळ व यंत्रसामुग्री संख्या संस्थानचे गरजेपेक्षा जास्त आहे. त्यामुळे संस्थानला आवश्यक असलेले तेवढेच मनुष्यबळ व यंत्रसामुग्री तसेच स्वच्छता साहित्य पुरवून त्याबदल्यात दरमहाचे त्यांचे मागणी रक्कमेत ते किती रक्कम कमी करणार आहेत. याबाबत चर्चा करण्यासाठी त्याना पुढील सभेपुढे आमंत्रीत करुन, अंतीम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम १ व २)

---

**विषय नं.५३ श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने एकावेळी राष्ट्रीय स्थरावरील दोन सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार (Best Institute Award) जिंकलेबाबत, पुरस्कार जिंकल्याची हॅट्रीक केलेबाबत.**

**प्रस्ताव-** भारत सरकार, श्रम व रोजगार मंत्रालय (DGE&T) नवी दिल्ली यांनी जानेवारी २०१२ मध्ये घेतलेल्या '४८ व्या अखिल भारतीय शिल्पकारागीर कौशल्य स्पर्धा परीक्षेचा' निकाल त्यांनी कळविला असुन यामध्ये आपल्या संस्थेचे तीन प्रशिक्षणार्थी पात्र ठरले आहेत. यापैकी दोन प्रशिक्षणार्थ्यांनी देशात सर्वप्रथम क्रमांकासह स्पर्धेचे विजेते पद जिंकले. प्रत्येकी रुपये ५००००/- चे पारितोषिक जिंकले आहे. या बरोबरचं संस्थेने राष्ट्रीय स्तरावरील दोन "सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार (Best Institute Award)" एकाच वेळी जिंकुन इतिहास रचला आहे.! तसेच असे पुरस्कार सलग जिकण्याची हॅट्रीक ही साधली !!

केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाअंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग (DGE&T) हा विभाग कार्यरत आहे. या विभागाअंतर्गत क्राफ्टसमन ट्रेनिंग प्रोग्राम अंतर्गत देशभर सुमारे १० हजार औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ केंद्र कार्यरत आहेत. आपली श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थाही या कार्यक्रमाअंतर्गत चालते. ११५ पेक्षा अधिक अभ्यासक्रम (ट्रेड) असलेल्या या योजनेत १५ ट्रेडची हे अखिल भारतीय कौशल्य स्पर्धा परीक्षा घेतली जाते. ही स्पर्धा लागू असलेले फक्त सात व्यवसाय (ट्रेड) आपल्या संस्थेत कार्यरत आहेत. प्रत्येक राज्यातील एकुण औ.प्र.संस्था/केंद्र यामधुन फक्त राज्यात सर्वप्रथम येणारा प्रशिक्षणार्थी अखिल भारतीय कौशल्य स्पर्धा परीक्षेला बसण्यास पात्र ठरतो.

अखिल भारतीय कौशल्य स्पर्धा परीक्षेत देशात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यास केंद्र शासनाकडून अशा प्रशिक्षणार्थ्यास रुपये ५००००/- रोख पारितोषिक व 'बेस्ट क्राफ्टसमन ऑफ इंडिया' असे सन्मान प्रमाणपत्र मिळते. आपल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील मेकॅनिक रेफ्रीजरेशन ॲण्ड एअर कडीशनींग, टर्नर व इलेक्ट्रीशियन या तीन ट्रेड मधील प्रशिक्षणार्थी महाराष्ट्र राज्यातुन त्या - त्या ट्रेडमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन जानेवारी २०१२ मध्ये कोलकाता व लुधियाना (पंजाब) येथे झालेल्या ४८ व्या अखिल भारतीय कौशल्य स्पर्धा परीक्षेत सहभागी झाले त्याचा निकाल खालीलप्रमाणे प्राप्त झाला आहे.

| अ. न | प्रशिक्षणार्थ्यांचे नांव | व्यवसाय (Trade) | परीक्षेचे ठिकाण | निकाल | जिंकलेले पारितोषिक | संस्थेने जिंकलेले पुरस्कार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धनवटे सुनिल लुईस | टर्नर | A.T.I लुधियाना | विजेता (देशात सर्वप्रथम) | ५०,०००/- | सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार |
| २ | रोकडे अश्विनकुमार रमेश | मेकॅ.रेफ्री. ॲण्ड एसी. | A.T.I हावडा, कोलकाता | विजेता (देशात सर्वप्रथम) | ५०,०००/- | सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार |
| ३ | पेटारे योगेश माधव | इलेक्ट्रीशियन | A.T.I लुधियाना | पात्र | --- | --- |

मा.व्यवस्थापन समिती व संस्थान प्रशासन यांचा पाठींबा व प्रोत्साहन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कौशल्य स्पर्धा पुर्वतयारी समितीव्दारा स्पर्धकांची योग्य तयारी, संबधित व्यवसाय व विषय निदेशकांचे मार्गदर्शन, प्रशिक्षणार्थ्यांनी घेतलेले परीश्रम व प्रशिक्षणार्थ्यांच्या पालकांकडून सकारात्मक सहकार्य तसेच श्री साईबाबांचे आशिर्वाद यातून हे सर्वोच यश आपल्या संस्थेला प्राप्त झाले आहे, असे प्राचार्य, औ.प्र.संस्था यांनी कळविले आहे.

सदरची माहिती मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर

**निर्णय क्र.७०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, आय.टी.आय.)

---

**विषय नं. ५४ पुस्तक पेढी योजनेसाठी शैक्षणिक पाठ्य पुस्तके खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या महाविद्यालयातील विद्यार्थ्याकरीता महाविद्यालय पुस्तक पेढी योजने अंतर्गत गरीब,होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तक संच वर्षभराकरता उपलब्ध करुन देण्यात येतात, सदर योजनेनुसार चालु शैक्षणिक वर्ष २०१२-१३ अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी सुरु करण्यासाठी खालीलप्रमाणे पुस्तके खरेदी करणे आवश्यक आहे.

सन २०१२-१३ या मध्ये इयत्ता अकरावी कला व वाणिज्य आणि २०११-१२ मध्ये विज्ञान शाखेचा अभ्यासक्रम बदलला असल्याकारणाने सदर संचाची सर्व पुस्तके नवीन खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच इयत्ता बारावी विज्ञानसाठी या वर्षी ही योजना सुरु करता येईल या शाखेचीही सर्व पुस्तके नवीन खरेदी करणे गरजेचे आहे.

**१) इयता अकरावी करीता पाठयपुस्तकांची यादी पुढीलप्रमाणे -**

| अ.नं. | विषय | एकूण विद्यार्थी | प्रती | किंमत | एकूण किमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्थशास्त्र | ३२० | १०० | ५२ . ०० | ५२००. ०० |
| २ | राज्यशास्त्र | १६० | ५० | ४३ . ०० | २१५०. ०० |
| ३ | इतिहास | १६० | ५० | ६२ . ०० | ३१००. ०० |
| ४ | भूगोल | १६० | ५० | ५४ . ०० | २८००. ०० |
| ५ | शास्वत विकास आणि पर्यावरण | ४८० | १५० | ६२ . ०० | ९३००. ०० |
| ६ | चिटणीसाची कार्यपध्दती | १६० | ५० | ६७ . ०० | ३३५०. ०० |
| ७ | वाणिज्य संघटन व व्यवस्थापन | १६० | ५० | ६९ . ०० | २९५०. ०० |
| ८ | बुक किपीग आणि अकाऊंट | १६० | ५० | १२८ . ०० | ६४००. ०० |
| ९ | मॅथेमॅटीक्स आणि स्टॅटीसटीक्स पेपर १ | १६० | ५० | ६७ . ०० | ३३५०. ०० |
| १० | मॅथेमॅटीक्स आणि स्टॅटीसटीक्स पेपर २ | १६० | ५० | ७५ . ०० | ३७५०. ०० |
| ११ | फिजिक्स | १६० | ५० | ६६ . ०० | ३३००. ०० |
| १२ | बायोलॉजी | १६० | ५० | ७३ . ०० | ३६५०. ०० |
| १३ | केमेस्ट्री | १६० | ५० | १०५ . ०० | ५२५०. ०० |
| १४ | माहिती तंत्रज्ञान | १६० | ५० | ८४ . ०० | ४२००. ०० |
| | | | **८५०** | | **५८७५०. ००** |

**२) इयता बारावीकरीता पाठयपुस्तकांची यादी पुढीलप्रमाणे -**

| अ.नं. | विषय | एकूण विद्यार्थी | प्रती | किंमत | एकूण किमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | मॅथेमॅटीक्स आणि साईनटिस पेपर १ | १६० | ५० | १०५. ०० | ५२५० . ०० |
| २ | मॅथेमॅटीक्स आणि साईनटिस पेपर २ | १६० | ५० | ११८. ०० | ५९०० . ०० |
| ३ | फिजिक्स | १६० | ५० | ११६ . ०० | ५८०० . ०० |
| ४ | बायोलॉजी | १६० | ५० | १०४ . ०० | ५२०० . ०० |
| ५ | केमेस्ट्री -१ | १६० | ५० | ११८ . ०० | ५९०० . ०० |
| ६ | केमेस्ट्री -२ | १६० | ५० | ८८ . ०० | ४४०० . ०० |
| | | | **३००** | | **३२४५० . ००** |

इयत्ता ११ वी रुपये - ५८७५०/- + इयत्ता १२ वी रुपये - ३२४५०/- एकूण रुपये ९१२००/- ( अक्षरी रुपये एक्याण्णव हजार दोनशे मात्र)

वरील १ व २ प्रमाणे इयत्ता ११वी व इयता १२ वी ची पाठयपुस्तक खरेदीसाठी रुपये - ९१२००/- पर्यंतचा खर्च अपेक्षीत आहे. सदरच्या खर्चास आणि प्रचलित कोटेशन मागवून पाठयपुस्तके खरेदीस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरिता पुस्तक पेढी योजनेसाठी शैक्षणिक पाठ्य पुस्तके विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९१,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.५५** **श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग (वय ५६ वर्ष, झालेली सेवा २३ वर्ष) यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग हे दि.०६-०३-१९८९ पासून संस्थान सेवेत वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून कामास आहे. श्री.पेटारे हे आरोग्य विभागात सफाई कामगार म्हणून कार्यरत असतांना त्यांचेकडून दि.२७-०६-२०१० ते दि.१८-०१-२०११ या कालावधीत खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन घडलेले आहे.

श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग हे दि.२७-०६-२०१० ते दि.२८-०६-२०१०, दि.३०-०६-२०१०, दि.०२-०७-२०१० ते दि.०४-०७-२०१०, दि.१२-०७-२०१०, दि.१४-०७-२०१० ते दि.१५-०७-२०१०, दि.२७-०७-२०१० ते दि.२८-०७-२०१०, दि.०८-०८-२०१०, दि.११-०८-२०१०, दि.१७-०८-२०१०, दि.२३-०८-२०१० ते दि.२४-०८-२०१०, दि.२७-०८-२०१०, दि.३०-०८-२०१०, दि.०५-०९-२०१०, दि.०८-०९-२०१०, दि.२४-११-२०१०, दि.२९-११-२०१०, दि.०१-१२-२०१० ते दि.०२-१२-२०१०, दि.०९-१२-२०१० ते दि.१०-१२-२०१०, दि.१५-१२-२०१०, दि.१९-१२-२०१०, दि.२२-१२-२०१०, दि.२६-१२-२०१०, दि.२९-१२-२०१०, दि.३१-१२-२०१०, दि.०९-०१-२०११, दि.११-०१-२०११ व दि.१८-०१-२०११ या कालावधीत **एकूण-३५ दिवस** पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली. श्री.पेटारे यांना विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. श्री.पेटारे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

म्हणून उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.पेटारे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४१३५/ २०१० दि.३१-०७-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४०२४/२०१० दि.२४-०७-२०१०, जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/ ४२८७/२०१० दि.११-०८-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४५०८/ २०१० दि.२८-०८-२०१०, जा.नं. एसएसएस/वशी-७ए/४६२३/२०१० दि.०३-०९-२०१०, जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/४७८९/२०१० दि.१५-०९-२०१०, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६५१२/२०१० दि.३०-१२-२०१० व जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६९४३/२०११ दि.२७-०१-२०११ अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढून, त्यांचे लेखी खुलासे मागविणेत आले होते. तथापि, श्री.पेटारे यांना सदर कारणे दाखवा नोटीसा अनुक्रमे दि.०२-०८-२०१०, दि.२६-०७-२०१०, दि.१३-०८-२०१०, दि.३०-०८-२०१०, दि.०१-०९-२०१०, दि.१७-०९-२०१० व दि.०४-०१-२०११ रोजी प्राप्त होऊन देखील त्यांनी लेखी खुलासे सादर केलेले नाहीत. यावरून सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य असल्याचे दिसून येते.

म्हणून श्री.पेटारे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/७१७५/२०११ दि.१४-०२-२०११ अन्वये आरोपपत्र देवून, त्यांचेवर दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे कलम नंबर २४ (एफ) प्रमाणे नेहमी नेहमी रजेशिवाय गैरहजर राहणे किंवा रजेशिवाय सलग १० पेक्षा जास्त दिवस गैरहजर राहणे, कलम नंबर २४ (एल) प्रमाणे आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्य करणे याप्रमाणे आरोप ठेवणेत आले होते.

श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरूध्द दि.१४-०२-२०११ रोजी ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, खातेचौकशी अधिकारी यांनी पूर्ण करून, त्यांचा दि.३१-०३-२०१२ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे.

**आदेश-**

श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचेवरील आरोप शाबीत झाल्याने ते दोषी आहेत. श्री.पेटारे यांनी दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे कलम नंबर २४ (एफ) व २४ (एल) नुसार गैरशिस्तवर्तन केले आहे.

श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत एकूण-२९ वेळा शिक्षा झालेली असून, त्याचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते. म्हणून श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खाते चौकशीत दोषी आढळुन आलेले असल्याने, त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत दि.बॉम्बे इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रूल्स १९५९ चे कलम २५(१) मध्ये नमुद केलेल्या **अ)** ताकीद द्यावी किंवा ठपका द्यावा, **ब)** पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ हयाच्या तरतुदींच्या मर्यादेत राहुन आणि त्यानुसार दंड करावा (एकुण वेतनाचे ३% इतका दंड), **क)** चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्याला व्यवस्थापकाच्या सहीच्या लेखी आदेशाने सस्पेंड करावे व **ड)** नोटीशी शिवाय बडतर्फ (डिसमीस) करावे. या चार शिक्षेपैकी "ड" प्रमाने संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेस मान्यता असावी असा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.२८-०४-२०१२ रोजीचे सभेमध्ये निर्णयासाठी सादर करणेत आला होता.

यावर सविस्तर चर्चा होवून, श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे विरूध्द ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खाते चौकशीत दोषी आढळून आलेले असल्याने त्यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत नियमाप्रमाणे प्रथम त्यांचे विरूध्द ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोपांचे गांभीर्य विचारात घेता, त्यांना संस्थानचे सेवेतून बडतर्फ (डिसमिस) का करणेत येऊ नये? अशी सेकंड शोकॉज नोटीस देणेत यावी. त्यानंतर श्री.पेटारे यांनी सदर नोटीशीस मुदतीत लेखी खुलासा सादर न केल्यास अथवा श्री.पेटारे यांनी दिलेला लेखी खुलासा असमाधानकारक आढळून आल्यास श्री.पेटारे यांना उपरोक्त **"ड"** प्रमाणे संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेत यावे. असा निर्णय मा.त्रिसदस्य समितीचे दि.२८-०४-२०१२ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.३८५ अन्वये पारीत झालेला आहे.

त्यास अनुसरून श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे यांना त्यांचे विरूध्द ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, सदर आरोपांचे गांभीर्य पाहता त्यांना संस्थानचे सेवेतून बडतर्फ (डिसमिस) का करणेत येऊ नये? याबाबतचा लेखी खुलासा दोन दिवसांचे आंत व्यवस्थापनाकडे सादर करावा अशी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१४६१/२०१२ दि.०५-०७-२०१२ अन्वये सेकंड शोकॉज नोटीस देणेत आलेली आहे. त्यास अनुसरून श्री.पेटारे यांनी त्यांचा दि.०६-०७-२०१२ रोजीचा लेखी खुलासा सादर केला असून, त्यात त्यांनी "मी दि.२७-०६-२०१० ते दि.१८-०१-२०११ या काळात वेळोवेळी ३५ दिवस विनापरवानगी व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीलो हे मला मान्य आहे. सदर झालेली चुक मी मान्य केली आहे. कृपा करून मला संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमिस) करून

नये. कमीत कमी शिक्षा करावी, पुन्हा अशी चुक माझेकडून होणार नाही.माझे संस्थान सेवेच्या कालावधीत आत्तापर्यंत अशी चुक झालेली नाही. तसेच माझे संस्थान सेवेतून निवृत्ती होणेस दोन वर्ष राहीलेले आहे. तरी माझेवर कृपा करावी ही विनंती."असे म्हटलेले आहे.

सबब, श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांनी अंतिम कारणे दाखवा नोटीसीस अनुसरून दि.०६-०७-२०१२ रोजी दिलेल्या लेखी खुलाशाचा मानवतेच्या दृष्टीकोणातून सहानुभूतीपुर्वक विचार करून, त्यांना संस्थान सेवेत व वर्तनात सुधारणा करणेची अंतिम संधी देणेचे दृष्टीने श्री.पेटारे यांना उपरोक्त नमुद केलेल्या चार शिक्षेपैकी **"ड"**नोटीशीशिवाय बडतर्फ (डिसमिस) करावे या शिक्षेऐवजी **"क"** प्रमाणे संस्थान सेवेतून चार दिवस सेवा निलंबीत (सस्पेंड) करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.लक्ष्मण यशवंत पेटारे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना संस्थान सेवेत व वर्तनात सुधारणा करणेची अंतिम संधी देणेचे दृष्टीने संस्थान सेवेतून नोटीशीशिवाय कायमस्वरुपी बडतर्फ (डिसमिस) करणे या शिक्षेऐवजी संस्थान सेवेतून चार दिवस सेवा निलंबीत (सस्पेंड) करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.५६** **साईआश्रम भाग १ व २ करिता सुरक्षा एजन्सीमार्फत कंत्राटी सुरक्षा कर्मचारी कामास घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे सरंक्षण विभागास मंदिर, मंदिर परिसर, महाद्वार, साई प्रसादनिवासस्थान, श्री साई प्रसादालय, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुल, वाहन विभाग, श्री साईबाबा हॉस्पिटल, द्वारावती निवासस्थान, धर्मशाळा, श्री साईनाथ रुग्णालय व इतर परिसराचे सुरक्षेकामी मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) लि., पुणे, मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमण (यु.टी.), मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी प्रा.लि., मुंबई, मे.रक्षक सिक्युरिटी ॲण्ड सिस्टिम्स प्रा.लि.,पुणे व मे.जी.के. सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई या पाच सुरक्षा एजन्सीमार्फत दि.०१-०५-२०११ पासून ते दि.३०-०४-२०१३ या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने अनुक्रमे सुरक्षा अधिकारी -०५,सुरक्षा सुपरवायझर-१५, गणमॅन-३० व सुरक्षा गार्ड-५०५ असे एकुण- ५५५ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

सुरक्षा एजन्सीमार्फत संस्थानला कंत्राटी पध्दतीने पुरविणेत येणाऱ्या अनुक्रमे १) सुरक्षा सुपरवायझर (माजी सैनिक) रूपये-२८९.३३/- प्रतिदिनी, २) सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक/ सिव्हीलियन) रूपये-२७१.००/-प्रतिदिनी व ३) सुरक्षा रक्षक (सिव्हीलियन/स्त्री, पुरूष)-रूपये-२०७.८६/- प्रतिदिनी याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०३-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२११ नुसार वेतनदर/किमान वेतनदर, अधिक प्रॉव्हीडंड फंड प्रशासकीय चार्जेससह (मालकाचा हिस्सा) १३.६१%, अधिक सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या वेतनदराच्या रक्कमेवर ०.५०% इतका सर्व्हिस चार्ज, अधिक ८.३३% सानुग्रह अनुदान, अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर १२.३६% इतका सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे रक्कम सध्या संबंधीत सुरक्षा एजन्सीला संस्थानकडून देणेत येते.

श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांचे संख्येत दिवसे दिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे.शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांचे निवासाचे सुविधेसाठी संस्थानने नव्याने साई आश्रम भाग -०१ मध्ये एकुण १५३६ खोल्यांचे तसेच साई आश्रम भाग- ०२ मध्ये १९२ हॉलचे बांधकाम पुर्ण केले आहेत. सदर साई आश्रम भाग -०१ व साई आश्रम भाग -०२ या इमारतीमध्ये अंदाजे १५,००० साईभक्तांची राहण्याची व्यवस्था होवू शकते. साई आश्रम भाग -०१ व साई आश्रम भाग -०२ इमारतीचे बांधकाम पुर्ण झालेले असून या इमारतीमध्ये पुढील महिन्यापासून भक्तांचे निवासव्यवस्था सुरु करण्याचे नियोजन आहे.

त्यानुसार नविन श्री साईबाबा भक्तनिवासस्थान शेजारी साई आश्रम भाग-०१ चे इमारत व परिसरासाठी तेथील भक्तांचे सुरक्षितेसाठी खालील प्रमाणे कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

१) सुरक्षा सुपरवायझर (माजी सैनिक) - ०३
२) सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक/सिव्हीलीयन)- ०६
३) सुरक्षा रक्षक (पुरुष/सिव्हीलीयन) - १४०
४) सुरक्षा रक्षक (स्त्री/सीव्हीलीयन)- २७

**अ) एकुण सुरक्षा कर्मचारी- १७६**

तसेच निमगांव कोऱ्हाळे येथील साई आश्रम भाग -०२ चे इमारत व परिसरासाठी तसेच तेथील भक्तांचे सुरक्षिततेसाठी खालीलप्रमाणे कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

१) सुरक्षा सुपरवायझर (माजी सैनिक) - ०३
२) सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक/सिव्हीलीयन)- ०६
३) सुरक्षा रक्षक (पुरुष/सिव्हीलीयन) - ११४
४) सुरक्षा रक्षक (स्त्री/सीव्हीलीयन)- ०६

**ब) एकुण सुरक्षा कर्मचारी- १२९-**

अशाप्रकारे साई आश्रम भाग-०१ व साई आश्रम भाग -०२ इमारत व परिसर तसेच साईभक्तांचे सुरक्षिततेसाठी एकुण-३०५ कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५५४/२०११ दि.२७-०४-२०११ रोजीचे पत्र तसेच जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११४९/ २०११ दि.०१-०६-२०११ रोजीचे वर्क ऑर्डर नुसार मे.रक्षक सिक्युरिटी ॲन्ड सिस्टीम्स प्रा.लि.,पुणे यांचेमार्फत साई आश्रम व इतर परिसर सुरक्षेकामी संस्थानचे संरक्षण विभागास आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेत यावे असे मे.रक्षक सिक्युरिटी ॲन्ड सिस्टीम्स प्रा.लि., पुणे यांना लेखी कळविणेत आलेले आहे. साई आश्रम भाग १ चे इमारत, परिसर व भक्तांचे सुरक्षिततेकरीता **अ** मध्ये नमुद केलेप्रमाणे एकुण १७६ सुरक्षा कर्मचारी, तसेच साई आश्रम भाग-०२ चे इमारत, परिसर व भक्तांचे सुरक्षिततेकरीता वर **ब** मध्ये नमुद केलेप्रमाणे-१२९ सुरक्षा कर्मचारी असे एकुण-३०५ सुरक्षा कर्मचारी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११४९/२०११ दि.०१-०६-२०११ रोजीचे वर्क ऑर्डर तसेच दि.०२-०८-२०११ रोजीचे करारनाम्यातील अटी/शर्तीस व दरपत्रकास अनुसरून कंत्राटी पध्दतीने कामावर घेता येईल.

उपरोक्तप्रमाणे साई आश्रम भाग-०१ व साई आश्रम भाग-०२ इमारत, परिसर व साई भक्तांचे सुरक्षिततेकामी मे.रक्षक सिक्युरिटी ॲन्ड सिस्टीम्स प्रा.लि.,पुणे या सुरक्षा एजन्सीमार्फत कंत्राटी पध्दतीने एकुण ३०५ सुरक्षा कर्मचारी कामावर घ्यावयाचे झाल्यास प्रतिदिनी रु.८८,९८७/-, प्रतिमहिना रु.२३,१३,६६२/- व प्रती वर्ष रु.२,७७,६३,९४४/- इतका अंदाजे वेतन दर, प्रॉ.फंड, सर्व्हिस चार्जेस, सानुग्रह अनुदान व सर्व्हिस टॅक्स असे सर्व मिळुन एकत्रित खर्च येईल.

तरी साई आश्रम भाग -०१ व साई आश्रम भाग -०२ इमारतीमध्ये भक्तांची निवासव्यवस्था सुरु करावयाची असल्याने वर अ व ब मध्ये नमुद केलेप्रमाणे मे.रक्षक सिक्युरिटी ॲन्ड सिस्टीम्स प्रा.लि.,पुणे या सुरक्षा एजन्सीमार्फत कंत्राटी पध्दतीने एकुण ३०५ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी दि.०१-०६-२०११ रोजीचे वर्क ऑर्डर व दि.०२-०८-२०११ रोजीचे करारनाम्यातील अटी/शर्तीस व दरपत्रकास अनुसरून कामावर घेणेस व त्याकामी उपरोक्तप्रमाणे येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.७११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.५७** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., शिर्डी यांना व इतर सहकारी संस्थान व खाजगी व्यावसायीक यांना चालविण्यात देण्यात आलेल्या भक्तनिवास इमारतीतील गाळयांचे बाबत.**

**प्रस्ताव-** भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे आतील व बाहेरील बाजुस मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने खालील गाळे चालविण्यास दिलेले आहे.

| अ.क | व्यवसायाचे नांव | मासिक परवाना फी | कालावधी | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रसाद नॉव्हेल्टी<br>अ) नॉव्हेल्टी स्टोअर नं.-१<br>ब) नॉव्हेल्टी स्टोअर नं.- २,<br>क) प्रसाद स्टोअर नं.-१, | <br>रु.५,१००/-<br>रु.५,१००/-<br>रु.५,१००/- | मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०/०२/२०१० दि.०१/०६/२००९ ते दि. ३१/०५/२०१० **सदर गाळयांचा लिलाव करणेबाबत दि. ०६/०४/२०१२ चे सभेत ठराव झाला आहे.** | <br>०१) भक्तनिवास डी ब्लॉक नं. ३<br>०२) भक्तनिवास डी ब्लॉक नं. २<br>०३) भक्तनिवास डी ब्लॉक नं. ४ |
| ०२ | दुध स्टॉल<br>अ) दुध स्टॉल नं.०४ | <br>रु. ५,१००/- | | ०१) न.भ.निवास कॅन्टीन शेजारील गाळा नं. ५ |
| ०३ | क्लोकरुम<br>अ) न.भक्तनिवास क्लोकरुम (लिलावाचे वेळी खाली करुन द्यावयाचा गाळा )<br>ब) सुलभ क्लोकरुम,<br>क) साईप्रसाद क्लोकरुम | <br>तिन्ही ठिकाणचे क्लोकरुमचे एकत्रीत भाडे रु.५,१४८/- | | क्लोकरुम<br>१) न.भक्तनिवास मेन गेट जवळील<br>२) सुलभ शौचालय इमारतीतील<br>३) जुने चौकशी कार्यालय शेजारील |
| ०४ | श्री विजय रामचंद्र ग्वालानी, राहणार - शिर्डी | ६,६५५/- | दि.०१/०१/२०१२ ते दि. ३०/११/२०१२ | अे-विंग, गाळा नं.०६ बाहेरील |
| ०५ | सौ.रत्ना नंदु कोळपकर, राहणार शिर्डी. | ५४,५७१/- | | अे- विंग आतिल गाळा नं. ०१ |
| ०६ | श्रीरामपुर दुध संघ बाभळेश्वर, बाभळेश्वर ता.राहाता, जि.अ.नगर | ६२,५५७/- | | डी- विंग आतिल गाळा नं.०५ |
| ०७ | श्री अशोक सुर्यभान पवार, राहणार- शिर्डी, ता.राहाता, | ५५,९०२/- | | डी- विंग आतिल गाळा नं.०७ |
| ०८ | प्रवरा फळे फुले भाजीपाला उत्पादक, लोणी, तालुका-राहाता | २९,२८२/- | | डी- विंग आतिल गाळा नं.०८ |
| ०९ | कर्मचारी संघटना राजेंद्र जगताप, शिर्डी ता.राहाता, जि.अ.नगर | २९,२८२/- | | डी- विंग बाहेरील गाळा नं.११ |
| १० | श्री साई संस्थान एम्प्लॉईज | १६,६३८/- | | डी- विंग बाहेरील गाळा नं.१२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | को.ऑप. सो. ता.राहाता, जि.अ.नगर | | | |
| ११ | श्री किरणकुमार आर. येमुलपल्ली, रा. शिर्डी, ता.राहाता, जि.अ.नगर | ६,७८८/- | | डी- विंग बाहेरील गाळा नं. १३ |

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२०१० चे सभेतील निर्णय क्र. ९१ अन्वये तक्त्यातील अ.क्र.नं. १ ते ३ चे गाळे व मा.व्यवस्थापन समितीचे दि. १४/०१/२०१२ चे सभेतील निर्णय क्र. १६७ अन्वये तक्त्यातील अ.क्र.नं. ४ ते ११ हे गाळे चालविण्यास देणेबाबत निर्णय झाला.

२) अ.क्र.नं. १ ते ३ च्या स्टॉलची / गाळयांची मुदत दि. ३१/०५/२०१० रोजी संपुष्टात आली आहे. सोसायटीने दि. ०६/०५/२०१० च्या पत्राने पुढील ५ वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस विनंती केली होती. त्यास अनुसरुन दि. ०४/०७/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विषय नं. ७३ ठेवण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ५९४ नुसार पुढील प्रमाणे निर्णय झालेला आहे. "... भक्तनिवास इमारतीचे बाहेरील दक्षिण बाजूचे ०५ गाळयांचा संस्थानचे कामासाठी वापर करावा, तसेच इमारतीचे आतील बाजूचे सध्या श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सोसायटीच्या ताब्यात असलेल्या ०५ गाळयांचा ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर वापरास देणेसाठी जाहिर लिलाव करावा. त्याचबरोबर सदरची कार्यवाही होईपर्यंत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सोसायटीकडून ०५ गाळयांची मुदत संपलेल्या तारखेपासून मागील मान्य दराने परवाना फी वसूल करण्यात यावी, असे ठरले आहे.. "

३) प्रस्तुतचे ठरावास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो. लि. शिरडी यांना जा.क्र. एसएसएस / विधी /९७२७/२०१० दि. ०५/१०/२०१० चे पत्राने लिलावाची कार्यवाही पुर्ण होईपर्यत ५ गाळयांची मागील मान्य दराने परवाना फी संस्थान जमा करणेस कळविलेले आहे.

४) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०४/२०१२ चे सभेतील विषय नं. ९३ निर्णय क्र. ३५४ चे ठरावाप्रमाणे नविन भक्तनिवासस्थान इमारती मधील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो. लि. शिर्डी यांना वापरास दिलेल्या ३ गाळे, १ मोकळी जागा ( कॅन्टीन शेजारी ) व १ रुम ( क्लोकरुमची ) चा जाहिर लिलाव करणेकामी वर्तमान पत्रात प्रसिध्दीस द्यावयाचे जाहिरातीचे मसुद्यास व वर्तमान पत्रात प्रसिध्दीसाठी येणाऱ्या खर्चाचे मान्यतेसाठी दि.२१/०६/२०१२ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. त्यावर मा.हुजूर यांनी ५०० रुम येथील वापरांस दिलेले सर्व व्यावसायीक गाळे बंद करावे असे वाटते याबाबत येत्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेचे वेळी सदरचा विषय चर्चेसाठी घ्यावा असे ही सुचीत केलेले आहे.

५) तसेच दि. ०३/०७/२०१२ चे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे टिपणीने दि. ३०/०६/२०१२ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सोा. यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या आपत्ती व्यवस्थापन बैठकीमध्ये चर्चिल्या गेलेल्या मुद्यामध्ये साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील ए विंग बाहेरील बाजूचा गाळा नं. ०६ व डि विंग बाहेरील बाजूचा गाळा नं. १२ या दोन्ही गाळयात खाद्यपदार्थ शिजविणेकामी एल.पी.जी. गॅस टाक्यांचा वापर करण्यात येतो सदर ठिकाणी काही दुर्घटना घडल्यास जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण सदर ठिकाणी नेहमी साईभक्तांची वर्दळ असते. या ठिकाणी आपत्ती ओढवल्यास प्रतिबंधक उपाययोजना सदर ठिकाणी उपलब्ध नाही. त्यामुळे खबरदारीचा उपाययोजना म्हणून सदर गाळे बंद करावे असे ठरले आहे.

६) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. सोसायटीने दि.२८/०६/२०१२ चे पत्राने असे कळविले आहे कि, मा.ना. श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दि. १२/०५/२०१२ रोजीचे पत्राने मा.जिल्हाधिकारी सोा. यांना असे सुचित केले आहे की, संस्थानने सोसायटीस ५०० रुम येथे वापरांस दिलेल्या ५ गाळयांचा लिलाव करणेचा निर्णय त्रिसदस्यीय समितीने घेतलेला आहे. सदर गाळयांचा लिलाव न करता दर अकरा महिन्यांनी संस्थेस भाडे तत्वावर देणेबाबत संस्थेने विनंती केलेली आहे. कृपया त्रिसदस्यीय समितीने घेतलेल्या निर्णयास स्थगिती देऊन गाळे संस्थेस भाडेतत्वावर देणेबाबत उचित कार्यवाही करावी. सदरच्या पत्राची प्रत मा.श्रीमती रुबल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना अग्रेषीत केली आहे. सदर पत्राची झेरॉक्स प्रत सोसायटीने इकडेस पाठविलेली आहे.

तरी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे. को-ऑप सो. लि. शिर्डी यांना व इतर सहकारी संस्था व खाजगी व्यवसायीक यांना चालविण्यास देण्यात आलेल्या श्री साईबाबा भक्तनिवास इमारतीतील गाळे संस्थानचे वापरास घेणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं. ५८ श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि., शिर्डी यांना यांना श्री साईबाबा संस्थान परिसरात कायम स्वरुपी व्यवसाय मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी मा.ना. श्री राधाकृष्ण विखे पा. कृषि व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना दि. १०/०४/२०१२ रोजी पत्र देवून सोसायटीच्या कारभारा विषयी, सभासद संख्या, कर्मचारी संख्या व शासनाकडे जमा केलेल्या महसुलाबाबत माहिती दिलेली आहे. व याच पत्रान्वये संस्थानचे अधिनियमात दुरुस्ती करणेबाबत विनंती केलेली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ चे कलम क्र १७(३) मधील तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्ट्याने राज्य शासनाचे पुर्वमंजुरी शिवाय समितीकडून देता येणार नाही अशी तरतुद आहे. त्यांचे संस्थेस मंदिर परिसर व संस्थान परिसरात प्रत्येक ठिकाणी जागा / स्टॉल्स भाडे, विद्युत बील व इतर वसुली निश्चीत करुन कायम स्वरुपी मिळणेसाठी संस्थान अधिनियमात / नियमावली मध्ये तरतुद करणेस सोसायटीने विनंती केलेली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियमावली तयार करण्याचे काम मा.सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई येथे अंतीम टप्यात आहे. तसेच सन २००४ चा अधिनियम क्र. १४ चे कलम क्र. १७(३) नुसार, तसेच मंत्रालय, न्यायालय अथवा इतर शासकीय कर्मचाऱ्यांच्याही सहकारी पतसंस्था असुन त्या सर्व पतसंस्थांना मालक संस्थेच्या किंवा विभागांचे स्थावर मालमत्तेत अथवा त्याचा परिसरात अग्रक्रमाने ( मालक संस्थेकडून ) जागा / गाळे उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्याच प्रमाणे श्री साईबाबा संस्थान मधील काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार रजि. नं. २३,१८३ दि. ३०/०१/१९५७ ने स्थापन असलेल्या सहकारी संस्थेस मंदिर व संस्थान परिसरात प्रत्येक ठिकाणी साईभक्तांचे सेवेसाठी व्यवसाय करणेसाठी जागा / स्टॉल उपलब्ध करुन देणे व त्याप्रमाणात भाडे, विद्युत बिल व इतर वसुली नियमित करुन दर अकरा - अकरा महिन्यांनी भाड्यामध्ये अल्प प्रमाणात वाढ करुन व्यवसाय कायम स्वरुपी संस्थेस मिळणेसाठी संस्थान अधिनियमात तरतुद करणेबाबत सोसायटीची विनंती आहे.

सोसायटीने संस्थानकडे मुदतवाढ मिळणेबाबत वारंवार विनंती अर्ज केलेले आहेत परंतू उलट पत्रांनी संस्थानकडून वारंवार जागा / स्टॉल खाली करुन देणेबाबत कळविण्यात येत असल्याने, सहकारी संस्थेचे भवितव्य धोक्यात येत असून संस्थेचे २३२ कामगारांचे व २४०० सभासदांचे मोठ्या प्रमाणात आर्थीक नुकसान होणार आहे. असे सोसायटीचे म्हणणे आहे.

संस्थानचे मंदिर परिसरात व संस्थान परिसरात खाजगी व्यक्तींना सदरचे व्यवसाय दिले तर साईभक्तांना मनमानी किंमतीला प्रसाद खरेदी करावा लागेल, तसेच शासनासही मोठ्या प्रमाणावर महसुल मिळणार नाही व योग्य प्रमाणात कर्मचारी रोजगारही उपलब्ध होणार नाही. त्यामुळे संस्थेसह परिसरातील सहकारी संस्थाही धोक्यात येतील. त्यामुळे मा. मंत्री महोदयांनी या प्रश्नात लक्ष घालून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटी लि.शिर्डीस अग्रक्रमाने संस्थेस संस्थान परिसरात व्यवसाय देणेबाबत अधिनियमात तरतुद व्हावी अशी विनंती केली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटी लि.शिर्डीने सदर पत्राची प्रत मा.ना. पृथ्वीराजजी चव्हाण, मुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पाठविली आहे. त्या पत्रावर कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी संदर्भ क्र. २ चे पत्राने संस्थान परिसरात कायम स्वरुपी व्यवसाय मिळण्यासाठी संस्थान अधिनियमात तरतूद करण्याचे मागणीचे अनुषंगाने संस्थानचा मुद्देनिहाय अभिप्राय शासनास पाठविण्यात यावेत असे कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाचे पत्रानुसार सोसायटीचे निवेदनाबाबत खालील प्रमाणे अभिप्राय शासनास पाठविता येईल त्यांस मान्यता असावी.

१) श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटी लि.शिर्डी हि संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांची सहकारी पतपेढी आहे. सदरची सोसायटी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार रजि. नं. २३, १८३ दि. ३०/०१/१९५७ नोंदणी कृत सोसायटी आहे.

२) प्रस्तुत सोसायटीस संस्थान परिसरात त्यांचे विविध व्यवसाय चालविणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा दिलेली आहे. जागेचे वापराची मुदत संपुष्टात आल्यानंतर वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ दिलेली असून त्यांचे मार्फत श्री साई भक्तांना सुविधा प्राप्त होणेस मदत होत आहे. भक्तांची सुरक्षितता व वर्दळ लक्षात घेऊन मंदिर परिसरातील सोसायटीचे काही व्यवसाय हलविणेबाबत सोसायटीस कळविणेत आलेले असून त्यांनी सदर व्यवसाय अद्याप पावेतो स्थलांतरीत केलेले नाहीत. त्याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को. ऑपरेटीव्ह सोसायटी हि संस्थान कर्मचाऱ्यांची सोसायटी आहे. त्यामुळे संस्थान कर्मचारी सभासदांना व कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे कर्ज प्राप्त होते. सोसायटीचे विविध व्यवसायांचे उपक्रमामुळे इतर संस्थांनाही रोजगार प्राप्त होणे सहाजिकच आहे. त्याचप्रमाणे शासनास कर देखील मिळतो ही वस्तुस्थीती आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को. सोसायटीस समाधी मंदिर परिसरातील जागा खाली करुन मागीतल्या आहेत. सदर ठिकाणी भक्तांची वर्दळ असते, साईभक्तांचे सोयीचा विचार होऊनच पतपेढीस समाधी मंदिर परिसरातील जागा खाली करणेस कळविलेले आहे. परंतू अद्याप पावेतो त्यांनी जागा खाली केलेली नाही.

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट ॲक्ट २००४ चा ( कलम १७(३) ) विचारांत घेता एक वर्षा पेक्षा अधिक मुदतीसाठी संस्थानची मिळकत शासनाचे परवानगी शिवाय देता येत नाही. सदरची बाब विचारात घेता पतपेढीस १ - १ वर्षाचे मंजूरीने लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा वापरांस परवानगी दिलेली आहे. व त्याप्रमाणे जागेचा वापर त्यांचेकडून चालूच आहे.

मंत्रालय, न्यायालय अशा इतर शासकीय कर्मचाऱ्यांचे पतसंस्थेस मालक संस्थेचे किंवा विभागाचे स्थावर मालमत्तेत अथवा त्याच परिसरात अग्रक्रमाने (मालक संस्थेकडून ) जागा / गाळे उपलब्ध करुन दिले असल्याचे सोसायटीने पत्रात नमुद केलेले आहे. परंतू याबाबत ठोस किंवा लेखी माहिती उपलब्ध नाही. सदरची माहिती श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. ऑपरेटीव्ह सोसायटीने सादर केलेली नाही. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को. ऑपरेटीव्ह सोसायटी ही सहकारी कायद्याअंतर्गत नोंदणी झालेली स्वतंत्र संस्था आहे. मालक संस्था म्हणून

संस्थानकडून त्यांना नियमाप्रमाणे सहकार्य अपेक्षीत आहे. त्याच प्रमाणे कर्मचाऱ्यांचे हिताची जपवणूक करणे हे संस्थेचे उद्दीष्ट आहे. त्याचप्रमाणे साईभक्तांचे सुविधांस अग्रक्रम देणे हे संस्थानचे ध्येय आहे. करीता त्याकामी मालक संस्थेस सहकार्य असणे आवश्यक आहे. याबाबी विचारात घेवून संस्थान परिसरात प्राधान्याने भक्तांच्या सोयीसाठी जागा वापरांस देणेबाबत अग्रक्रम देऊन त्यानंतर पतपेढीस जागा वापरास देणे बाबत सहकार्य करणेबाबत ( Not as of right ) अधिनियमात तरतुद करणेबाबत शासन स्तरावर विचार करता येईल. असा अभिप्राय शासनाकडे सादर करता येईल.

सोसायटीची उलाढाल हि संस्थानने सोसासटीस साईभक्तांचे सोयीसाठी करावयाचे व्यवसायाव्दारे (उदा. वाहन पार्किंग, क्लोकरुम, प्रसाद नॉव्हेल्टी स्टोअर, गरम पाणी पुरवठा, थंडपेय / दुध व दुग्ध जन्यपदार्थ, मोबाईल-कॅमेरा क्लोकरुम, पादत्राण गृह, ) होते. सोसायटीचे उत्पादनावर सभासदांना व सोसायटीचे कर्मचाऱ्यांना जिवन मान उंचावण्यासाठी सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. तसेच सोसायटी मार्फत साईभक्तांना सुविधा पुरविण्यात येतात. खाजगी व्यावसायीकांना सदरचे व्यवसाय दिल्यास सोसायटीचे उत्पन्न बंद होईल व सोसायटीचे अस्तीत्व धोक्यात येईल. असे सोसायटीचे म्हणणे आहे. संस्थान परिसरात भक्तांचे सोयीसाठी काही उपक्रम राबविणे व त्यासाठी जागा वापरांस द्यावयाची असल्यास त्याबाबत परिस्थीतीनुसार निर्णय घेणेचे अधिकार संस्थानने राखून ठेवले आहेत. त्यामुळे सोसायटीचे अस्तीत्वावर काही परिणाम होणार असेल तर त्याची जबाबदारी संस्थानवर येणार नाही. भक्तांचे सोयीसाठी असे व्यवसायांस जागा लिलावाने देणे अथवा जागा वापर बंद करणे याचा अधिकार संस्थानचा आहे. याबाबी देखील संबंधीत संस्थेने ( पतपेढीने ) विचारांत घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्ता, शिर्डी अधिनियम २००४ मध्ये कलम १७ (३) मधील तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता हस्तांतरीत राज्य शासनाचे पुर्वमंजुरी शिवाय समितीकडून देता येणार नाही अशी तरतुद आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटीची मागणी संस्थान हद्दीत कायम स्वरुपी व्यवसायास जागा मिळावी अशी आहे. सध्याचे तरतुदी मध्ये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को- ऑप.सोसायटी लि.शिर्डीस अग्रक्रमाने शासनाचे नियमाप्रमाणे लायसन्सी / भाडे आकारणी करुन अधिनियमातील कलम १७ (३) अनुसरुन ३ वर्षा पावेतो ११ - ११ महिन्याचे कालावधी प्रमाणे किंवा यथायोग्य कालावधी साठी प्रति वर्षी मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन (लाईट बील, डिपॉझ ीट, वगैरे आकारुन) संस्थान परिसरात जागा / स्टॉल भक्तांना सुविधा देणेसाठी शासन स्तरावर अधिनियमात दुरुस्ती करणेबाबत विचार करता येईल असे शासनास कळविणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं. ५९ प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसार भारती (भारतीय प्रसारण निगम) आकाशवाणी तथा दुरदर्शन, मुंबई यांनी CEW/TVP/२६१९, दि. २१/०४/२००३ अन्वये शिर्डी येथे दुरदर्शन लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी संस्थानकडे मासिक भाडे तत्वावर ४,९०० स्क्वे.फुट जागा मिळणेस विनंती केली होती. त्याबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचा दि.११/०५/२००३ रोजीचा ठराव क्र. २०७ ने मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पुर्व मान्यता घेवून (सर्व्हे नं.१४८/२ पैकी धर्मशाळा इमारत १ पैकी)सदर जागा भाड्याने देणेचे

ठरले. सदर ठरावास अनुसरुन संस्थानने दि.०९/०६/२००३ रोजी मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे प्रसार भारती यांना संस्थानची जागा भाड्याने देणेबाबत प्रस्ताव सादर केला. प्रकरणी परवानगी देणे संस्थानचे हिताचे आहे, असा विचार करुन मा.धर्मादाय आयुक्त यांनी दि.१०/०७/२००३ रोजीचे आदेशाने प्रसार भारती, आकाशवाणी दुरदर्शन, मुंबई यांना Low Power T.V.Center शिर्डी येथे उभारणेसाठी संस्थानचे अर्जात नमुद केलेप्रमाणे जागा भाड्याने देणेबाबत परवानगी दिली आहे. त्याबाबत प्रसार भारती यांनी दि.०६/०८/२००३ चे पत्राने (०१) पी.डब्ल्यु.डी. यांचेकडून निश्चित झालेले भाडे देण्यात येईल. (०२) कमीत कमी १५ वर्षासाठी जागा द्यावी लागेल, (०३) करारनामा ३ वर्ष किंवा ५ वर्षासाठी करण्यात यावा, त्यानंतर नुतनीकरण करण्यात यावा, असा राहील, असे इकडेस कळविण्यात आले होते. दि. २२/०८/२००३ पासून प्रसार भारती यांना (धर्मशाळा(२०० रुम) सर्व्हे नं.१४८/२ पैकी सध्याचे साईनाथ रुग्णालयापैकी ) संस्थानची जागा २६६.२८ चौ.मी. व ४ रुम ११४.३२ चौ.मी. असे एकूण ३८०.६० चौ.मी. क्षेत्र रिले सेंटरसाठी वापरांस दिलेली आहे.

प्रसार भारती यांचे उपरोक्त पत्राबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचा दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेत विषय सादर करुन निर्णय क्र.४७३ झालेला आहे. प्रसार भारती यांना १५ वर्षासाठी जागा भाड्याने देणेबाबतचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे.

मात्र संस्थानला आता नविन अधिनियम लागू आहे. त्यामध्ये भाडे पट्ट्याबाबत नविन तरतुद आहे. पुर्वीच्या ठरावाप्रमाणे १५ वर्षासाठी लिव्ह अँड लायसन्स तत्वावर जागा दिली असली तरी, आताच्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियमातील कलम १७(३)च्या तरतुदीप्रमाणे फक्त एक वर्ष कालावधीसाठी संस्थान मिळकत lease वर देता येते. दि.१८/०७/२०१२ रोजी सब रजिष्टार, राहाता यांचेसमोर प्रसारभारती ब्रॉडकास्टींग ऑफ इंडिया व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेसमवेत प्रस्तुत मिळकतीचा (दि.२१/०२/२०१२ ते दि. २०/०८/२०१२) अखेर ६ महिने कालावधीचा Lease deed करारनामा करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा कालावधी दि.२०/०८/२०१२ रोजी संपूष्टात येत आहे.

प्रसारभारती ब्रॉडकास्टींग कार्पो.ऑफ इंडिया, नाशिक यांनी आता त्यांचे दि.२६/०७/२०१२ रोजीचे पत्राने प्रसारभारती यांनी शिर्डी येथील संस्थानचे द्वारावती परिसरातील टि.व्ही.रिले सेंटरचे लिज डिड पूढे दि.२१/०८/२०१२ ते दि.२०/०८/२०१३ अखेर चालू ठेवणेस उत्सुक असून पुढील मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे. प्रसारभारती ही भारत सरकारची लोकसेवा प्रसारण केंद्र आहे. दुरदर्शनचे सह्याद्री चॅनेलवर श्री साईबाबांचे भक्तीचे कार्यक्रम दाखविले जातात, तसेच डी.डी.भारती हे राष्ट्रीय व अंर्तराष्ट्रिय चॅनेल आहे. सदरचेच कार्यक्रम शिर्डी येथील रिले सेंटर वर दाखविले जातात. अशाप्रकारे प्रसारभारती हे श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार सर्व जगभर करीत असते.
दि.११/०५/२००३ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णयानुसार दर तीन वर्षांनी १० % भाडेवाढ करण्याचे निश्चित झालेले आहे, त्यानुसार दर तीन वर्षांनी १० % प्रमाणे भाडेवाढ करण्यात आलेली आहे. आता सदरची मुदत २०/०८/२०१२ रोजी संपत असून पुढील तीन वर्षासाठी १० % प्रमाणे म्हणजे रु.४,०२४/- + रु.४०३/-(१० %) = रु.४,४२७/-(अक्षरी रु.चार हजार चारशे चोवीस) भाडेवाढ करणेबाबत विनंती केलेली आहे व त्याबाबतची मंजूरी लवकर कळवावी म्हणजे अॅडीशनल डायरेक्टर जनरल (इंजिनिअर) (डब्ल्युझेड), मुंबई यांना पुढील मान्यतेसाठी पाठविणेस सोयीचे होईल. असे कळविले आहे.

संस्थानचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ चे दि.०५/१०/२००३ चे ठरावाप्रमाणे प्रस्तुत मिळकत प्रसार भारतीस वांपरास दिलेली आहे. जागेचे मासिक भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार घेणेचे ठरलेले आहे व दर तीन वर्षांनी मासिक परवाना फी मध्ये वाढ करुन खालीलप्रमाणे आकारणी केलेली आहे.

०१) रु. ३,३२५/- (अक्षरी रु.तीन हजार तीनशे पंचवीस मात्र) मासिक भाडे दि.२१/०८/२००३ ते दि.२०/०८/२००६ अखेर प्रसार भारतीने रक्कम संस्थानमध्ये भाडेपोटी भरलेले आहे.

०२) दुस-या टप्प्याचे तीन वर्षाचे दि.२१/०८/२००६ ते दि.२०/०८/२००९ पावेतोचे रु.३,३२५/- मध्ये १० % वाढ करुन म्हणजे रु.३,६५७.५० प्रमाणे प्रसारभारतीने संस्थानमध्ये भाडेपोटी भरलेले आहेत.

०३) तिस-या टप्यासाठी दि.२१/०८/२००९ ते दि.२०/०८/२०१२ अखेर रु.३,६५७.५० मध्ये १० % वाढ करुन म्हणजे रु.४,०२४/- प्रमाणे प्रसारभारतीने संस्थानमध्ये भाडेपोटी भरलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०५/१०/ २००३ चे ठरावानुसार प्रसारभारती यांना प्रस्तुत मिळकत १५ वर्षासाठी लिज डिडवर देणेस मान्यता आहे. मात्र संस्थानच्या सन २००४ च्या अधिनियमातील कलम नं.१७(३) मध्ये तरतुद खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट ॲक्ट २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ चे कलम क्र.१७(३)मध्ये - विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्याने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा संक्रामित करण्यात येणार नाही. अशी तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार प्रसारभारती यांना एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संस्थान मिळकत लिज डिडवर देता येणार नाही. करीता यापुर्वीचा करार दि.२१/०२/२०१२ ते दि.२०/०८/२०१२ पावेतोचा केलेला आहे. करीता प्रसारभारती यांना /लिव्ह अँड लायसन्स तत्वावर दि.२१/०८/२०१२ ते दि.२०/०८/२०१३ पावेतो मासिक परवाना फी मध्ये १० % करुन म्हणजे रु.४,०२४/- + १० % (४०३/-) = रु. ४,४२७/- (अक्षरी रु.चार हजार चारशे सत्तावीस मात्र) आकारुन व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन जागा वापरांस मुदतवाढ देणेबाबत विचारार्थ व मंजूरीसाठी सादर.

**निर्णय क्र.७१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना लिव्ह अँड लायसन्स तत्वावर दि.२१/०८/२०१२ ते दि.२०/०८/२०१३ पावेतो मासिक परवाना फी मध्ये १० % करुन म्हणजे रु.४,०२४/- + १० % (४०३/-) = रु. ४,४२७/- आकारुन व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन जागा वापरांस मुदतवाढ देणेत यावी असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६० स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील ए.टी.एम. चे जागेस मुदतवाढ देणेबाबत**

**प्रस्ताव-** **०१)** दि.१२/०६/२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.११८ व निर्णय क्र.४५५ प्रमाणे जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२३६९/२०११, दि.०८/०८/२०११ व जा.क्र.एसएसएस/ वशी-विधी/ ३०७६/२०११, दि.१६/०९/२०११ चे पत्राने/ आदेशाने दि.२८/०९/२०११ ते दि.२७/०८/२०१२ अखेर ११ महिने कालावधीसाठी संस्थान मालकीचे सिटी सर्व्हे नं. ३२ व नगरपंचायत घर नं. ८०२ साईनाथछाया इमारतीमधील तळमजल्यावरील १ गाळा ९ स्क्वे.मि. जागा मासिक परवाना फी प्रती स्क्वेअर मिटरला रु. ४०० प्रमाणे रु.३,६००/- (अक्षरी रु.तीन हजार सहाशे मात्र)आकारण्यात येऊन व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन ए.टी.एम.साठी वापरांस लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर पुर्वीचेच अटी /शर्तीनुसार स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डीस वापरांस देणेत आलेला आहे. दि.०९/०२/२०१२ रोजी मा.दुय्यम निबंधक, राहाता यांचेसमोर करारनामा करण्यात आलेला आहे.

**०२)** दि.३१/०७/२०१२ रोजीचे पत्राने ब्रँच मॅनेजर, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांनी साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ए.टी.एम.चे वापरात असून त्याची मुदत माहे ऑगष्ट २०१२ मध्ये संपुष्टात येत आहे. त्याचा लिव्ह अँड लायसन्सचा करारनामा करण्यात आलेला असून पुढील मुदतवाढ मिळणेबाबत, तसेच करारनाम्याचा मसुदा पाठवावा व लवकरात लवकर करारनामा Execute करण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

**०३)** श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट ॲक्ट २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ चे कलम क्र.१७(३) मध्ये - विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्याने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा संक्रामित करण्यात येणार नाही. अशी तरतुद आहे.

(Maharashtra Act No. XIV of २००४ Clause No.१७(३) No immovable property vested in the Trust shall be leased for more than a year, or mortgaged, sold or otherwise alienated, by the Committee, except with the previous sanction in writing of the State Government.)

मात्र साईभक्तांचे सोयीचा विचार करता संस्थानने यापुर्वी स्टेट बँकेस खाली तपशीलात दर्शविलेप्रमाणे यापुर्वी जागा वापरांस लिव्ह अँड लायसन्स तत्वावर परवानगी दिलेली आहे.

| अ.नं. | जागा तपशील | क्षेत्र | कालावधी | परवाना फी (मासिक) | आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | साईनाथ छाया इमारत तळमजला-सिटी सर्व्हे नं. ३२ व नगरपंचायत घर नं. ८०२ | ९ स्क्वे.मी. | दि.२८/०९/२०११ ते दि.२७/०८/२०१२ | रु.३,६००/- | जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२३६९/२०११, दि.०८/०८/२०११ |

पुर्वीचा कालावधी संपुष्टात येत असलेने स्टेट बँक ऑफ इंडियाने आता पुनःश्च जागा/इमारतीतील गाळा वापरांस परवानगी मागितलेली आहे.

**०४)** उपरोक्त बाबींचा विचार करता, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांना दि.२८/०८/२०१२ ते दि.२७/०७/२०१३ अखेर ११ महिने कालावधीसाठी संस्थान मालकीचे सिटी सर्व्हे नं. ३२ व नगरपंचायत घर नं. ८०२ साईनाथछाया इमारतीमधील तळमजल्यावरील १ गाळा ९ स्क्वे.मि. जागा मासिक परवाना फीमध्ये १० % वाढ करुन म्हणजे रु.३,६००/- + रु.३६०/-(१० %) = ३,९६०/- (अक्षरी रु.तीन हजार नऊशे साठ मात्र)आकारण्यात येऊन व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन ए.टी.एम.साठी वापरांस लिव्ह अ‍ॅन्ड लायसन्स तत्वावर पुर्वीचेच अटी /शर्तीनुसार देणेबाबतचा विषय मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-शिर्डी यांना साईनाथछाया इमारतीमधील तळमजल्यावरील एक गाळा नऊ स्केअर मीटर जागा ए.टी.एम. चे वापरासाठी दि.२८/०८/२०१२ ते दि.२७/०७/२०१३ अखेर ११ महिने कालावधीसाठी मासिक परवाना फीमध्ये १० % वाढ करुन म्हणजे रु. ३,९६०/- व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन पुर्वीचेच अटी /शर्तीनुसार लिव्ह अ‍ॅन्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.६१ अंदाजपत्रकातील तरतूदीव्यतिरिक्त श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ बाबतचे खर्चाचा तपशिल.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१९/०२/२०१२ च्या सभेत श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०११ करीता झालेल्या खालील खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर केला होता.

| अ.नं. | तपशिल | मान्य केलेली अंदाजपत्रकीय रक्कम | प्रत्यक्षात झालेला खर्च | तरतुदी पेक्षा कमी झालेला खर्च | तरतुदी पेक्षा जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १) | मंडप, कमानी, स्टेज व इतर | ८,००,०००.०० | १६,९९,८३४.०० | ०० | ८,९९,८३४.०० |
| २) | कलाकार बिदागी -(कीर्तनकार व निमंत्रीत कलकार , कलाकार हजेरी कार्यक्रमासह) | २,००,०००.०० | १,२१,९१८.०० | ७८,०८२.०० | - |
| ३) | भक्तांना मिष्टान्न अन्नदान कक्ष, व श्रमपरिहार -मजूरीसह | ५,००,०००.०० | ४,५६,८३१.०० | ४३,१६९.०० | - |
| ४) | विद्युत रोषणाई ,जनसेट भाडे , इंधन खर्च इ. | १,२५,०००.०० | १,०७,५०८.०० | १७,४९२.०० | - |
| ५) | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदी-प्रसादासह १ लाख ५५ हजार तहहयात, आश्रयदाते विदेशी भक्तांसह | १६,००,०००.०० | १५,०१,५९९.०० | ९८,१०४.०० | - |
| ६) | जादा कंत्राटी कर्मचारी स्वयंसेवक(विद्यार्थी) मानधन | २,००,०००.०० | १,५१,४४९.०० | ४८,५५१.०० | - |
| ७) | इतर खर्च-मंदिर रंगकाम मंदिर प्रसाद, प्रसादाल्य फर्निचरभाडे, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, फोटोग्राफी,पेंटर बीले | १,००,०००.०० | ८५,५००.०० | १४,५००.०० | - |
| ८) | पालख्याचे ठिकाणी पिण्याचे पाण्याची व्यवस्था खर्च- टँकर व डिझेल सह. | ४५,०००.०० | १४,०९५.०० | ३०,९०५.०० | - |
| ९) | उत्सवात येणारे भक्तांसाठी रांगेत वाटण्यात येणा-या पाऊचचा खर्च. | १०,०००.०० | - | १०,०००.०० | - |
| १०) | मंदिर व मंदिर परीसर फुलांचे डेकोरेशन | १०,०००.०० | - | १०,०००.०० | - |
| ११) | प्रथमोपचार केंद्राकरीता तातडीचे औषध खरेदी | १०,०००.०० | - | १०,०००.०० | - |
| | **एकूण** | **३,६०,००००.००** | **४१,३८,७३४.००** | **३६०८०३.००** | **८,९९,८३४.००** |

वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी दि.२२/०५/२०१२ च्या खुलाशात खालीलप्रमाणे नमुद केले आहे. श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१० करीता बांबु व बल्याचे मंडपाची उभारणी करण्यात आलेली असल्याने त्यासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्थेसाठी रुपये ५,११,६११/- इतका खर्च झालेला आहे. श्री गुरुपौर्णिमा २०११ करीता सदरची मंडप व्यवस्था भक्कम व दिसणेस आकर्षक करण्यासाठी चांगल्या प्रतीच्या मंडपाचे कोटेशन मागविण्यात आले होते. सदरचे सिलबंद कोटेशन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०११ रोजीचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन सादर करत्यांनी दिलेल्या दराबाबत दरपत्रक सादर करत्यांशी चर्चा तथा वाटाघाटी करण्यात येऊन एमस पाईप / बल्या वापरुन, कापडी मंडपाचा दर रुपये ३ प्र.दि.प्र.चौ.फुट व एमस पाईपचे स्ट्रक्चर वापरुन ताडपत्रीचे कापडी मंडपाचा दर रुपये ९ प्र.दि.प्र.दराचे निवीदा स्वीकरण्यात आली त्यानुसार दर निश्चित करण्यात आले. याकामी येणारे रुपये १७,६५,३४८.५६ चे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०११ चे सभेतील निर्णय क्र.३४५ नुसार श्री.गुरुपौर्णिमा उत्सव २०११ चे मंडपासाठी खालीलप्रमाणे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

**अ)** गुरुपौर्णिमा उत्सव २०११ निमित्त करावयाची व्यवस्था ( कालावधी ) दि.१४/०७/२०११ ते १६/०७/२०११ अखेर तीन दिवस एकुण अपेक्षित खर्च रु.६,२२,४०९.९३

